आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३१ मार्च २०२४




आधुनिक केसरी


महाराष्ट्र ही संतांची भूमी. याच संतभूमित जन्म घेऊन अनेक संतांनी लोकजागृती करत लोक कल्याणासाठी जीवन समर्पित केले. पैठण हे पावन तीर्थक्षेत्र असून या तीर्थक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या कार्याने पैठणला एक वेगळी ओळख निर्माण झाली आणि तेव्हापासून पैठणची नाथषष्ठी आरंभ झाली. आजतागायत वारकरी संप्रदायाची परंपरा अखंडित चालू आहे. एकनाथी भागवत अनेक भारूड अशा विविध ज्ञानपूर्ण तत्वज्ञानाचे जनक त्याचप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे आध्यत्मिक साहित्य निर्माण करत लोक उपदेश करणारे महान संत एकनाथ महाराज यांचे मानवी जीवनातील सत्य विषद करणारा पिंगळा हे भारूड तर प्रचंड लोकप्रिय आहे. मानवी जीवनाचं तत्त्वज्ञान अगदी सोप्या भाषेत सर्व साधारण लोकांना कळेल ह्या पद्धतीने निर्माण करत महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात लोकजागृती निर्माण करण्याचं महान कार्य महाराष्ट्राच्या पावनभूमीतील पवित्र अशी गोदावरी नदी जी दक्षिणेकडची गंगा म्हणून प्रसिद्ध तर आहेच पण दक्षिण काशी म्हणून देखील प्रसिद्ध आहे आणि याच नदीतीरावर असणारं पवित्र पैठण तीर्थक्षेत्र या ठिकाणी संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांचा जन्म झाला.

# संतश्रेष्ठ एकनाथ महाराज

जन्मानंतर आई-वडिल यांचे वैकुंठगमन झाल्याने बालवयातील सांभाळ आजी-आजेबांनी केला. अगदी बालवयात चौकसबुद्धी, तीव्रस्मरणशक्ती आणि उत्कृष्ट अशी पाठांतरण क्षमता संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या आचरणातून दिसत होती. अगदी बालवयात अध्यात्मिक गोडी व ईश्वरभक्तीची आवड असल्याने ईश्वरप्राप्ती आणि नंतर समाज उद्धार हे विचार दैनंदिन बालमनात असायचे. समाजाला मार्गदर्शन करायचे असेल तर ईश्वरप्राप्तीची प्रचिती असायला हवी ही धारणा मनोमन होती. ज्ञानप्राप्तीसाठी गुरुची नितांत आवश्यकता असल्याने आणि गुरुशिवाय आत्मज्ञान प्राप्त होणार नाही, याची जाण असल्याने बालवयातच गुरुचा शोध सुरु झाला. अगदी 7 वर्षे वय असताना गुरु शोधात निघालेले एकनाथ महाराज देवगिरीचे किल्लेदार जनार्धन स्वामी यांच्या समक्ष येवून पोहोचले. पोहोचल्यानंतर जनार्धनस्वामी यांना साष्टांग दंडवत घातला त्याचक्षणी जनार्धन स्वामी यांनी एकनाथ महाराज यांना उठवून जवळ घेतले. आस्थेवाईकपणे विचारपूस केली. आई-वडिलांवर रुसून हा मुलगा पळून आला असेल असाच इतरांचा समज झाला परंतु जनार्धन स्वामींना मात्र भविष्यातील उद्धारकर्ता त्यांच्यामध्ये दिसत होता आणि एकनाथ महाराज यांनी नम्रपणे सांगितले की चित्ताला अनुताप झाल्यामुळे आपण आलो आहोत. जनार्धन स्वामी हे परम दत्त भक्त होते. दत्तात्रेय शिष्यपरंपरा। सहस्त्रार्जुन यदु दुसरा तेणे जनार्दनु तिसरा। शिष्य केला खरा कली युगी ॥ गुरु परंपरा आदीनारायण - ब्रह्मदेव-आत्रि-दत्तात्रेय-जनार्दनस्वामी- एकनाथ महाराज यावरुन जनार्धन स्वामी यांची महती आपल्या लक्षात येईलच. याच दरम्यान चिकाटी, अभ्यासू वृत्ती, चौकसबुद्धी सदाचार आणि श्रद्धा या गुण पंचकाच्या बळावर जनार्धन स्वामी यांनी एकनाथ महाराज यांना आपले शिष्यत्व प्रदान केले. एकनाथ महाराज यांना गुरुसेवेची मुळात अतिशय आवड होती आणि ईश्वर कृपेने तशी संधी मिळाल्याने ते नियमित सेवा करु लागले. जनार्धन स्वामींच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करणे आणि देवगिरी किल्ल्यावरील खटले, तक्रारी,वाटण्या, अशी विविध कार्य या सोबतच संरक्षणविषयक लोकांच्या अर्जाचे उत्तरे लिहिणे यामध्ये निपुणता प्राप्त केली आणि एकीकडे गीता, ज्ञानेश्वरी, ब्रह्मसुत्रे, उपनिषदे या ग्रंथातील ज्ञान आत्मसात करीत राहीले.जनार्धन स्वामींना आपल्या शिष्याचे कौतुक कसे करावे हे कळेनासे झाले. एकेदिवशी हिशोबामध्ये काही आणे पैशांचा घोळ आला एकनाथ महाराज यांनी आख्खी रात्र घालवली आणि तो झालेला घोळ शोधून काढला. शेवटी हिशोब बरोबर आला खूप समाधान वाटले आनंदाने किस्सा जनार्धन स्वामींना सांगितला यावर जनार्धन स्वामी यांनी एकोबा आसच मन लावून कृष्णभक्ती केलीस तर अवघे जीवन तेजानं उजळून जाईल. एकनाथांनी स्वामींचे पाय धरले. एकनाथ महाराज यांची भक्ती पाहून जनार्धन स्वामी यांनी त्यांना तपश्चर्या करण्यास सुचविले. गुरुआज्ञा शिरसावंद्य समजून देवगिरीपासून जवळ असणाऱ्या मार्कंडेय ऋषींची तपोभूमी म्हणून प्रसिद्ध शूलभंजन नावाचा पर्वत आहे त्या ठिकाणी एकनाथ महाराज यांनी कंदमुळे खावून 6 वर्षे प्रदिर्घ साधना केली. शेवटी जनार्धन स्वामी यांनी त्याठिकाणी येवून एकोबा तुझी आत्मसाधना सफल झाली. आता आपण बरोबरच तिर्थयात्रेला जावू असे सांगून त्या ठिकाणावरुन गुरु-शिष्य देशभर तिर्थयात्रा करुन परत आले आणि एकनाथ महाराज यांचे कार्यभूमी पैठण येथून लोकोद्धाराचे त्यांनी कार्य करावे असा उपदेश गुरु जनार्धन स्वामी यांनी केला. गुरू आज्ञेनुसार पैठण ही कर्मभूमी निश्चीत झाल्यानंतर नाथांनी लोकजागृतीचा श्रीगणेशा एकादशीच्या दिवशी कीर्तनाने पैठण येथून केला. एकनाथ महाराज यांचे कीर्तन प्रचंड लोकप्रिय होवू लागले. दरम्यानच्या काळामध्ये त्यांचा विवाह झाला. मुलंबाळ झाली. अध्यात्मिक आणि धार्मिक कार्य यशोशिखरावर होते. एकनाथ महाराज म्हणजे मुर्तीमंत दया, क्षमता, शांती, प्रेम, काम, क्रोध, लोभ, मोह, मध, मत्सर या सगळ्यांवर विजय मिळविलेले. गंगेवरुन ईश्वराला घालण्यासाठी आणलेले पाणी देखील तहानेने प्रचंड व्याकूळ झालेल्या गाढवाला पाजले.माणुसकीचे आणि जीवा-जीवामध्ये ईश्वर असल्याचा आणि दयेचे उदाहरण लोकांसमोर ठेवणारे संतश्रेष्ठ एकनाथ महाराज. एकनाथ महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, शुकाष्टक, रुक्मिणी स्वयंवर आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेली ज्ञानेश्वरीवर लिखान केले अशा पद्धतीने अनेक ग्रंथसाहित्य अभंग एकनाथी भारुड अशी साहित्य संपदा आहे.

*पिडा हारुनी दाविला दिव्य मार्ग ।*
*जनांसाठी भूमीवरी आणी स्वर्ग ।* सदा
*सर्व लोकां गमे एक नाथ ।*
*सुरां पूज्य जो धन्य तो*
*एकनाथ ।*

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या षष्ठीनिमित्त त्यांच्या कार्यास कोटी कोटी प्रणाम.





गणेश खाडे

विचारवंत, साहित्यिक, लेखक,
आध्यत्मिक मार्गदर्शक मो. 9011634301


मांडणी व सजावट
अतुल ह. खंडागळकर






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण अंदाज येण्यासाठी सांगतो, थोडीथोडकी नव्हे तर चक्क २५ बैलगाड्या भरून ही गहाण कर्जखाते होती. त्यांचा कुठलाही मोह न बाळगता ती त्यांनी इंद्रायणीत बुडवली. जणू हीच त्यांची पुण्याई त्यांच्या कामी आली आणि त्याच इंद्रायणीने त्यांचे अभंग तारले. त्यांचे अभंग हे खऱ्या अर्थाने ' अ-भंग ' राहिले. आणि आणखीही वेगळ्या अर्थाने हे अभंग तरले आहेत. हे अभंग आज साडेतीनशे वर्षे झाली तरी, लोकांच्या मुखी आहेत. वारकरी संप्रदायातील लोकांना तर मुखोद्गत आहेत. खेड्यापाड्यातील ग्रामीण भागातील अगदी अशिक्षित माणूस सुद्धा बोलताना बऱ्याच वेळेला तुकोबांच्या अभंगाचा दाखला देतो. याही अर्थाने ते ' अभंग ' आहेत , अमर आहेत. आणि ते ' अ-भंग ' राहिले ते उगीच नाही. त्यांचे अभंगच किती सुंदर..! म्हणून अभंग म्हटला तर तो तुकयाचा असे म्हटले जाऊ लागले. त्यांच्या अभंगात काय नाही. ईश्वरभक्तीची केवढी आर्तता आहे ! केवढा जिव्हाळा, केवढे प्रेम आहे. म्हणूनच त्यांना ' जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ' हा अनुभव आला. तो पांडुरंग , ज्याला त्यांची पत्नी जिजाबाई रागाने ' काळा ' म्हणत असे ते सावळे सुंदर परब्रम्ह सदैव त्यांच्यासोबत असल्याची अनुभूती त्यांना आली. अर्थात जिजाबाईच्या विठ्ठलावरच्या रागात तिचे प्रेमही होते. म्हणून तर विठ्ठलाला अरे तुरेच्या भाषेत ती बोलू शकली. ती अत्यंत पतिपरायण स्त्री होती. म्हणून विठ्ठलाला असे बोलण्याइतपत  तिचा अधिकार होता, हे मान्य करावे लागते. ' जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ' हा अनुभव येणे ही सोपी गोष्ट नाही. तुकाराम महाराज इतके विठ्ठलाशी एकरूप झाले होते की फक्त देहाच्या गरजा सोडल्या, तर ते विदेही अवस्थेत जगत होते. म्हणून तर ' आनंदाच्या डोही आनंद तरंग ' उठले. तुकोबांचे अभंग जो मनापासून वाचतो, त्याच्या डोळ्यांच्या कडा नकळत त्यातील प्रेमभावनेने ओलावल्याशिवाय राहत नाहीत. परमेश्वराकडे जाताना होणाऱ्या मनस्थितीची किती सुंदर वर्णन त्यांनी ' कन्या सासुऱ्यासी जाये ' या अभंगात केले आहे. तर संत किंवा सज्जन माणसे समाजासाठी कसे झिजतात, तर चंदनासारखे हे ' चंदनाचे हात, पायही चंदन ' या अभंगात किती सुदंर सांगितले आहे. सुमन कल्याणपूर यांनी आपल्या आवाजाने अमर केलेला अवीट गोडीचा हा अभंग माझा अत्यंत आवडता आहे.  अशा जगद्गुरू संत तुकारामांना वंदन करून थांबतो. आजचा लेख मी लिहिताना जणू आतूनच प्रेरणा होत होती. मी भराभर लिहीत गेलो. महाराजांनीच हा लेख माझ्याकडून लिहवून  घेतला असेच मला वाटते. प्रेमभावनेने माझ्याही डोळ्यांच्या कडा ओलावल्या आहेत. ' रामकृष्ण हरी. '






## आनंदी पहाट

## नकारात्मकता टाळता येण्याचा प्रयत्न करावा

आधुनिक केसरी

अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते. तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते. सामान्यांमध्ये तणावग्रस्ततेमुळे डोकेदुखी, मायग्रेन, सायनसवर परिणाम करणारी परिस्थिती आणि कानाचे संक्रमण यांचा समावेश होतो. नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो. अर्थात या अशा प्रकारच्या समस्या दुर्मिळ आहेत. मेंदूतील रासायनिक बदल हा पोषक तत्वांची कमतरता, झोपेचा विकार, साखरेच्या अतिसेवनामुळे बॅक्टेरियांची वाढ, नैराश्य किंवा थायरॉईडच्या स्थितीचे लक्षण असू शकतात. इतर सामान्य मेंदूच्या रासायनिक बदलांच्या कारणांमध्ये खूप वेळा खाणे, निष्क्रियता, पुरेशी झोप न मिळणे, दीर्घकाळचा ताण आणि खराब आहार यांचा समावेश होतो. नकारात्मक माहितीमुळे मेंदूच्या महत्त्वपूर्ण माहिती प्रक्रिया क्षेत्रामध्ये क्रियाकलाप वाढतात, आपले वर्तन आणि वृत्ती, वाईट बातम्या, अनुभव आणि माहिती यांच्याद्वारे अधिक प्रभावीपणे आकार घेतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## बोले अंतरंग | अभंगात ||


दृष्टी दे निरसी | पाहण्या विठ्ठला ||
जैसी अर्भकाला | दिसे माय ||१||
नसावा विटाळ | कुणाच्या मनाला ||
निष्काम कर्माला | ओळखू दे ||२||
दुःखाशी संवाद | व्हावा निरंतर ||
सुखाचे माहेर | दिसु लागे ||३||
लाभो देवा आता | संतांचा शेजार ||
नको क्षणभर | दूर लोटू ||४||
पुरवी डोहाळे | माझा पांडुरंग ||
बोले अंतरंग | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



पुष्प २९वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### समर्थ गुरुपीठ म्हणजेच शक्तिपीठ


दत्तावतारी श्री यतिराज श्री स्वामी समर्थ महाराजांच्या उपासनेने ज्ञानचक्षु उघडतात व लोककल्याणाच्या उर्मी ही कृतित्त्वात उचंबळू लागतात. त्र्यंबकेश्वर क्षेत्री साकारलेले श्री गुरुपीठ श्री स्वामी महाराजांच्या चैतन्याचे अखंड निवासस्थान आहे. दश महाविद्यांच्या तेजाचा स्त्रोत येथे नित्य प्रवाहित आहे. 'श्री' यंत्राची दैवी शक्ती येथे सामावली आहे. सेवा भावनेने, अनन्य श्रद्धेने येणार्‍यास येथे प्रचीती होते. हठयोगादि कठिण, असाध्य साधनेने जे अप्राप्य ते आत्मज्ञान अनुभवसिद्ध बनवण्याची किमया असलेल्या गुरुपीठाच्या प्रत्येक कणाकणात सरस्वती व्याप्त आहे. साध्या दृष्टीचा विषय असलेले नामरूपादि विश्‍व सोडून त्यात नित्य सामावलेले शाश्‍वत चैतन्य, अखंड परब्रह्मत्व शुद्ध अंतःकरणाच्या सेवेकर्‍याला अनुभवता यावे, त्यातून आनंदाच्या लहरी त्यास सर्वत्र प्रसारित करता याव्यात, यासाठी हे गुरुपीठ साकारले आहे. साध्या भोळ्या संसारी माणसांच्या हृदय संवेदनेशी ते जोडलेले आहे व याच माणसांच्या उद्धारासाठी सज्ज झालेले अपूर्व सिद्धपीठही ते आहे. मनःशांतीसाठी, जीवनाच्या सकारात्मक ऊर्जेसाठी, मनाच्या उन्नतीसाठी या गुरुपीठास भेट देऊन त्याच्या प्रांगणातून मनातल्या मनात ब्रह्मगिरीला साद द्या; शिवरूप व गुरुरुपाच्या अद्वैताची प्रचीती अनुभवा. श्री स्वामी महाराज म्हणाले होते - 'डोंगर बोलतील, तेव्हा मी उठेन' डोंगरांना बोलते करणारी माणुसकी, कारुण्य, परमप्रेम सेवेकर्‍यांच्या हृदयात वसले की सर्वत्र सर्व वेळ श्री स्वामी महाराजांच्या अस्तित्त्वाचा कृपामय अनुभव येईल. त्यासाठीची साधना अखंडपणे या गुरुपीठात सुरू आहे. परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराजांच्या नित्य अस्तित्वाची अनुभूती देणारे हे चैतन्यधाम आहे. परम आनंदाचे वसतीस्थान असलेले श्री गुरुपीठ अपूर्व मनःशांतीचा प्रत्यय, विवेकाचे बळ व निर्धाराची शक्ती देणारे आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र.  ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

तीन अवस्था सहज है, तुरिया साधन होय ।
योगिन ज्ञान विकाश है, शुद्ध रुप महँ सोय
।।३२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/३२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जागृत, स्वप्न, सुषुप्ती या प्राकृतिक अवस्था सर्वांना स्वाभाविकपणे प्राप्त होतात परंतू तुरिया अवस्था योग साधनेने प्राप्त होते. योगीयांच्या ज्ञान विकासाच्या शुद्ध रूपात ही अवस्था प्राप्त होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे

आधुनिक केसरी

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, ' नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ' अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती



आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे ' रामनाम. ' हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही. भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील. **१५. तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंडीत येतील.**

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ऊलट अज्ञानाच्या भूमिकेतून पाहिले तर ब्रम्ह आणि माया वेगवेगळी वाटतात. म्हणून मानवी बुध्दी च्या पध्दतीने ज्ञानमय ब्रम्ह आणि अज्ञान मय माया यांची तुलना करता येते. या समासात समर्थांनी त्याची परस्परविरोधी लक्षणे सांगितली आहेत.  द्रुश्य विश्वाच्या सगळ्या बंधनाच्या, सीमांच्या पलीकडे परमात्मा निराळे पणाने रहातो. आकाशाचे प्रतिबिंब पाण्यात पडले तरी आकाश पाण्यापासून अलिप्त असते,तसाच परमात्मा सर्वात व्यापलेला असून अलिप्त असतो.



रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३१ मार्च २०२४

# काँग्रेस- आपच्या गळ्याला कायद्याचा फास

आधुनिक केसरी

**काँग्रेस पक्षाने ५५ वर्षे सत्तेत असताना अंधाधुंद कारभार केला! इतकेच नव्हे, सी.बी.आय. सारख्या तपास यंत्रणेचा गैरवापर करत भाजपा नेते मोदी व शहा यांना जेलमध्ये टाकण्याचे कारस्थान केले! सत्तेची मस्ती व धुंदीत गांधी परिवाराने व काँग्रेसने सर्व नियम धाब्यावर बसविले! ज्या काँग्रेस सरकारने विरोधी पक्षासाठी खड्डा टाकण्यासाठी संस्था निर्माण केल्या. त्याच त्यांच्या गळ्याचा फास आवळत आहेत! त्यामुळे या नेत्यांची तडफड होणे, स्वाभाविक आहे. त्यातून काँग्रेसचे राहुल गांधी व आम आदमी पक्षाचे केजरीवाल या जोडगोळीने आपला भ्रष्टाचारावर पांघरुन घालण्यासाठी भारतीय घटना, लोकशाही आणि न्यायसंस्था, घटनात्मक संस्थावर हल्ले करत आहेत ! पक्ष स्वत :च्या बचाव राजकीय डाव खेळत असले यातून पक्षाची प्रतिमा जनमाणसात अधिक मलिन होत जाईल!**

भारताच्या शेजारी राष्ट्र असलेल्या पाकिस्तान व बांगला देशात सार्वत्रिक नुकत्याच निवडणूका झाल्या आहेत! पाकमध्ये निवडणूकीत प्रंचड हिसाचार व हेराफेरी झाली. पाकमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. तरीही शहबाज शरीफ हे पंतप्रधान झाले. बांगला देशात शेख हसीना या पाचव्यांदा पंतप्रधान झाल्या. या राष्ट्रात विरोधी पक्षाने निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. अमेरिका व जर्मन हे राष्ट्र याच नजरेतून भारतीय निवडणुकीकडे पहात आहे. या राष्ट्रांनी भारताच्या विरोधी टिप्पणीचा खडा टाकण्याचा प्रयत्न केला. पण भारत भारताने या राष्ट्रांना लगेच सडेतोड उत्तर दिले व समज दिली. भारत सरकार विदेशी हस्तक्षेप कधीच सहन करणार नाही. अमिरेका व



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

जर्मनमध्ये निवडणुकीत गोधळ व हेराफेरीचे घटना घडत आलेल्या आहेत! 'फेक न्यूज' उदय अमेरिका निवडणुकीतून झालेला आहे. तेंव्हा राष्ट्रांनी भारताला उपदेश देण्याच्या भानगडीत पडू नये! भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ८३ नुसार दर पाच वर्षानी लोकसभेची निवडणूक घेतली जाते. देशात निवडणूक म्हणजे लोकोत्सव असतो. याचे कारण मतदाराला आपल्या प्रतिनिधींची व सरकार निवडण्याचे अधिकार आहेत. देशात लोकसभेच्या १८ व्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. देशात पहिल्या लोकसभा निवडणुकीत १९५१-५२ मध्ये काँग्रेसला ३६४ जागेवर विजय मिळविला जनसंघाला चार जागा मिळाल्या होत्या. लोकशाहीत विरोधी पक्ष सक्षम असला पाहिजे, यात वादच नाही. पण तो विरोध हा सकारात्मक, राष्ट्रहित जपणारा असलाच पाहिजे. काँग्रेसच्या धोरणाविरुध्द भाकप, ईतर पक्ष संघर्ष करत आला आहे. त्यानंतर देशात २०१४ मध्ये सत्तांतर घडले. विरोधी पक्ष असलेला भाजपा प्रथम केंद्रांत बहुमताने सत्तेत आला. यात मात्र सत्ताभोगी काँग्रेसला उतरती कळा लागली.यामुळे आज सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या भूमिकेत बदल झाल्याचे पहावयास मिळत आहे.जो काँग्रेस पक्ष देशाची घटना, लोकशाही आणि राष्ट्रहित, विकासाला महत्व देत आला आहे. तो काँग्रेस आज या भूमिका विरोधात आहे. या उलट सत्ताधारी भाजपा व मोदी सरकार हे काँग्रेस भूमिकेचा पुरस्कार करत आहे.काँग्रेसने तर याचे स्वागत केले पाहिजे. पण आज काँग्रेसची "उलटी गंगा' वाहत आहे. काँग्रेस सरकारने सी.बी.आय. ईडी व प्राप्तीकर आदी संस्था निर्माण केल्या! तेव्हा संस्थेचा वापर उद्योजक, व्यापारी,अधिकारी व सामान्य नागरिकासाठी वापर करत असे! काँग्रेस व राजकीय नेत्यांना यात सूट दिली जात होती. काँग्रेसच्या राजवटीत भ्रष्टाचाराचे अनेक कांड घडले! गांधी परिवार संतापला नाही, कारण सत्तेतील वाटा त्यांना मिळत होता. आज गांधी परिवार कोट्यवधी संपत्तीचे मालक आहे. ही संपत्ती आली कोठून? देशातील राजकीय नेत्यांचा व्यवसाय काय? याची संपत्ती वाढते जाते कशी? याचा शोध कोणी घेण्याचे धाडस केलेले नाही. मोदी सरकारने भ्रष्ट राजकीय पक्ष व नेत्याविरोधात कारवाई करण्याचे बळ या संस्थाना दिले म्हणून भारतात प्रथम भ्रष्ट राजकीय पक्ष व नेत्यांविरोधात कुऱ्हाड चालविली जात आहे! विरोधी पक्ष या सुडबुध्दीने कारवाई करत आहे, असे रडत असला तर सामान्य जनता भ्रष्ट राजकीय नेत्यावरील कारवाईचे स्वागत करत आहे. काँग्रेसच्या भ्रष्टाचार विरोधातून आम आदमी पक्षाचा जन्म आला. ते वैरी होते, आता सखे मित्र बनले आहेत! या पक्षाचे नेते सत्तेसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली देशाची घटना,लोकशाही व घटनात्मक संस्थेच्या मूळ ढाच्यावर प्रहार करत आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी विदेशात जाऊन भारतीय लोकशाहीचा थट्टा उडवितात! घटनेने विरोधी पक्षाने भ्रष्टाचार अथवा नियमबाह्य काम करण्याचा परवाना दिलेला नाही. देशातील तपास यंत्रणेने राजकीय पक्ष व नेत्यांची चौकशी करू नये, असे वाटते! विरोधी पक्ष सैराटपणे वागला तरी चालते का? त्यात न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला तर योग्य!विरोधात दिली की! न्याय संस्था प्रश्न चिन्ह केले जात आहेत. अशा प्रकारचा नवीन ट्रेड राजकारणात सुरु झाला आहे. काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधींनी २०२३ मध्ये लंडनमध्ये एका कार्यक्रमात भारतात आता लोकशाही नाही,तेंव्हा युरोप,अमेरिकेने या राष्ट्राने हस्तक्षेप करावा, असे म्हणाले होते. काँग्रेस पक्षाच्या भांडखोर प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी गांधी या वक्तव्याचे समर्थन केले होते. या प्रवक्ता पूर्वीश्रमीच्या पत्रकार होत्या.पण त्यांनी पदाच्यालालचेने काँग्रेसची दलाली सुरु केली. परवा त्यांनी भाजपाच्या मंडीच्या उमेदवार कंगणा रनौतवर अर्वाच्च टिप्पणी केली! हे प्रकरण अंगलट येत 'हॅग चा बहाणा केला. आता काँग्रेस व आम आदमी पक्ष 'मिले सूर मेरा तुम्हारा' याप्रमाणेभ्रष्टाचाराचा सूर आवळत आहेत. दोन्ही पक्षाच्या नेत्याचा अजेंडा एकच आहे तो म्हणजे भारतीय घटना, लोकशाही व संस्थाची बदनामी करणे. हे नेते आपले कृत्य व भ्रष्टाचार दडपविण्यासाठी दवाबाचे व धमकविण्याचे राजकारण सुरु केले आहे.काँग्रेस पक्षाने सत्ते असताना प्राप्तीकर विभागाच्या नियमाचे कधीच पालन केलेले नाही. त्यामुळे आता या विभागाने १८२३ कोटी रुपायाची नोटीस पक्षाला बजावली आहे! काँग्रेस पक्षाने प्राप्तीकर विभागाच्या नियम १३ ए उल्लंघन केल्याच्या प्रकरणाची २०१९ पासून चौकशी चालू आहे! काँग्रेस पक्षाने २०१४ - २०१५ मध्ये रोख स्वरुपात देणग्या घेतल्या व हस्तांतरित केले, याचा हिशोबच नाही.त्यामुळे पक्षाला १३५ कोटी रुपायाची दंडात्मक नोटीस बजावण्यात आली.त्यावेळी दहा टक्के रक्कम भरण्यास सूचित केले गेले. पण काँग्रेसने ती रक्कम भरली नाही. काँग्रेसने रोख देणगीची रक्कम निवडणुकीत खर्च केली तसेच नेते दिग्विजयसिह व कमलनाथ यांना हस्तांतरित केली.याचीही माहिती प्राप्तीकर विभागाकडे आहे. काँग्रेसने प्राप्तीकर विभागाकडे माहिती नियमानुसार व वेळेत दिलेली नाही.ही काँग्रेसची चूक मात्र आरोप मात्र भाजपावर?काँग्रेसने आयकर प्राधिकरणाकडे अपील केले होते,तेथे न्याय मिळाला नाही, त्यानंतर प्राप्तीकर कराच्या पुनर्मुल्यांकनाला उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने पक्षाची याचिका फेटाळली तसेच पक्षाचे-१९९४-९५ कराचे प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे काँग्रेसला पक्षाला पाचशे कोटीच्या वर दंड भरावा लागणार आहे. काँग्रेस नेत्यांनी प्राप्तीकर विभागाच्या प्रकरणाला राजकीय षंडयत्र असल्याचा कांगावा करत आहे. आम्ही तर कर बुडवे आहोत! भाजपाने कर भरला नाही, असे निर्लज्जपणाचेचा काँग्रेस नेते आरोप करत आहेत!यावर पक्षाचे नेते राहुल गांधी तर आमचे सरकार आले तर सी.बी.आय. व ईडी,प्राप्तीकर अधिकाऱ्यांना बघून घेईन! असे धमकावत आहेत! एखाद्या माफीयाने खंडणीसाठी धमकी द्यावी तसे काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भाषा आहे. जर भाजपा कर बुडला याचे पुरावे असेल व काँग्रेस सुडबुध्दीने कारवाई होत असेल न्यायालयात याचिका दाखल केली पाहिजे! काँग्रेस पक्ष म्हणजे भारत, लोकशाही नव्हे! प्राप्तीकराची कारवाई लोकशाहीची हत्या आहे!असे म्हंटले गेले!यात मोदी सरकारचा संबंध येतोच कोठे? या प्रकरणात मोदी सरकारने हस्तक्षेप करुन कारवाई थांबवाई यासाठी हा दबाब आहे काय ?काँग्रेस पक्षाने सत्तेत असताना कायदा व नियमाचे कधी केलेले नाही,त्याचे हा परिणाम आहे. काँग्रेस आपली चूक मोदी सरकारच्या माथ्यावर मारत आहे. प्राप्तीकर प्रकरणाला राजकीय वळण देऊन आपल्या कृत्यावर पांघरुन घालत आहे. याबाबत देशातील चाटूगार पत्रकार व काँग्रेस धार्जिणे विचारवंतांना कळतेय पण वळत नाहीये! दुसरे दिल्लीचे व आम आदमीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल



यांचा मद्य घोटाळ्यात अटक झाली.त्यांनी २०२० मध्ये समिती स्थापन करुन नवीन मद्य धोरण तयार केली. २०२१ मध्ये दिल्लीत नवीन मद्य लागू केली.यात २७ नवीन दुकाने उघडली, मद्य व्यापाऱ्यांच्या कमीशन दोन टक्यावरुन व बारा टक्के केले गेले! केजरीवाल सरकारने मद्यमाफियांच्या संगनत करून मद्य धोरण केले.यात सुमारे करोडोची लाच आम आदमी पक्षाला मिळाली आहे. या दिल्ली सरकारच्या मद्य धोरणावर टीका होताच, ती योजना गुंडाळून ठेवली गेली. यात केजरीवाल यांनी तर तेलंगणाचे माजी केसीआर कन्या के. कविता यांचेकडून शंभर कोटीची रोख रक्कम घेतली व यातील रक्कम गोवा निवडणुकीत खर्च गेली,हे सकृत दर्शनी दिसते आहे.त्यामुळे ईडीने केजरीवाल यांना अटक केली. पण आम आदमी पक्ष यालाही मोदी सरकारचे षडयंत्र म्हणते आहे. दिल्लीचे मद्य धोरण मोदी सरकारने तयार सांगितले होते काय? हे दोन्ही पक्ष भ्रष्टाचारात गुंतले आहेत त्यांच्या या आरोपाला तीळमात्र आधार नाहीये! गुन्हेगार उच्च सुशिक्षित असेल व त्यास कायद्याचे ज्ञान असेल तर पळवाट शोधतोच! तसे घोटाळेबाज केजरीवाल 'तो मी नव्हेच' भूमिका वठवित आहेत. मद्य घाटोळा झाला नाहीये! असे स्वतः ला निर्दोषतत्व ठरवत आहेत. मद्य घाटोळ्यात आम आदमी पक्ष केजरीवाल यांना व ते स्वतः योध्दा व स्वातंत्रवीर ठरवत आहेत. न्यायालयात गांधी व केजरीवाल यांना न्याय मिळत नाही!म्हणून ते आता न्यायव्यवस्थेवर दबाब आणू पहात आहे. न्यायपालिकेवर संशयाचे बोट दाखविले जात आहे हे दुर्देवाचे आहे. देशात राजकीय भ्रष्टाचार प्रकरणात न्यायपालिकेवर दवाब व बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे,असे पत्र ज्येष्ठ विविज्ञ हरीश साळवेसह सहाशे वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांना दिले आहे 'हे लोक दिवसा राजकारणाचा बचाव करतात, रात्री माध्यमासमोर न्यायाधीशांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात.हे राजकीय डावपेच न्यायालयासाठी हानीकारक आहेत.यांचेमुळे देशाच्या लोकशाहीला व संरचेनाला धोका निर्माण झाला आहे,असे स्पष्ट म्हंटले आहे.हे खरे आहे.
आज काँग्रेस आम आदमी व विरोधी पक्ष तेच करत आहे.तो संवैधानिक संस्थेवर हल्ले करू लागला आहे.न्यायालयाने मोदी सरकारचा राजकीय पक्षाच्या देणगीचा रोखे कायदा रद्दबातल ठरविला आहे.तरी भाजपाने आदळआपट केली नाही.त्याचा स्विकार केला आहे.पण विरोधी पक्षाची ही मानसिकता नाही. दिल्लीत आम आदमी पक्ष राबडी सत्ता पटर्न आणण्याची तयारी करत आहे.देशात न्यायालयाने अनेक निकाल हे केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात दिले आहेत.पण विरोधी पक्ष विरोधात निकाल गेला की!न्यायपालिकेवर प्रश्न चिन्ह निर्माण करत आहेत! ते अत्यंत चुकीचे आहे.देशाचे तुकडे करण्याची भाषा करणारा कन्हैयालाल काँग्रेसने त्याला पक्षाचे राष्ट्रीय नेते बनविले! गांधी भारत जोडोची यात्रा काढतात!गांधीवादी गुरुच्या आशीर्वादाने नेते झालेले केजरीवाल हे मद्य धोरण पुरस्कर्ते निघाले! ही विसंगत आहे.या पक्षाला नेत्यांना ना धोरण ना! चारित्र! धर्म पाहुन अब्दुल रशीद,याकूब मेनन,आणि अफझल गुरू यांना राष्ट्रप्रेमी ठरवित असतात.काँग्रेस सरकारमुळे उत्तरप्रदेशातील गाजीपूर भागात डॉन,आणि माफियांने आपले साम्राज्य निर्माण केले, होते.त्यांनी अनेकांची निर्घृणपणे हत्या केली व घरे उध्वस्त केली गेली.या सर्वांची 'कबर' खोदली जात आहे.परवा कुविख्यात डॉन मुख्तार हा जेलमध्ये मेला.लगेच काँग्रेससह इतर विरोधी पक्ष शोक व्यक्त करत आहेत. त्याला 'शहीद' ठरविले जात आहे.या मागे मुस्लिम 'वोटबँके' चे कारण आहे.अमेरिका व जर्मन भारतातील या भ्रष्ट नेत्यांबाबत आपुलकी का दाखवित आहे?काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी पाकमध्येगेले असताना तर मोदी सरकारला हटवावे, काँग्रेसला आणण्यासाठी पाकने मदत करावी,अशी गरळ ओकली होती.पाकिस्तान व बांगला देशात निवडणुकीत जे घडले! त्याप्रमाणे विदेशी राष्ट्राच्या मदतीने भारतीय निवडणुकीत गोंधळाची स्थिती निर्माण करावी देशात अस्थीर सरकार आणले जावे!असे षडयंत्र विरोधी पक्ष रचत आहे,असा संशय येवू लागला आहे.


# सत्तेचा राजमार्ग



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**या जगात कलहाचे मूळ शोधायला गेल्यास फार काही फाफट पसाऱ्यात शिरायची आवश्यकता नाही. दोन तीन बाबी वजा केल्यास हे जग फार सुखी आणि समाधानी होऊ शकते. सत्ता स्पर्धा, स्त्रीवरील अधिकार आणि पैशाचा हव्यास. यात शेवटचे दोन गौण तर सत्ता स्पर्धा महत्त्वाची. कारण प्राचीन इतिहासापासून ते आजतागायत सत्ता स्पर्धेत इतर सर्व बाबी समाविष्ट होतात हा जगाने घेतलेला अनुभव आहे. अगदी सामान्य माणसापासून ते थोर म्हणून गणल्या गेलेल्या विभूती यास अपवाद नाहीत. कारण कोणत्याही प्रकारची सत्ता जगण्याची ऊर्मी देते, प्रेरणा देते.**



## क्षितिजापल्याड

ज्याच्या जगण्याची इच्छा मेलेली असते, तो एकतर ठार वेडा असला पाहिजे किंवा संतत्त्वाला पोहचलेला असला पाहिजे. सामान्य व्यवहारात गुरफटलेली माणसे संतत्त्वाला पोहचणे कठीण असले तरी वेड्यांच्या गटात लवकर समाविष्ट होणारी असू शकतात. त्याचे कारण असे की, या जगात काय चालले आहे आणि आपण काय करत आहोत याचे देहभान ज्याला नसते, त्यास आपण वेडा म्हणतो. या अर्थाने बहुमतात वेडे येणार, हे कोणत्याही थोड्याफार शहाण्यामाणसास कळू शकते. सर्व प्रकारच्या सत्तेचा राजमार्ग हा इतरांना वेडा ठरवून त्यांना कह्यात घेण्यातून जातो. आता असे वेडे ठरवणे ही काही साधीसुधी बाब नव्हे. कारण कोणताही वेडा मनुष्य - अगदी माझ्या तुमच्यासहित स्वतःला वेडा कसा म्हणवून घेणार? कोणताच वेडा असा कबुलीजबाब देणार नाही. उलट मी सोडून बाकी सगळ्यांना वेड कसे लागले आहे, याचे मात्र विविध पद्धतीने विश्लेषण करेल. ज्यांना सत्तासुत्र हाती घ्यायची आहेत त्यांच्याकडे याचे बेमालूम सूत्र असते. याच सूत्राचा वापर सर्व प्रकारच्या सत्तास्पर्धेत हमखास केला गेला आणि भविष्यातही केला जाईल. भीती हे शस्त्र म्हणून एकदा वापरात आले की, त्याचा हवा तेव्हा वापर सत्ताधीश करणार. मग हे क्षेत्र धर्म, जात, राजकारण, शिक्षण, आरोग्य, कुटुंब कोणतेही असो. पूर्वीच्या काळी इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा धर्म प्रबळ होता म्हणून समाजात धर्मगुरूंचा मोठा दबदबा होता. या काळात धर्मगुरूंचा आदेश राजालाही बंधनकारक असल्यामुळे समाजाच्या सर्व प्रकारच्या हालचालींचे नियंत्रण अंतिमतः धर्मगुरूंच्या आदेशाने होत असे. काळ बदलला आणि आपण लोकशाही व्यवस्था जगण्याची रीत म्हणून स्वीकारली. लोकशाहीने माणसा माणसातील भेद संपुष्टात आणून एका मर्यादेत मुक्ततेचे स्वातंत्र्य बहाल केले हे मान्य करावेच लागेल. एका मर्यादेचीमुक्तता म्हणण्यामागे कारण एवढेच की आपण आजही मन मानेल तसे वर्तन करू शकत नाही, व्यक्त होऊ शकत नाही. समाजातील सर्वच माणसे जात्याच अनिर्बंध असतात किंवा स्वैराचारी असतात हे गृहीत धरून ही रचना केलेली असते. समाजात वाईटाचे प्रमाण कोणत्याही काळात फार अल्प असते, परंतु त्याचा प्रभाव सर्व समाजावर पडत असतो. म्हणून सर्वांसाठी एकच नियम लावणे किंवा असे होऊ नये म्हणून बंधने घालणे क्रमप्राप्त होते. एका अनामिक भीतीच्या सावटाखाली चोरांपेक्षा साहुला जीवन व्यतीत करावे लागते तेव्हा समस्या निर्माण होते. कधी या जगाने मोक्षाच्या प्रलोभनाला धर्मगुरूंच्या वशिल्यांची गरज अनुभवली आणि आपले खिसे रिकामे केले तर कधी कर्ज काढून पंक्तावळी उठविल्या. कधी वैयक्तिक पातळीवर उपाशीपोटी अनवाणी पायाने परिक्रमा केली तर कधी सामुहिकरित्या भीतीच्या पोटी जत्थेच्या जत्थे पाण्यात डुबकी मारून पाप क्षालणाची याचना केली. हे सर्व जगाने अनुभवले आहे आणि पुढेही अनुभवाला येणारच आहे. त्याचे कारण माणसाच्या मनात बसलेली भीती होय. आजही लोकशाहीत वावरताना याच भीतीच्या आधारे आपल्याकडून हवे तसे कार्य सर्व प्रकारचा सत्ताधारी वर्ग करवून घेत असतो. मग तो आपल्या ऑफिसमधील बॉस असो की कुटुंबातील कोणी सत्ताकांक्षी व्यक्ती असो. या भीतीच्या मोठ्या सोहळ्याचे स्वरूप आपणास राजकारणात पहावयास मिळते. दैनंदिन जगण्याचे वांधे असताना आम्हाला अकल्पित, अनामिक भीतीच्या सावटाखाली जगण्यास भाग पाडण्यात येते. कारण राजकारण हे विकासाच्या मुद्द्यांवर चालते असे कोणी कितीही म्हटले तरी ते त्यापेक्षा जास्त जनतेच्या मनातील भीतीवर चालत असते. आम्हाला वगळून विरोधकांना निवडूण दिल्यास कोणते धोके भविष्यात निर्माण होऊ शकतात याचे एक कपोलकल्पित चित्र प्रत्येक राजकीय पक्षांकडून चित्तारले जाते. याच भीतीवर



आरूढ होऊन सत्तेचा सोपान चढणे राज्यकर्त्यांना सोपे जाते. खरेतर भीती ही एक मानसिक प्रक्रिया आहे. मी कशालाच भीत नाही असे म्हणणे मूर्खपणाचे लक्षण ठरते. माणसाला हजारो प्रकारच्या भीतीने वेढलेले असते, परंतु त्या सर्व काल्पनिक असतात आणि फक्त दोनच प्रकारच्या भीती खऱ्या असतात असे मानसशास्त्र सांगते. एक म्हणजे मृत्यूची भीती आणि दुसरी भीती असते ती अचानक होणाऱ्या घटनेची. मग यात दोरीला साप समजणे असेल किंवा अचानक होणारा आवाज असेल. याखेरीज जगात भिण्यासारखे काहीच नाही. किमान लोकशाही व्यवस्थेत जगताना तरी आपण घाबरलो नाही पाहिजे, एवढे तरी प्रत्येकाला कळाले पाहिजे. आपल्या घाबरण्यात आपल्या स्वातंत्र्याचा संकोच अनुस्युत असतो, हे आपणास समजत नाही. स्वातंत्र्य हे मूल्य स्वकष्टार्जित असते, ते याचना करून किंवा मागून मिळत नाही याचे भान सदोदित बाळगले तर आपला निभाव लागू शकतो. अमेरिकन काँग्रेसने वर्णव्यवस्था मोडीत काढून निग्रोना स्वातंत्र्य बहाल केले तेव्हा बहुतांश निग्रो पुन्हा गुलाम होण्यास स्वतःहून तयार झाले. इथे भारतात जेव्हा स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणजेच हिंदू कोड बिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर संसदेत मांडत होते तेव्हा हजारो बायकांनी संसदेच्या बाहेर त्याविरोधात मोर्चा काढून त्याचा निषेध केला. हे सर्व येते कोठून? हे येते आमच्या मानसिक गुलामीतून. कारण स्वातंत्र्य हे सर्व मूल्यांचा मेरुमनी आहे हे आम्हांस कधी उमजलेच नाही. आजही स्वतःचे मत राजकीय व्यक्तीला देताना हीच मानसिक गुलामी आमच्या मतपत्रिकेतून उजागर होत असेल तर आमच्या माणूस म्हणून असण्याला कवडीचीही किंमत असणार नाही. क्षणिक प्रलोभनाला, दबावाला किंवा क्षुद्र स्वार्थाला बळी पडून मानसिक गुलामीचे प्रदर्शन मतपत्रिकेतून घडू नये, एवढीच अपेक्षा. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# पण अंतिम विदाई सार्वजनिक स्मशानभूमीतच!



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**कौटुंबिक कामानिमित्त मुंबईला गेलो होतो.काम आटोपल्यानंतर दादर चौपाटीवर जाऊन बाबासाहेबांच्या चैत्यभूमीचे दर्शन घेतले.नतमस्तक होऊन बाबासाहेबांना त्रिवार वंदन केले. बाहेर येऊन अरबी समुद्राचे विस्तीर्ण असे रुप पाहिले.तेथून निघून शिवाजी पार्क मैदानात गेलो.तेथील कठड्यावर बसून मुंबई नगरीचे शहरीकरण पाहत होतो. एकीकडे गगनचुंबी इमारती आकाशाला कवेत घेत होत्या.तर दुसरीकडे थाटात उभे असलेले अलिशान बंगले मुंबई ही श्रीमंतांची महानगरी आहे हे पटवून देत होते.**

सहजच एका बंगल्यावर लिहिलेली पाटी वाचली आणि पाटी वाचून मला आश्चर्याचा धक्काच बसला! त्यावर लिहीले होते - रेसिडेन्शियल रेट ४.५ कोटी रुपये.केवढी ही श्रीमंती ?एवढ्या महाग घरात राहणारे लोक किती श्रीमंत असतील ?आणि दुसऱ्याच क्षणी मनात विचार तरळला- एवढ्या महाग व अलिशान बंगल्यात जरी तुम्ही राहत असाल तरी तुमचा शेवट मात्र एका सार्वजनिक स्मशानभूमीतच होणार हे पक्के ठरलेले आहे.फक्त गंमत एवढीच की स्मशानातील पाटीवर तेथील अंतिम विदाईचे रेट लिहिलेले नसतात!

माणूस जन्मभर काम आणि काम करतो, जास्तीत जास्त पैसे कमावतो. श्रीमंत होणे हे बहुतांश लोकांचे जीवन ध्येय असते.धंदा, जोडधंदा,देवाणघेवाण,गुंतवणूक करत आपल्याजवळ जास्तीत जास्त पैसे कसे येतील हे पाहिले जाते.उद्योग व्यवसायात बरकत येत नसेल तर काळेबेरे करून, फसवणूक करून आणि दोन नंबरच्या माध्यमाने अमाप पैसा कमावला जातो.मग हे लोक मोठे मोठे बंगले बांधतात, महाग गाड्या घेतात,प्रॉपर्टी वाढवतात आणि राजकारणी लोकांना चंदा देतात. 'तेरी भी चूप मेरी भी चूप' हे सूत्र जोपासून एकमेकांना साथ देतात. म्हणून तर श्रीमंत लोक हे आणखी श्रीमंत बनतात. अतिशय चंगळवादी असे जीवन जगतात. त्यांचा थाटमाट, त्यांचा रुबाब, त्यांचा मिजास पहाण्यासारखा असतो.

कोणत्याही क्षेत्रात जा, जिकडे तिकडे एकच गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते की या दुनियेत लोकांची धडपड, मरमर आणि धावपळ फक्त आणि फक्त जास्तीत जास्त पैसा कमावण्यासाठी सुरु असलेले जाणवते. शेअर मार्केट मधील आर्थिक उलाढाल, कंपन्यांची गुंतवणूक, नफा खोरी आणि भ्रष्टाचार यामुळे राजकीय लोक, व्यावसायिक, बिल्डर, कंपनी मालक आणि उद्योगपती अमाप संपत्तीचे धनी बनतात. परंतु,यांचा मृत्यू झाला की पाचपन्नास लोक अंत्यविधीला येतात आणि यांची अंतिम विदाई एका सार्वजनिक स्मशानभूमीत होते. जेथे त्याअगोदर भले भले मोठे लोक राख होऊन निपचित पडलेले असतात. आपण आपल्या महामानवांच्या, समाजसुधारकांच्या समाधीचे दर्शन सुध्दा किती विनम्रपणे घेतो. कारण ते इतरांसाठी, तळागाळातील लोकांच्या उन्नतीसाठी आणि गोरगरिबांच्या कल्याणासाठी जगलेले असतात आणि जे लोक श्रीमंतीच्या अहंकारात जगतात त्यांचा मृत्यू झाला तरीही कोणी हळहळत नाही.आपल्या गावाकडे मजूरी करुन प्रामाणिक जीवन जगलेल्या व्यक्तीच्या अंत्यविधीला सारा गाव जमतो.त्याच्या आठवणी काढून प्रत्येकजण हळहळतो.हीच त्याची खरी कमाई असते.मग खरा श्रीमंत कोण हे लक्षात आले असावे.सांगायचा उद्देश एवढाच की श्रीमंतांचा व गरीबांचाही शेवट एका सार्वजनिक स्मशानभूमीत होत असतो.म्हणून श्रीमंतीचा माज नसावा आणि श्रीमंतीचा टेंभाही मिरवू नका.हसतखेळत जगा, प्रामाणिकपणे काम करत राहा आणि इतरांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करत राहा.पृथ्वीच्या निर्मिती पासून ते आजपर्यंत पृथ्वी वर आले किती आणि गेले किती याची नोंद कोणत्याही स्मशानभूमीत नोंदवली गेली नाही.मग तुम्ही दररोज कशासाठी आपल्या संपत्तीचा हिशोब करत बसता?

कोरोनाच्या भयंकर अशा साथ रोगाच्या काळात कोरोनाग्रस्त रुग्णांचा मृत्यू झाल्यावर त्याच्यावर अंत्यसंस्कार कोणी व कसे केले याची आठवण काढली तरी अंगावर काटा येतो.भयानक अशा परिस्थितीत श्रीमंती कामाला आली नाही की पैसा कामाला आला नाही.म्हणून फक्त माणूस म्हणून जगायला सुरुवात केली की मानवी जीवनातील समस्या आपोआप सुटणार आहेत.मरणाची आणि सार्वजनिक स्मशानभूमीची भीती कधीच वाटणार नाही.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार, ३१ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २१७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 31 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-217 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05





# वारकऱ्यांनी दुमदुमली नाथनगरी

## चारशेच्यावर दिंड्या दाखल : काल्याच्या दिवशी हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** आलो नाथा तुझ्या घरी भानुदास एकनाथ नाममुखी देव आनंदी सदा म्हणत शनिवार (३०) रोजी सायंकाळी पाई दिंड्यासह वारकरी पैठण नगरीत शेकडो दिंड्या दाखल झाल्या.गोदावरी नदीचा वाळवंट, विविध मठ, उद्यान परिसर आदी ठिकाणी दिंड्या आपल्या फडावर सांयकाळी विसावल्या, षष्ठी निमित्ताने नाथ समाधी मंदिर व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसले आहेत तसेच मंदिर परिसरात भाविकासाठी पिण्याचे पाणी तसेच भोजनाची सोय करण्यात आली असल्याची माहिती नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे यांनी दिली. दरवर्षी सात लाखांपेक्षा जास्त भाविक उपस्थित राहतात. यंदा वारकर्यांचा उत्साह तितकाच आहे. यंदा मात्र षष्ठीवर अवकाळी पावसाचा फटका बसतो कि काय म्हणून न.प. प्रशासनाने आलेल्या दिंड्याचे आपत्कालीन व्यवस्था केली असुन शहरातील शाळा प्रमुख्याने तीन दिवस ठेवण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी दिली.

यात्रे निमित्ताने पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी केली असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पोलिस प्रशासनाकडुन मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. सकाळपासून पैठण संभाजीनगर, पैठण -पाचोड पैठण - शेवगाव ,शहागड आदी विविध मार्गावरून नाथ षष्ठी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी दिंडया मार्गक्रमण करीत होत्या.

**माऊलीचा दिंडी सोहळा पैठणमधे दाखल :** संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आपेगाव येथून ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा नाथ षष्ठी उत्सवासाठी पैठण नगरीत दाखल होताच माऊलीचे जोरदार स्वागत करण्यात आले . यावेळच्या दिंडीचे पैठण दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती .यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया,प्रा .युवराज औटे, तालुका सचिव रामेश्वर सुसे, स्वदेश पांडे,जितेंद्र पांडे, ज्ञानेश्वर कापसे, सचिन उंडाळे, बंडू महाराज गाडे,दिनेश पेंढारकर,माऊली करमाढकर,योगेश लोहीया,उमेश तट्टू पाटील, यांनी जोरदार स्वागत केले .

**प्रशासनाच्या वतीने वेशीवर दिंड्यांचे भागवत ग्रंथ देवुन स्वागत :** पैठण शहरात दुपारपासूनच शेकडो दिंडया दाखल झाल्या त्याप्रसंगी न .प .प्रशासन,तहसील प्रशासन,पंचायत समिती,पोलीस प्रशासनाने दिंड्याचे स्वागत केले .यावेळी न .प .चे मुख्याधिकारी संतोष आगळे,तहसीलदार सारंग चौहान,पोलीस उपअधीक्षक ग्रामीण सुनील लांजेवार,उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ .सिध्देश्वर भोर,पोलीस निरीक्षक संजय देशमुख,गटविकासअधिकारी संजय कुलकर्णी,राजेश कांबळे आदिनी दिंड्याचे स्वागत केले .



# नाथवंशज सुवासिनींनी केली लक्ष्मी आईची विधीवत पूजा

## संत एकनाथानी मानलेल्या बहीणीस म्हणजे लक्ष्मीदेवीस अक्षता देऊन षष्ठीचे आमंत्रण

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** पंचमीच्या मुहर्तावर शनिवारी सकाळी नाथवंशज कुटुंबीयांनी प्राचिन लक्ष्मी मंदीरात पारंपारिक पध्दतीने पुजा केली व संत एकनाथ महाराजाच्या या मानलेल्या बहीणीस म्हणजे लक्ष्मीदेवीस अक्षता देवून नाथषष्ठीच्या सोहळ्याचे प्रथेनुसार आमंत्रण देण्यात आले. संत एकनाथ महाराज समाधी मंदीरा पाठीमागे असलेल्या प्राचिन लक्ष्मीआई देवीस पंचमिच्या मुहर्तावर प्रतिवर्षाप्रमाणे साडी, चोळी देवून खण नारळानी ओटी भरून नैवद्य दाखवण्यात आला. नाथषष्ठीच्या अदल्या दिवशी पंचमिच्या दिवशी नाथवंशजाकडून पुर्वीपासुन सुवासिनीच्या हातून विधिवत पुजा करण्यात येते संत एकनाथ महाराजानी या देवीला बहीण मानले असल्याची माहीती नाथवंशज ह.भ.प. रघुनाथ महाराज पालखीवाले यांनी दिली यावेळी नाथवंशज घरातील सुवासिनी सौ. उल्काताई पालखीवाले, सौ. ऐश्वर्या पालखीवाले सौ.अपूर्वा पालखीवालेसह चोपदार कृष्णा बढे उपस्थित होते.

## कार्यालय नगर परिषद पैठण

Email munptn@gmail.com | दुरध्वनी नंबर 02431-223010

जा.क्र.नपपै/यात्रा/कावि/2024/5091 | दिनांक :- 30/03/2024

(शिक्का: नगर परिषद, पैठण)

### "जाहिर आवाहन"

पैठण शहरातील सर्व नागरीकांना व यात्रेकरुना सुचित केले जाते की, यात्रेच्या काळात ताप, सर्दी, खोकल्याचा संसर्ग होऊ नये म्हणुन खालील दक्षता व उपाययोजना करावी रोगाचा प्रसार व संसर्ग होणार नाही. यासाठी सहकार्य करावे.

1) तापेचा साथीचा उगम हा घरोघर साठवलेल्या पाण्याच्या माध्यमाने होत असतो त्या करीता दिर्घ काळातील साठवलेले पाणी काढुन टाकावे व पाण्याचा हाऊद स्वच्छ करुन घ्यावा पाणी गाळुन व उकळुन प्यावे.
2) यात्रेकरुने व पैठण शहरातील दुकानदाराने नगर परिषदेची परवानगी घेऊनच दुकाने लावावीत.
3) विक्रेत्यांनी विक्रीच्या ठिकाणी शिळे, उघडे अन्न व सडलेला भाजीपाला, फळे विक्रीसाठी ठेऊ नये अन्न पदार्थ झाकुन ठेवावेत.
4) गोदावरी नदीत पोहण्यास सक्त मनाई आहे.
5) गोदावरी नदीच्या पात्रात पाण्यासाठी खड्डे व झरे करुन पाणी पिण्यासाठी वापरु नये.
6) हॉटेल धारकांनी पिण्याचे पाणी साठविण्याचे हाऊद, रांजण, माठ इत्यादी दररोज स्वच्छ धुऊन घ्यावेत.
7) दुकान दारांनी केर कचरा, घाण रस्त्यावर टाकु नये आपला परिसर स्वच्छ ठेवावा.
8) नागरीकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा व पाण्याचे डबके तयार होऊ देऊ नयेत साचलेले पाणी काढुन टाकावे व जंतु नाशक औषधाचा वापर करावा.
9) शहर स्वच्छतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.
10)पाण्याचा अपव्यय टाळावा.
11)पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा.
12)सार्वजनिक रस्ते, खुल्या जागा इत्यादी परिसर अस्वच्छ करु नये.
13)नाल्यामध्ये केर कचरा टाकु नये.
14)जनावर धारकांनी आप आपले जनावरे मोकाट फिरणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
15)आरोग्याच्या दृष्टीकोणातुन काही माहिती, मदत किंवा मार्गदर्शन हवे असल्यास पैठण ग्रामिण (सरकारी रुग्णालय) विभागाशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत:-
(संतोष आगळे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद पैठण

सर्व कर्मचारी वृंद नगर परिषद पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर

# गुलजार : एक अनोखे व्यक्तिमत्त्व



डॉ. नीता पांढरीपांडे
संपर्क क्र. 7659064555

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटाच्या सुवर्णकाळातील एक गुलजार व्यक्तिमत्व म्हणजे गुलजार. एक कवी, पटकथा लेखक, दिग्दर्शक अशा सगळ्याच क्षेत्रात भरारी घेतलेल्या गुलजार बद्दल सर्वांच्या मनात कुतूहल वाटत आलेला आहे. साधं पण अत्यंत प्रतिभावान बहुआयामी व्यक्तिमत्वाकडे मन खेचत गेलेलं आहे. विमल रॉय यांनी गुलजारला चित्रपटाकडे वळण्यास उद्युक्त केले. 1963 साली आपल्या 'बंदिनी' चित्रपटात त्यांनी गुलजारला संधी दिली आणि गुलजारने त्या संधीचे सोने केले. 'मोरा गोरा अंग लै ले' हे त्यांनी लिहिलेले गाणे अत्यंत लोकप्रिय झाले. चित्रपटाची नायिका कल्याणी आपल्या वडिलांकडून हे गाणे रोज ऐकते 'कुछ खो दिया है पाई के/ कुछ पा लिया गवाई के/ कहॉ ले चला है मनवा/ मोहे बावरी बनाई के/ गाण्यातील शब्द काहीसे वैष्णव श्लोकांकडे झुकलेले दिसतात.**

गुलजारच्या प्रत्येक गीतातून त्यांचा आयुष्याकडे, आयुष्यातील प्रत्येक गोष्टीकडे, प्रत्येक प्रसंगाकडे बघण्याचा दृष्टिकोन किती वेगळा आहे हे पदोपदी जाणवतं. आयुष्यातील सुखदुःखाला, माणसांच्या भावनांना, अचूक वाचा फोडण्याचे काम गुलजारनी लीलया केले आहे. 1970 नंतरचा चित्रपटाचा तिसरा प्रवाह अर्थपूर्ण चित्रपटांचा होता. एकामागून एक दुर्मिळ चित्रपट या काळात प्रदर्शित झाले.. गुलजारने कलेची नवनवी आव्हाने स्वीकारत नवीन प्रयोग करण्याचे धाडस करून कलेच्या अर्थपूर्ण, उपयुक्ततेवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला.

माणसाच्या मनातील भावनांना गुलजार सुंदर अभिव्यक्ती देतात. या भावना अनेकांना जाणवत असतात पण व्यक्त करता येत नाहीत म्हणूनच गुलजारचे शब्द रसिकांना संमोहित करतात.

नातेसंबंधांना घेऊन गंभीर विषय कधी हृदयस्पर्शी तर कधी खेळकर रीतीने सोप्या रंजक पद्धतीने मांडण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांनी सर्वप्रथम 1971 साली मेरे अपने' चित्रपटाचे दिग्दर्शन केले. अचानक', 'आंधी', 'कोशिश', 'मौसम', किताब', 'अंगूर', 'खुशबू', 'नमकीन', इजाजत' असे एकाहून एक सरस चित्रपट या काळात प्रदर्शित करून चित्रपट प्रवाहाला त्यांनी नवी दिशा दिली.

गुलजारचे प्रत्येक गीत हे त्यांचे वेगळेपण उलगडणारे असेच आहे. 'जीने के लिये सोचा ही नही, दर्द संभालने होंगे, मुस्कुराये तो मुस्कुराने के कर्ज उतारने होंगे, तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हूं मै' गाण्यातील गंभीरता, औदासिन्य मनाला घरे पाडते. जीवनातील होणाऱ्या प्रत्येक बदलांना अचूक ओळखून, जेंव्हा संकटे येतात तेंव्हाही चेहऱ्यावर हसू ठेवून वावरावे लागते, यालाच जीवन म्हणतात याची जाणीव गुलजार करून देताना दिसतात.

गाण्यातील दुःखार्त स्वर देखील मृदु भासतात आणि म्हणूनच त्यातून माणसाला मानसिक बळ प्राप्त होते. आयुष्यातील कठीण प्रसंगांना तोंड देण्याची शक्ती लाभते, त्यासाठी ते खंबीरपणे उभे राहतात. जीवनातील असे कठीण प्रसंग माणसाला बरेच काही शिकवून जाते. त्यातूनच आयुष्य घडत जाते हे सत्य अतिशय मोजक्या शब्दात गुलजार मांडतात. एकीकडे हृदय पिळवटून टाकणारी गाणी लिहिणारे गुलजार आजच्या काळातही सुसंगत गाणीही त्याच वकूबीने लिहितात तेंव्हा रसिक मंत्रमुग्ध होतो. 'कजरारे कजरारे तेरे काले काले नैना', 'झूम बराबर झूम शराबी', 'चप्पा चप्पा चरखा चले', सुन सुन दीदी तेरे लिये एक रिश्ता आया है' अशी कितीतरी गाणी लिहून त्यांनी युवा वर्गाला आकर्षित केले आहे. त्यांचे प्रत्येक गीत त्यांचे वेगळेपण दाखवत रसिकांसमोर उलगडत जातं. त्यांच्या मनाला भुरभ घालण्याचे सामर्थ्य गुलजार मध्ये आहे आणि म्हणूनच गुलजारची रचना म्हटल्यावर नक्कीच काहीतरी जरा हटके ऐकायला, बघायला मिळणार ही रसिकांना खात्री असते आणि त्याची तो आतुरतेने वाट बघत असतो. गुलजारच्या चित्रपट गीतांच्या रचनेकडे बघता एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे त्यांच्या शब्दसंग्रहातून जवळजवळ रुढ उपमा काढून टाकून त्यांनी नवीन प्रतिमा, उपमा आणि रूपकांचा प्रयोग केलेला आहे. 'तेरी बातों मे किमाम (तंबाखू) की खुशबू है, हो तेरा आना भी गर्मीयों की लू है।(बंटी और बबली), गुलपोश('फुलों से ढाका हुआ) कभी इतराए कहीं, महके तो नजर आ जाये कहीं, आणि आँखो ने कुछ ऐसे छुआ, हलका हलका उन्स (प्यार, स्नेह) हुआ,( दिल से) 'गीला मन शायद बिस्तर के पास बडा है' (इजाजत), टुटी हुई चुडियों हे जोडू ये कलाई मै' (यारा सिली सिली), डोली पडी पडी ड्योढी में, अर्थी जैसी लागे (माचीस), लब तेरे युं खुले जैसे हर्फ (शब्द) थे, हाथ पर युं घुले जैसे बर्फ थे'(हैदर), गिली नदी के परे, गीलासा चांद खिल गया'(लिबास), सिद्ध इस तरह बहती है, जैसे खुश्क रुखसारों पे खुले आंसू चलते हो'(रेनकोट) अशी अनेक उदाहरणे देता येतील. अशा अनोख्या कल्पना, उपमा, त्यांच्यातील मनस्वी कलावंताची साक्ष देतात.

चित्रपटातील घटनाानुसार, प्रसंगानुरूप गीत लेखन करण्यात गुलजारचा हात कुणीच धरू शकत नाही. 'नाम गुम जायेगा' मधील भाव वेगळा, 'मीठे बोल बोले' मधील गोडवा पुन्हा पुन्हा ऐकत राहावा असा वाटणारा, 'तेरे बिना जिंदगी से कोई' मधले प्रेम समर्पण कानाला सुखावणारे तर 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है' मधले औदासिन्य विचार करायला लावणारे आहे. 1990 दशकाच्या उत्तरार्धात भारतीय सिनेमाने अभिव्यक्तीच्या शैलीत आणि वेशभूषेत बदलत्या काळानुरूप बदल घडवून



आणले. त्या काळातही गुलजारने आपल्या चहात्यांना निराश केले नाही. 1993 मध्ये रुदालीसाठी 'मौला हो मौला... जिंदगी की आग मे काहे को जलाते हो, कागदी शरीर का झोला भूख मिटाए रे, प्यास बुझाए रे, पानी प्रीत का घोला' भूपेन हजारीकाचा आवाज या गाण्यात देशभर घुमला आणि आसामच्या लोकगीताची सावली भारतभर तरंगताना दिसली. गुलजारने बाजारवादाच्या अंधकारमय युगात गुणवत्ता तर टिकवलीच पण प्रासंगिकता देखील टिकवली. त्यांनी जे लिहिले त्याची प्रासंगिकता अधिक आहे कारण आजच्या काळात जिव्हाळ्याची नाती हळूहळू नाहीशी होत चाललेली आहे. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, नातेसंबंध यापेक्षा माणूस अधिक व्यवहारी झालेला आहे. युवा वर्ग प्रेम प्यार या पवित्र शब्दांकडे औपचारिकपणे बघतो आहे. त्यातही व्यवहार शोधतो आहे. अशावेळी गुलजारचे शब्द माणसाला प्रेम हाच आपल्या आत्म्याकडे जाणारा सुंदर मार्ग आहे याची वारंवार जाणीव करून देतो. या काळात गुलजारनी आपल्या भावपूर्ण रचनांनी सिद्ध केले की प्रतीके बदलली तरीही मनातील भाव प्रगट करणे कठीण नसते. 'नो स्मोकिंग' चित्रपटासाठी लिहिलेल्या गीतातून त्यांनी ते सिद्ध केले- 'हवा से फूंक दे हयात फूंक दे ,सांस से सीला हुआ लिबास फूंक दे'. म्युझिक डायरेक्टर विशाल भारद्वाज आणि गायक सुखविंदर सिंग आणि सुनिधी चौहान यांनी गाण्याला पूर्ण न्याय दिलेला आहे. 'जब नशा टूटता है कितने टुकडे गिरे, होश चुनने लगे हम, हम भी क्या सरफिरे हैं, लब पे जल रही है वह बात फूंक दे, राख फूंक दे, फूंक दे वह बात.

माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी, भावनांना व्यक्त करण्यासाठी, जीवनाला तपस्येत बदलण्यासाठी त्यांच्या अस्वस्थेतला शब्द देण्यासाठी धडपडणारी लेखणी गुलजारकडे होती. ज्याचा त्यांनी पुरेपूर उपयोग केलेला आहे.

गुलजारचे भाषांचे वैभव, निरनिराळ्या प्रतिमा, अनोख्या उपमा, भावनांची उत्कटता, त्यांची सखोलता, लोकजीवनाचे विविध रंग, निसर्गाच्या अनोख्या छटा, मनोव्यापार, अध्यात्मिकता यांचे इतके सुंदर अनोखे मनोहारी रंग गुंफले. गुलजारनी आपल्या शब्दांची अशी काही जादू केली, अप्रतिम अशी मूर्तवेढ रोवली की ऐकणारे आश्चर्यचकित झाले. गुलजार रसिकांच्या समोर अशाप्रकारे येतात की रसिक मंत्रमुग्ध होतो आणि गुलजार बरोबर त्यांचे बंध अधिकाधिक घट्ट होत जातात.

गुलजारविषयी लिहावे तेवढे कमीच आहे. त्यांच्याविषयीचा आदर आणखी वाढेल आणि मनातल्या भावना सर्वांपर्यंत पोहोचतील म्हणून हे लिखाण. त्यांच्याविषयी लिहायला बसले तर लेखणीतून शब्द झिरपू लागतात, त्यांच्या प्रत्येक गीतावर समीक्षकांनी काहीतरी लिहावे अशीच त्यांची प्रत्येक गाणी आहेत कारण प्रत्येक गीतात त्यांचे स्वतःचे असे वेगळेपण स्पष्ट दिसते, जे मोहक एकमेव द्वितीय आणि रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे आहे.

# मन मनो मार्गे गेला तो तेथेचि मुकला...



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052


आधुनिक केसरी

**आपण सर्व जगाला ओळखल्याचा दावा करत असतो, पण आपलं मनंच आपल्याला ओळखता येत नाही. म्हणूनच तर जीवन जगत असताना आपल्याला अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. कारण संत बहिणाबाई म्हणतात ," मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर | किती हाकलू हाकलू, तरी फिरुनी येतं पिकांवर ||" अतिशय चंचल असणारे आपले मन कधीच स्थिर होत नाही, ते स्थिर होतं ते फक्त नामामुळेच. आपण कितीही निश्चय केला तरी कधी कधी आपलं मन पांगळं होतंच असतं. कारण आपण सगळ्या गोष्टीवर काम करतो पण मनावर काम करत नाही, म्हणून मन अधिकाधिक विषयात रमतं. मनासारखं झालं तर आपण हुरळून जातो.**

व मनासारखं नाही झालं तर खचून जातो म्हणून नेहमी एक गोष्ट सतत मनाला सांगत राहावी की, "ये भी चला जाएगा" | मग मन अशांत होत नाही. जसे पाणी शांत असेल तरंच त्या पाण्यात प्रतिबिंब दिसते अगदी तद्वतच मन स्थिर असेल तर त्यात स्वछ अंतः करणाचे प्रतिबिंब दिसते. परमार्थ आणि नामस्मरण च मुळी अंतःकरण शुद्धी साठी आहे. परमार्थ करत असताना आपलं मन हे पांगळं असावं व प्रपंच / व्यवहार करताना ते भक्कम असावं. आपलं असतं उलटं प्रपंच्यात त्याला काय वाटेल, ते काय म्हणतील, या विचाराने पांगळे होतो आणि दुःख भोगतो. या उलट भगवंत म्हणा, निसर्ग म्हणा, विश्वाचा चालक मालक पालक म्हणा त्याला सांगा तूच करता करविता आहेस, जे तू करशील तेच माझ्यासाठी योग्य आहे. कारण मी हे जाणतो की, माऊली म्हणतात त्याप्रमाणे, "जैसे कर्म केले तैसे फळासी आले | उपजले मेले ऐसें किती ||" इथे मन पांगुळले पाहिजे म्हणजे जीवनात आनंदी आनंद राहतो. त्यासाठी आवश्यक आहे तो इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह. आपण सतत मनाशी बोलत असतो ते आपण थांबवलं पाहिजे, कारण मनाशी बोलताना आपण विषयात रमतो म्हणजे स्व स्वरुपा पासून बाजूला जातो म्हणजेच नरक यातना भोगत असतो.

मनाचा मनाशी संवाद थांबला की आपण स्व स्वरूपात गर्क होतो म्हणजेच आपण स्वर्ग सुख घेत असतो. मग दुसरीकडे कोठे पाहायचा स्वर्ग आणि नरक. त्या सर्व कल्पना सोडून वर्तमानात जगलं पाहिजे. म्हणजे आनंद मिळेल. एकतर आपण भूतकाळात असतो... माझ्याशी कसं कोण वागलं, मी काय काय सहन केलं... किंव्हा भविष्यकाळात रमतो... मी किती प्रगती करणार, मुलांसाठी काय काय करणार...माझं कसं होणार या कल्पनेनेच आपण सतत चिंतेत असतो व दुःख भोगतो. म्हणून आपण वर्तमानात जगलं पाहिजे तिथे चिंता व भय नाही आहे फक्त आनंदी आनंद. म्हणून संत कबीर म्हणतात, "मन के मते न चालियो, मन के मते अनेक | जो मन पे अफसा नहीं, ओ साधू कोई एक"|| कारण आपलं मन सतत कामात, क्रोधात, मोहात म्हणजेच षडगुणात- षड्विकारात अडकलेले असते. मला सर्वांनी चांगलं म्हणावं, माझं नेहमी कौतुक व्हावं त्यासाठी आपण विश्वाचा रचिता भगवंत त्याला सुद्धा नावे ठेवतो परंतु संत म्हणतात, कामी, क्रोधी, लालची इनसे भक्ती न होय | अरे भक्ती करे ओ सुरमा जात भरण कुल होय"|| ह्या मनामुळेच राग द्वेष, लोभ निर्माण होतात म्हणून आपण आधी स्वतःच्या मनावर काम करायला हवे.

कारण मन, बुद्धी, इंद्रिय यांना चालवणारा भगवंत आहे. आणि हा भगवंत चराचर सृष्टीत तत्वरूपाने भरून उरला आहे. फक्त आपण कसे पाहतो ते आपल्या मनावर, विश्वासावर, श्रद्धेवर अवलंबून आहे. संत म्हणतात, जे जे भेटे भूत | ते ते माने मी भगवंत || संतांना दगड मातीत भगवंत दिसला आपल्याला किमान माणसात, या चराचर सृष्टीतील चौऱ्यां ऐंशी लक्ष योनीतील जीवात तरी भगवंत दिसावा. त्यासाठी आपण नम्र होऊन नमन करायला हवे म्हणजेच नमन करताना आपलं मन तिथे जागृत असू नये. कारण मन हे इंद्रियांचा राजा आहे. त्यासाठी आपण मनाच्या अधिन असू नये, मन आपल्या अधिन असावं, जे संतांचं मन




**संत साहित्यातील तत्वज्ञान : भाग-१**

त्यांच्या अधिन होतं म्हणून इहलोकात त्यांना किती यातना झाल्या असल्या तरी त्याचा उल्लेख कोणत्याच ग्रंथात दिसून येत नाही. उदा. जगाची माऊली त्यांना खूप त्रास दिला परंतु त्याचा उल्लेख ज्ञानेश्वरी मध्ये कोठेही दिसत नाही, त्याउलट आपण एक क्षण मनाविरुद्ध झालं की लगेच आपण ह्या सोशल मीडियाच्या काळात लगेच व्हाट्स अँप च्या स्टेटस ला, फेसबूकला, ... सर्व ठिकाणी लगेच टाकतो आणि ज्या व्यक्तीसाठी लिहले हे त्यांनी पाहिले का नाही सतत चेक करत राहतो, नाही पाहिलं तर अजून मनस्ताप आणि पाहिलं तर फक्त मानसिक समाधान. म्हणून संत म्हणतात, मनो मार्गे गेला तो तेथेचि मुकला, हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य" || म्हणून इच्छा रहित जे मन आहे तेच चैतन्य आहे तिथेच भगवंत आहे त्यासाठी एक दृष्टांत- एका माणसाने एक गाढव पाळलेले असते. तो त्या गाढवावर जीवापाड प्रेम करत असे, आपल्या स्वतःबरोबरच त्या गाढवाला खाऊ- पिऊ, न्हाऊ घालत असे.तो व्यक्ती त्या गाढवाची खूप काळजी घ्यायचा. एक दिवस त्या माणसाला असे वाटते की, आपण काशीला जावे, पण एकटेच कसे जायचे म्हणून तो गाढवालाही सोबत घेऊन जायचा निश्चय करतो. मग गाढवाला सोबत घेऊन जात असताना तो त्याला आंघोळ घालतो, स्वच्छ कपडे घालतो, हार फुले त्याच्या गळ्यामध्ये घालतो आणि सोबत घेऊन जातो.

तो जात असताना सगळेजण त्याच्याकडे आश्चर्याने पाहत असतात, तो त्या गाढवाला एक क्षणही स्वतःपासून बाजूला वेगळं करत नाही, जोपर्यंत त्या माणसाने गाढवाला धरलेला आहे तोपर्यंत गाढव ही त्याच्यासोबत चालत राहतं. असं प्रवास करत करत असताना ते काशीला पोहोचतात आणि मंदिरात गेल्यानंतर त्या व्यक्तीला असं वाटतं की आपण एवढं सगळं केल्यानंतर, इथपर्यंत गाढवाला आपण घेऊन आलो म्हणजे त्याला कळलं असावं की आपण भरकटायला नको, आपण घाणीमध्ये लोळायला नको... म्हणून तो व्यक्ती भगवंताचे दर्शन घेण्यासाठी हात जोडतो व डोळे बंद करतो. तेव्हा जसं गाढवाचा हात सुटला तसं गाढवाला अतिशय आनंद झाला, कारण तो त्याच्या मालकासोबत काशीला आला होता, व्यक्ती डोळे बंद करून भगवंताचं दर्शन घेत होता आणि गाढव मात्र आपला आनंद व्यक्त करण्यासाठी बाहेर पडला. आता गाढवाला आत्यानंद झाल्यानंतर तो व्यक्त करण्यासाठी तो उकिरडा शोधू लागला.इकडे तिकडे खूप पाहिल्यानंतर गाढवाला भला मोठा उकिरडा दिसला. गाढव तिथे गेले आणि त्या कचऱ्यामध्ये, त्या घाणी मध्ये लोळू लागले. तोपर्यंत ह्या व्यक्तीचे दर्शन झाले डोळे उघडले, पाहतो तो काय गाढव सोबत नाही, त्यांनी सगळीकडे शोधण्याचा प्रयत्न केला. पण गाढव काही दिसलेच नाही, ते शोध घेत असताना मंदिराच्या बाहेर आले तर त्याला ते गाढव कचऱ्यामध्ये लोळताना दिसले. त्या व्यक्तीला स्वतःचाच खूप राग आला, त्याला एवढा पश्चाताप झाला की, त्याला एवढं जपलं, एवढा जीव लावला, किती स्वच्छ ठेवलं, हवं नको ते दिलं, पण ते गाढव ते शेवटी गाढवच निघालं, ते घाणीतच लोळायला लागलं. हा झाला दृष्टांत ... सिद्धांत संगत करे साधू की, तो हो जाये दो दो बात | संगत करे गधे की तो मिल जाये दो दो लाथ || इथे गाढव म्हणजे आपले स्वतःचे मन होय, नामस्मरणाने जेवढं घट्ट पकडता येईल तेवढं आपण पकडून ठेवायचे मनाला वळण लागे पर्यंत... परंतु जसा हात सुटला की ते मन लगेच विषयाकडे धाव घेते. तिथे आपण सावध झालं पाहिजे.

**म्हणून संत म्हणतात "मनाची मनी गुंफियेला शेला, बाप रखुमादेवी वर विठ्ठली अर्पियेला" || भगवंत दयाळू, कनवाळू आहेच आहे फक्त आपण त्याची संगत केली पाहिजे. म्हणून संत सांगतात त्याप्रमाणे, एक तत्व नाम दृढ धरी मना | हरीशी करुणा येईल तुझी ||**

# कॉरिडॉर गेला कुठे ?



दत्ता तरलगट्टी
मुक्त पत्रकार

आधुनिक केसरी

**गेल्या दोन महिन्यापूर्वी कॉरिडॉरचा बागुलबुवा पसरला होता. कॉरिडॉर होणार पुन्हा आपली घरे दुकाने जाणात्रर या विचाराने अनेक पंढरपूरवासी त्रस्त,भांबावून गेलेले, कसं होणार या काळजी मध्ये दिसत होते. पण जसे जसे निवडणुकीचे वातावरण तापू लागले तसे हा विषय चर्चेतून गायब झाल्यासारखे वाटते आहे. अनेक लोक तो होणारच आहे. असे ठामपणे सांगतात. तो झाला तर आता रोज एक लाख भाविक येत असतील तर त्यात वाढ होऊन दररोज तिन एक लाख भाविक येतील व पंढरपूरकरांची आमदनी वाढेल,व्यापार उदीम वाढेल असे म्हणतात. पण ज्यांच्या जागा जातील त्यांचे काय?जिथल्या तिर्थक्षेत्री कॉरिडॉर झालेत तेथील ज्यांच्या घरावरून बुलडोझर फिरला त्यांच्या व्यथा पाहून ऐकून ते नकोसे वाटते.**

कॉरिडॉर म्हणजे नुसते रस्ते मोठे करणे, कमानी बांधणे, मंदिराच्या भोवती संरक्षक भींत बांधणे, कारंजे, सुशोभीकरण करणे म्हणजे कॉरिडॉर का ?खरं तर या सर्वांची गरज आहे तरी का? तुळसीवृंदावनाचे काम पूर्ण होऊन काही महिने लोटले तोच आतील छोटी मंदिरे पडली. कदाचित धर नसल्यामुळे पडले असावे.म्हणून जे करायचे ते दीर्घकाळ टिकणारे असावे. कॉरिडॉरची गरज पंढरीरायाच्या भक्तांना नाहीच. कारण ते केवळ विठ्ठल दर्शनाच्या ओढीने येतात.कॉरिडॉरची चर्चा जशी शहरात सुरू झाली तशी लोक धास्तीने गावा बाहेर मोकळे प्लॉट खरेदी करण्यासाठी प्रयत्न करु लागले. घेणारे धास्तीमुळे तर विकणारे घेणाऱ्याची गरज म्हणून आव्वाच्या सव्वा किंमती सांगू लागले आहेत. विकणाऱ्यांच्या पथ्थावरच कॉरिडॉर पडला आहे असे वाटू लागले आहे.

जेव्हा नमामी गंगेचा आवाज घुमला तेव्हा नमामी चंद्रभागेचीही स्वच्छता मोहीम हाती घेण्यात येणार हे जाहीर करण्यात आले. पण प्रत्यक्षात काहीच झाले नाही. दरवर्षी पर्यावरणवादी जलदिंडी काढून पर्यावरणाचा व नदी स्वच्छतेचा नारा देतात.

चंद्रभागेच्या वरील कारखानदारांना नदीत रसायन मिश्रीत पाणी सोडू देऊ नका हे सतत सांगतात पण याकडे कोणीच लक्ष देत नाही. परिणामी पाणी गढूळ, काळपट,फेसाळ, असे दिसते.

ज्या पाण्यात पवित्र स्नान करु वाटत नाही, तिथे पवित्र जल तिर्थ म्हणून कसे घेणार.या उलट नर्मदा परिक्रमेवेळी तिथल्या कुटीतील भाविकाने विकतचे पाणी का पिता नर्मदे चे पाणी प्या ना. सर्व पोटातील व्याधी कमी होतील असे सांगण्यात आले. इथे कोणते रोग होतील हे सांगता ही येणार नाही.

परवा भाविकांनी, काही परगावच्या मंडळांनी, महाराज मंडळींनी पात्र स्वच्छ केले. ते पुन्हा खराब होऊ नये यासाठी प्रबोधनाची गरज आहे. कॉरिडॉरवर खर्च करण्या पेक्षा नदी स्वच्छता, जल स्वच्छता, प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई, स्नान करणाऱ्या महिलांसाठी कपडे बदलण्यासाठी चेंज रुम, स्त्रियांच्यासाठी स्वच्छता गृहे मोठ्या प्रमाणात बांधणे गरजेचे आहे. गावात स्त्रियांना प्रदक्षणा वेळी,बाजारहाट करतांना त्यांना स्वच्छतागृह सापडतच नाहीत. सर्वच स्त्रियांना ते न सापडल्याने अडवून ठेवावे लागते. मंदिर परिसरात एकाच ठिकाणी ते चालू आहे व तेथेही पाच रुपये आकारले जातात. स्त्रियांची मोठी कुचंबणा पंढरीत भाविक म्हणून आल्यावर होते.

रस्ते मोठे करुन काय साधणार...?आताचे रस्त्यावरुन अगदी आषाढी वारीत ही लोक व्यवस्थित जातात, चालतात, फक्त या वारी काळात कुठल्याही प्रकारचे वाहन प्रदक्षणा रस्त्यावर येऊ दिले नाही तर वारी सुखावह होईल. पण वाहनांकडे, पथारी पसरुन बसणार्या व्यावसायिकांना बसण्यास मज्जाव कोण करणार? अगदी एकादशी दिवशीही हातगाडेवाले बिनदिक्कत प्रदक्षणा रस्त्यावर फिरत असतात,मध्येच उभे असतात. कैक वेळा पोलिसांनी हाकलले तरी पुन्हा थोड्या वेळाने आहे तिथच दिसतात. यात बांगड्यावाले, प्रसाद विकणारे, गुडीशेव पेढा पेठा विकणारे विक्रेते, लहान मुलांच्या कपड्यांचे विक्रेते,पेढेवाले भरपूर चारचाकी गाडे घेऊन उभारतात, यांचे प्रमाण ही वाढत चालले आहे. रस्त्यावर बसणारे कित्येक व्यावसायिक या सर्वांसाठी आमची घरे दुकाने पाडली आहेत की काय असे वाटते. व्याजाने पैसे घेऊन लोक वारीसाठी माल भरतात आणि पथारीवाले विकून जातात आणि गावचे व्यापारी व्याजात मरतात अशी अवस्था असते. मंदिराच्या भोवती बसणारे बाहेर गावाहुन आलेले विक्रेते भरपूर असतात. या सर्वांवर कारवाई करून रस्ते त्यांच्या तावडीतून सुटले तर आता आहे त्या रस्त्यावरुन सहज वारी कितीही भाविक आले तरी पार पडेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपल्या पेक्षा जास्त काळजी साक्षात परमात्मा पंढरीरायावर आहे.दशमी एकादशीच्या दोन दिवसात फक्त गर्दी असते व्दादशीला तर हल्ली दुपार पर्यंत क्षेत्र मोकळे होते हो!!! महाद्वार ते छत्रपती शिवाजी महाराज चौक किंवा स्टेशन रोड पर्यंत गर्दी असते. वारीच्या वेळी व इतर एकादशीला गर्दी असते. इतर वेळी इतर रस्ते सामसूमच असतात. म्हणून कॉरिडॉरला पंढरपूरच्या लोकांचा विरोध आहे. कॉरिडॉर पेक्षा नदी व जल स्वच्छता प्राधान्याने हाती घ्यावी. लहानपणी आम्ही



वाळवंटात खेळायचो तेव्हा शेवटी नदीत हातपाय धूवून दोन हातानी वरचे पाणी बाजूला सारुन ओंजळीने पाणी पित होतो.तसा काळ पुन्हा जोपर्यंत येत नाही तोपर्यंत नमामी (कोणतीही नदी) या घोषणा ह्या केवळ घोषणाच ठरतील.बाकी काही नाही. नगरपालिकेच्या मोठ्या जागा मंदिर समितीने घेऊन तिथे मोठ मोठ्या इमारती वारकऱ्यांच्या सोईसाठी कंपन्यांकडून बांधून घेतल्या. त्या सर्व रिसॉर्टमध्ये एक ही आळंदी पंढरीचा वारकरी उतरल्याचे पाहण्यात आले नाही.किंवा माऊलींच्या पालखी सोबत आलेल्या दिंड्या त्यात विसावल्याचे पहायला मिळाले नाही. या सेवेतील मेवा कुठे जातो काही कळत नाही.तसेच नेमके महिन्याच्या यात्रा काळात काही लोक कथा सोहळे ठेवतात. त्यामुळे शहरात मोठी गर्दी होते. अशा मोठ्या कथाकारांचे सप्ताह पासष्ट एकरात ठेवावेत.जेणे करून गर्दीमुळे गावातील लोकांना त्रास होणार नाही व आलेल्या भक्तांना ही मोकळ्या वातावरणात प्रसन्न वाटेल. या कॉरिडॉरची चर्चा गावात चालू होती तेव्हा पु.अहिल्याबाई होळकर यांचा होळकर वाडा पण प्रभावित होणार आहे. असे म्हटले जात होते. हा वाडा त्या महासतीने स्वतःच्या खाजगी दौलतीच्या पैशातून भाविकांसाठी उभारला आहे. केवळ दास मारुतीची मूर्ती पाया खोदताना सापडली म्हणून राम मंदिर बांधले. एकीकडे राम मंदिर उभारणी होऊन रामलल्ला विराजमान झाले असताना या महासतीचे राम मंदिर पाडले जाणे हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल.शासनाने सर्व बाजुंनी साधकबाधक विचार करुन आवश्यक असणाऱ्या गोष्टीच कराव्यात असे वाटते.

## खडतर जीवनमार्ग

खडतर जीवनमार्ग माणसा
चालत रहा तू दिन रात
खंत नको तुज अपयशाची
टाकून दे न्यूनगंडाची कात

तुझे भविष्य तुझ्याच हाती
आत्मविश्वासाची असू दे जोड
कर्माचे फळ मिळते केवळ
दुनियेची तू चिंता सोड

रोज दिवस हा नवा उजडतो
सोबत घेऊन नवा प्रकाश
खुणवती तुज मुक्त पाखरे
उठ जागा हो स्पर्शिण्या आकाश

दुःखाचे तम तूच सारीशी
तुझ्याच हाती मनाची दोर
खचू नको लढण्या संकटाशी
नको होऊस क्षणभर कमजोर

तूच घडविसी तूच मोडीशी
तुझ्या जीवनाचा तू शिल्पकार
चिंतन कर तू चिंता सोडून
तरच होईल साक्षात्कार

जीवन तुझे बनावे सुगंधित
उगाळून स्वतःला होऊन सहान
जगास कळावी महती तुझी रे
आत्मज्ञान घेऊन हो महान

पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड
मोब.९०७५५९५६९५





## फूलपाखरू

फूलपाखरू दिसते खूप छान
फुलपाखरु बघून मुले विसरता भान
फूलपाखराला असता खूप रंग
त्याला पाहून आपण होतो दंग

फूल त्यांचे जीवन आहे
कारण ने फुलांवरतीच बसतात
आपण विचार करतो त्यांचे नाव
फुलपाखरू का?
कारण ते फुलासारखेच असतात.

ते आपल्या जिवनामध्ये
नेहमी रंग भरतात
कारण त्यांच्या आयुष्यात
खूप रंग असतात

फुलपाखरांची दुनिया
खूप न्यारी असते
कारण त्यांच्या जिवनात
फुलांची सवारी असते.

जरी फुलपाखरांचे जिवन छोटे असते
तरी त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य
असते
त्यांच्या कडून आपण हेच शिकूया
आपले आयुष्य सदैव आनंदी ठेवूया

संस्कृती दादा साळुंके
इयत्ता सहावी
कै. काशिनाथ पाटील जाधव
प्राथमिक विद्यालय दत्तनगर, कन्नड

# वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण हवे !

आधुनिक केसरी

शहरासारख्या ठिकाणी प्रतिदिन कार्यालयीन वेळेत होणारी वाहतूक कोंडी गंभीर स्वरूप धारण करू लागली आहे. वाढती वाहनसंख्या हे यामागील प्रमुख कारण असून यावर निर्बंध आणले नाहीत, तर भविष्यात नागरिकांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागेल हे निश्चित आहे. मुंबईसह अनेक



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

शहरातील हवा कमालीची प्रदूषित बनली आहे ज्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. श्वसनविकार असणाऱ्यांचे तर जगणे मुश्किल झाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत कमालीची सुधारणा दिसून आली ज्यामागील कारण एकच होते कि त्यादिवशी खासगी वाहने बाहेर पडली नव्हती. केवळ मुंबई शहराचा विचार केला, तर लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबईला आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. पर्याय म्हणून सुरु केलेल्या मोनो आणि मेट्रो रेल्वेही आता कमी पडू लागल्या आहेत. मुंबईत नुकताच सुरु केलेला कोस्टल रोडही कमी पडू लागला आहे. आजमितीला मुंबईकरांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य मुंबईकरही स्वतःच्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे. दर वर्षी दसरा दिवाळीनिमित्त यांमध्ये वाढ होते ती वेगळी. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे भाव वाढले असले तरी मुंबईकांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल. व्यवसायासाठी घेतल्या जाणार्‍या रिक्शा-टॅक्सींसह, 'ओला', 'उबेर' यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी घेण्यात येणार्‍या वाहनांचीही यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणार्‍या वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषतः लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुप्फुसांचे विकार जडत आहेत. मुंबईत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो.मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा भाव असल्याने पार्किंगसाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्याच्या दुतर्फा उभी केलेली वाहने वाहतूक कोंडी करण्यास साहाय्यभूत ठरत आहेत. ज्या प्रमाणात नवीन वाहने रस्त्यावर येत आहेत त्या तुलनेत जुन्या गाड्या स्क्रॅपमध्ये काढण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे, त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणने आज काळाची गरज बनली आहे.



# मॉस्कोवरील इसिस हल्ल्याचा अन्वयार्थ



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**दहशतवादाला जात नसते, धर्म नसतो. दहशतवाद हे लोकशाही पुढे कठीण आव्हान आहे. त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी इस्लामी देशातील गरिबी व दारिद्याचे निर्मूलन करून त्यांच्या आर्थिक विकासाचा नवा मार्ग शोधला पाहिजे. तसे झाले तर दहशतवादाचे समूळ उच्चाटन होऊ शकेल. त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घ्यावा. रशिया हा पूर्वीच्या युरेशिया खंडातील सर्वात मोठा विस्तीर्ण देश होय. त्याचा इतिहास जसा अनेक चढउतारांनी भरलेला आहे, तसे वर्तमानही प्रकाश व अंधाराने झाकाळले आहे. पीटर द ग्रेट या सम्राटाने (१६८२ ते १७२५) रशियाचे प्रथम आधुनिकीकरण केले. या सम्राटाने भव्य राजेशाहीच्या काळात रशियाचे आधुनिकीकरण केले. पुढे रशियामध्ये मध्य युगात झार घराण्याची सत्ता होती. झार अलेक्झांडर निकोलस दुसरा याच्या काळात १९१७ साली बोल्शेव्हीक क्रांती घडून आली.**

रासपुतीन हा त्याचा प्रधान अन्यायकारक राज्यकर्ता होता. त्याला होली डेव्हिल किंवा पवित्र सैतान म्हणत असत. रशियात व्लादिमीर इलिच उल्यानोव लेनिन (१८७० ते १९२४) यांच्या नेतृत्वाखाली रशियात साम्यवादी क्रांती घडून आली. मार्क्सच्या विचाराची प्रचिती इंग्लड किंवा जर्मनीत न येता ती रशियात प्रत्ययास आली. पंचवार्षिक नियोजनाच्या आधारे रशियाने प्रगतीचा दूरचा पल्ला गाठला. एक पाऊल पुढे टाकण्यासाठी एक पाऊल मागे घ्यावे लागते असे त्याचे व्यवहार्य आर्थिक सूत्र होते. १९९७ ते १९९१ या काळात सोव्हिएट रशिया एक बलाढ्य राष्ट्र बनले. मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या काळात ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोइका म्हणजे स्वातंत्र्य व सुधारणांचे पर्व आहे. त्यांनी पारंपरिक साम्यवाद सोडून दिला व रशियात लोकशाही क्रांती घडून आली. पुढे मध्य आशियातील पाच इस्लामिक राष्ट्रे बाल्कन प्रदेशातून वेगळी झाली. तिकडे चेचैन्य गटाने बंडखोरी केली. युक्रेनचा प्रदेश वेगळा झाला. रशियाला विभाजन व तुकडीकरणाला सामोरे जावे लागले. नव्या सोव्हिएट युनियनच्या काळात रशियापुढे अनेक प्रश्न उभे राहिले. बोरिस येल्त्सिन याच्यानंतर व्लादिमीर पुतीन यांनी रशियाला सावरले व रशियाला पुन्हा एकसंघ रूप देण्यासाठी खटाटोप आरंभिला.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची राष्ट्राध्यक्षपदी मार्च महिन्यात पाचव्यांदा फेरनिवड झाली आणि दुसऱ्याच दिवशी रशियाच्या सुरक्षेचे वस्त्रहरण झाले. त्यांच्या विजयाला गालबोट लागले. इसिस या दहशतवादी संघटनेने मास्कोतील एका संगीत महोत्सवावर अचानक हल्ला केला आणि या कॉन्सर्टमध्ये आनंदात चिंब भिजून गेलेल्या तरुणांना अचानक स्वर्गात जाण्याचे बेतले. त्यापैकी १३५ जण जागीच स्वर्गवासी झाले, तर १५० पेक्षा अधिक लोक जखमी झाले. हे सर्व नाट्य इसिस संघटनेने घडविले आणि आपण ही मर्दुमकी गाजविल्याचे त्यांनी तसे जाहीरही केले आहे. एके काळी अफगाणिस्तानात रशियाच्या आशीर्वादाने नजीबुल्ला यांचे पाच वर्षे राज्य होते. पुढे त्यांच्या विरुद्ध अमेरिकेने तालिबानला उभे केले. आता तालिबान तेथे सत्तेवर आहे. इसिसच्या अफगाण गटाने या हल्ल्याची जबाबदारी घेतली असल्याचे सांगितले जाते. मॉस्कोवर अकस्मात झालेल्या पूर्वनियोजित जंगली व रानटी हल्ल्यामुळे प्रामुख्याने तीन बाबी समोर आल्या. पहिली गोष्ट म्हणजे, व्लादिमीर पुतीन हे १६ वर्षे केजीबीचे मुख्य असले तरी देखील त्यांना इसिस संघटनेचा रशियावर अचानक हल्ला होईल याचा अंदाज का बांधता आला नाही, असा प्रश्न पडतो. म्हणजे ही गोष्ट खरी आहे की, रशियाची सुरक्षा यंत्रणा आता पूर्वीएवढी पोलादी पडद्यासारखी मजबूत राहिली नाही, असे म्हणावयाचे का? अमेरिकन दूतावासाने असा दहशतवादी हल्ला होण्याची शक्यता आहे, असे भाकित केले होते. परंतु रशियाने त्याकडे कानाडोळा केला. रशियातील गुप्तहेर संघटनासुद्धा प्रभावीपणे काम करत नाही. त्यामुळे हा हल्ला कसा झाला, एवढ्या लोकांना अचानक मरण कसे आले असे अनेक प्रश्न त्यातून उभे राहिले. दुसरी गोष्ट म्हणजे, रशियाला प्रत्येक गोष्टीमागे युक्रेनचा हात वाटतो परंतु यावेळी खरोखर युक्रेनने काही नकारात्मक काम केले असावे असे वाटत नाही. पण दहशतवादी युक्रेनच्या सीमेवरून आले व ते परत युक्रेनच्या सीमेकडे जात होते हा एवढाच तर्कसंगत मुद्दा धरून आपल्याला यामध्ये युक्रेनला गोवता येईल का असा प्रश्न रशियन मुत्सद्यांना पडणे साहजिक आहे. पण त्यात तथ्य किती, सत्य किती याबद्दल शंका वाटते. तिसरी गोष्ट म्हणजे, पुतीन यांनी भविष्यकाळामध्ये रशियाच्या सुरक्षेसाठी, लष्करी यंत्रणा सुधारण्यासाठी, लोकांच्या कल्याणासाठी अधिक काळजीपूर्वक काम करायला हवे, उर्वरित काळात त्यांनी आपली अधिकाधिक शक्ती युक्रेनवरील आक्रमणात खर्च केल्यास रशियाचे आर्थिक स्थैर्य आणि संरक्षणदृष्टीने लष्करी स्थैर्य हे सुद्धा संकटात येईल. वर्षापूर्वी रशियामध्ये अचानक झालेले भाडोत्री सैनिकांचे बंड पुतीन यांनी कसेबसे निपटून काढले होते व या बंडानेसुद्धा पुतीन हे म्हणावे तेवढे मजबूत नाहीत, सुरक्षित नाहीत ही गोष्ट उघडकीस आली. तसेच पुतीन यांनी युक्रेनमधील लहान मुलांना ओलीस ठेवले, अनेक तरुणांनाही ओलीस ठेवले त्यामुळे त्यांच्या विरोधात आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला चालला व त्यांना दोषी ठरविण्यात आले. पण आता ते या अशा प्रकारच्या कायद्याचा अंमल असलेल्या देशात प्रवास करण्याचे टाळतात. म्हणजे, ज्या कारणामुळे पुतीन यांच्यावर कारवाई करण्यात आली त्याचसारखा हल्ला इसिसने करावा व त्यात रशियन युवकांचे प्राण गमवावे लागावेत हा सुद्धा एक दैवदुर्विलास म्हटला पाहिजे.

**जंगली आणि रानटी हल्लाः** व्लादिमीर पुतीन यांनी म्हटल्याप्रमाणे मॉस्कोच्या कन्सर्टवर झालेला हा हल्ला अत्यंत जंगली, रानटी व क्रूर हल्ला आहे. २० वर्षांपूर्वी एकदा चैचन्य बंडखोरांनी असाच हल्ला करून १००० लोकांना जखमी केले होते व ३५० लोकांना यमसदनास पाठविले होते. त्यानंतरचा हा दुसरा मोठा हल्ला आहे. रशियाने अशा प्रकारचे अनेक दहशतवादी हल्ले पचविले आहेत. परंतु हा हल्ला पुतीन यांच्या नव्या कारकीर्दीच्या दुसऱ्याच दिवशी घडावा ही गोष्ट मोठी दुःखद आणि दुर्दैवी म्हटली पाहिजे. युक्रेनशी अंतर्गत युद्ध टाळून आता रशियाने शांततेचा मार्ग स्वीकारला तरच रशियातील जनतेला सुख व शांतता लाभू शकेल आणि अख्खा युरोप आज युद्धाच्या खाईमध्ये होरपळत आहे त्यालाही वाचविता येईल. मॉस्कोवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची सूत्रधार इसिस ही संघटना आहे. खुद्द या संघटनेच्या अफगाण शाखेकडे या हल्ल्यामागचे षड्यंत्र असल्याचे उघड झाले आहे. या इसिस संघटनेविषयी थोडा पूर्व इतिहास समजावून घेतला पाहिजे.

**इसिसचा थोडा पूर्व इतिहास :**गेल्या काही महिन्यात जागतिक पातळीवर होत असलेल्या दहशतवादी हल्ल्यांचा शोध घेतल्यास त्यामागे बहुतेकवेळा इसिसच्या गटाकडे बोट दाखविले जाते आणि ही संघटना झाल्या प्रकारची जबाबदारीसुद्धा स्वतःकडे घेते. इसिस म्हणजे जणू हिंसाचार, दहशतवाद असे समीकरणच बनले आहे. जगामध्ये क्रूर अशा ज्या दहशतवादी घटना घडल्या आहेत त्यामागे या संघटनेचा हात आहे असे म्हटले जाते. इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सिरिया हे या संघटनेचे थोडक्यात विस्तारीत रुप आहे. १९९९ साली ही संघटना स्थापन करण्यात आली आणि पुढे तिने इस्लामिक देशामध्ये चांगलाच प्रभाव निर्माण केला. जागतिक पातळीवर नव्याने खिलाफत निर्माण करण्याचा या संघटनेने संकल्प केला. अबू



बक्र अल् बगदादी हे या संघटनेचे एक म्होरके नेते. १९९९ पासून आता २०२४ पर्यंत या संघटनेने फार दूरचा पल्ला गाठला आहे. आपणच नवीन खलिफा आहोत हे घोषित करून त्याने अनेक मुस्लिम देशातील राज्यकर्त्यांची सहानुभूती मिळविली आहे. या संघटनेचा इतिहास जर पाहिला तर मागील पाच वर्षांत संघटनेचा विस्तार जगाच्या अनेक देशातून झाला आहे. संघर्ष, समन्वय आणि विकास हे तत्त्व घेऊन या संघटनेने जगभरामध्ये इस्लामच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम आखले आहेत. २०१४ च्या सुमारास अल् कायद्याने या संघटनेशी असलेले संबंध तोडले. तरीदेखील ही संघटना डगमगली नाही. या संघटनेने स्वतःच्या पायावर आपली चळवळ उभी केली. इस्लामी मूलतत्त्ववाद ही या संघटनेची विचारधारा आहे. ही संघटना तरुणांना अत्यंत टोकाची भूमिका घेण्यास तयार करते. त्यासाठी ते पवित्र तत्त्वज्ञानाचे मानसिक वलय तयार करतात आणि आपण करत आहोत ती कृती योग्य आहे असे वाटू लागते.


आजवर इसिसने केलेले हल्ले आणि निर्माण केलेले प्रश्न पाहता, इसिस ही एक निश्चितच लोकशाहीला धोकादायक संघटना आहे, ही गोष्ट लक्षात येईल. भविष्यकाळामध्ये इसिसला काही बदल घडवून आणावयाचे असतील तर इसिसने आता आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल केला पाहिजे. लोकशाही मार्गाने अविकसित इस्लामिक देशांचे प्रश्न मांडले पाहिजेत. तेथील तरुणांना रोजगार, सामाजिक व आर्थिक विकासाची संधी या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. केवळ इस्लामिक तत्त्वज्ञानाच्या कृत्रिम, भावनिक ध्येयवादाचा पुरस्कार करून इस्लामचे कल्याण कसे होणार? इस्लामिक देशामध्ये समाजाची गरिबी आहे, दैन्य आहे, दारिद्य आहे. हे सर्व दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी तरुणांची माथी भडकवून त्यांना दहशतवादी कृत्य करण्यास लावणे व जिहादी म्हणून त्यांना तयार करणे त्यातून थोडाफार पैसा त्यांच्या कुटुंबियांना पाठवणे आणि त्यांचे सारे जीवन उध्वस्त करून टाकणे हा कसला न्याय ? अशा प्रकारच्या दहशतवादी कृत्यातून निर्माण होणारे जिहादी गट हे जगाचे प्रश्न सोडवत नाहीत तर नवनवे प्रश्न निर्माण करीत आहेत, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

**इसिसची वाटचाल :** इराक आणि सिरियामधील दहशतवादी गटाने आज या दोन्ही देशांचा फार मोठा भूभाग व्यापला आहे व इस्लामिक स्टेट इंटरनॅशनल ही संघटना मजबूत केली आहे. ही संघटना जगाच्या अनेक भागामध्ये अचानक हल्ले करते आणि निष्पाप लोकांचे प्राण घेते, रक्तपात होतो, हिंसाचार होतो. पण यातून निष्पन्न काय होते. अलिकडे ही गोष्ट लक्षात आली आहे ही दहशतवादाला जात नसते, धर्मही नसतो. एकाच देशाचे हे दोन दहशतवादी एकमेकांविरुद्ध कारवाया करत असल्याचे आपण पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या उदाहरणावरुन लक्षात घेतो. तसेच खुद्द पाकिस्तानला इराणशी संघर्ष करावा लागतो याचा अर्थ असा होतो की, ही इस्लामिक राष्ट्रे पूर्वी गळ्यात गळा घालून आळवत होती ती आता एकमेकांच्या छातीवर बसत आहेत. हे कशाचे लक्षण आहे. दहशतवाद ही एक प्रवृत्ती आहे, ती एक अपप्रवृत्ती आहे. मानसिक विकृती आहे. जगाच्या लोकशाहीला सर्वात मोठा धोका कोणता असेल तर तो दहशतवादाचा आहे. हे लक्षात घेऊन दहशतवादाच्या समूळ उच्चाटनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री ब्लिंकन आणि राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी या घटनेचा, या हल्ल्याचा निषेध केला आहे व त्यांनी असे म्हटले आहे की, दहशतवाद हे एक समान संकट आहे व त्या संकटाशी मुकाबला सर्वांनी मिळून केला पाहिजे. दहशतवादाचे समूळ उच्चाटन करणे हाच लोकशाही रक्षणाचा खरा मार्ग होय.

**युद्ध नको शांतताः** मागील आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकाच वेळी दूरभाष करून युक्रेनचे झेलेन्स्की आणि रशियाचे पुतीन या दोघांशी चर्चा केली. त्यांनी त्या दोघांचीही समजूत काढण्याचा प्रयत्न केला असावा. आता युद्धाने प्रश्न सुटत नाही तर शांततेने प्रश्न सुटतील तेव्हा मध्यस्थ म्हणून भारताने योग्य भूमिका पार पाडल्यास रशिया व युक्रेन या दोघांनाही एका व्यासपीठावर आणून काही सर्वमान्य तोडगा काढला तरच युद्धबंदी होऊ शकेल, ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे. पुतीन यांनी आता हवेत न चालता जमिनीवर येऊन काम करावे हाच खरा या घटनेचा संदेश म्हणावा लागेल. त्यांनी युद्धाऐवजी रशियाच्या सामाजिक व आर्थिक विकासावर अधिक भर द्यावा.

**संदेश काय ?** मॉस्कोवरील हल्ल्याचा संदेश हाच आहे की, भविष्यकाळामध्ये या प्रकारचे दहशतवादी हल्ले जगाच्या कुठल्याही भागात झाले तर ते निंद्यनीय आहेत, निषेधार्ह आहेत आणि चिंताजनक आहेत. अशा प्रकारच्या हल्ल्यांना रोखून इस्लामिक जनतेच्या कल्याणासाठी एखादी योजना युनेस्कोने तयार करावी. सर्व इस्लामिक इसिसच्या म्होरक्यांना, नेत्यांना व त्यांच्या समर्थक देशांना एकत्र बोलवावे. एक शिखर परिषद घ्यावी आणि त्यातून हा सारा प्रश्न शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करावा. मानवी जीवनामध्ये आजवर इसिसने केलेल्या हल्ल्यातून हजारो लोकांची हत्या झाली आहे. त्यातून काय निष्पन्न झाले? ते देश कंगाल झाले, गरीब झाले. ज्या देशांवर हल्ले होतात तेथील अनेक कुटुंबे निराधार झाली. अनेकांची चिमुरडी मुले गेली. त्यांनी काय करावे? त्यांचे अश्रू कोण पुसणार आहे ? त्यामुळे इसिसने दहशतीचा, हिंसाचाराचा मार्ग सोडावा आणि शांततेच्या मार्गाने वाटचाल करावी तर जग सुखी होईल, संपन्न होईल आणि दैन्य, दारिद्य यांच्याशी लढता येईल. दहशतवादासाठी होणारी पैशाची उलाढाल, होणारे उपद्व्याप त्यातून नष्ट होणारे, उध्वस्त होणारे जीवन, जीवित वित्तहानी हे सारे पाहता, जगाच्या कुठल्याही देशात हा प्रकार घडला तरी देखील तो निषेधार्हच म्हटला पाहिजे. त्यामुळे मानवाचे कल्याण होण्याऐवजी नुकसानच होते ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. तेव्हा दहशतवाद कुठलाही असो, तो निषेधार्हच आहे आणि या दहशतवादाने कुठेतरी आता थांबले पाहिजे, पूर्णविराम दिला पाहिजे. असा पूर्णविराम दिला तरच लोकशाही सुरक्षित आणि सुसह्य होऊ शकेल.

# ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली.**

. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या. मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली . या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली. कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुणारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते.



एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट. मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत . १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होत्या. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पथर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रांडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रांडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रांडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.

# केंद्राकडून ५ लाख टन कांद्याची खरेदी



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**एप्रिलच्या सुरवातीपासून नाफेडच्या माध्यमातून बफर साठ्यासाठी ५ लाख टन कांद्याची खरेदी सुरु होईल. केंद्र सरकारने एनसीसीएफ आणि नाफेडला बफर साठ्यासाठी ५ लाख टन कांदा खरेदी करण्याचे निर्देश दिल्यानंतर खरेदीची तयारी चांगली सुरु झाली. दि.१ एप्रिलपासून कांदा खरेदीचे संकेत मिळू लागताच उन्हाळ कांद्याच्या सरासरी भावात १२० ते १५० रुपये प्रतिक्विंटलची वाढ पहावयास मिळाली. केंद्रसरकारने बांग्लादेशला ५० हजार टन कांदा निर्यातीस अनुमती दिली आहे. बांग्लादेशमध्ये स्थानिक कांद्याची आवक वाढत असल्यामुळे बांग्लादेशमधील कांद्याचे भाव घसरले आहेत.**



भारतातून बांग्लादेशला होणारी कांद्याची निर्यात या आठवड्यात सुरु होऊ शकते. सध्या ४०-५० टका प्रतिकिलो (३०-३८ रुपये प्रति किलो) या दराने बांग्लादेशमध्ये कांदा ग्राहकांना उपलब्ध होत आहे. भारतात मात्र कांद्याच्या भावावर दबाव हा टिकुन राहील असे वाटते. बांग्लादेशमध्ये स्थानिक नवीन कांद्याची आवक सुरु झाल्यामुळे भावात मोठी घसरण झाली, यामुळे भारतातून कांद्याची निर्यात प्रभावित होऊ शकते.

**तुकडेबंदी कायद्यात सुधारणा :** तुकडेबंदी कायद्यात सुधारणा करण्यासाठीचं अधिसूचना १४ मार्च २०२४ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार विहिरीसाठी, शेतरस्त्यासाठी, सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेल्या शिल्लक जमिनीसाठी केंद्र-राज्याच्या ग्रामीण घरकुल योजनेच्या प्रयोजनासाठी गुठ्यांमध्ये जमिनीचा व्यवहार करता येणार आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे नमुना- १२ प्रमाणे अर्ज करावा लागणार आहे. ज्या कारणासाठी हस्तांतरणाची परवानगी मिळाली त्याच कारणासाठी जमिनीचा वापर करावा लागेल. अन्यथा अशी मंजुरी प्रारंभापासून रद्द करण्यात आल्याचं मानण्यात येणार आहे.

**देशात ४ हजार टन ॲव्हाकॅडोची आयात :** देशात कोरोनानंतर फळांची खपत वाढली आहे. बहुतांश लोकांचा आहाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. ॲव्हाकॅडोची मागणी सतत वाढत आहे. सध्या देशात ४ हजार टन ॲव्हाकॅडोची आयात होत आहे. टांझानिया, पेरू, अमेरिका, मेक्सिकोमधून ॲव्हाकॅडोची आयात केली जात आहे. जागतिक स्तरावरही फळांची मागणी वाढत चालली आहे.

**जागतिक सोयाबीनचे उच्चांकी उत्पादन :** अमेरिकेच्या कृषी विभागाने प्रसारित केलेल्या माहितीनुसार २०२३-२०२४ या हंगामामध्ये एल-निनोचा प्रादुर्भाव असतानाही जागतिक स्तरावर सोयाबीनचे उत्पादन १८८ लाख टनाने वाढून ३,९७० लाख टनावर पोहचण्याची शक्यता वर्तवली आहे. ही आकडेवारी पाहता आजपर्यंतचे उच्चांकी उत्पादन आहे. जागतिक खपत ही ४० लाख टनाने वाढून ३,८२० लाख टनावर पोहचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चीनमध्ये सोयाबीनचा अतिरिक्त साठा असल्याकारणाने जागतिक स्तरावर सोयाबीनच्या भावावर दबाव टिकून आहे. नजिकच्या काळात भारतासह जागतिक स्तरावर सोयाबीनचे भाव कमीच राहतील असे वाटते.

**बासमती तांदळाच्या निर्यातीत १२.३१ टक्के वाढ :** निर्यातदारांकडून बासमती तांदूळाला मोठी मागणी मिळत आहे. बासमती तांदूळाला मिळत असलेल्या या मागणीमुळे भात/धानाचेही भाव सुधारले आहेत. मागील दोन आठवड्यांमध्ये भाताच्या/धानाच्या भावात सरासरी १०० रुपये प्रति क्विंटलची वाढ झाली. पुसा-११२१ या जातीच्या तांदूळाला ८,००० ते ८,२२१ रुपये प्रति क्विंटल, पुसा-१५०९ या जातीच्या तांदुळाला ६,७०० ते ६,८०० रुपये प्रति क्विंटल इतके भाव मिळत आहेत. बासमती तांदूळाच्या निर्यातीत १२.३१ टक्के ची वाढ नोंद झाली आहे. बिगर बासमती तांदूळाच्या निर्यातीवर सरकारने बंदी घातली आहे.

**डाळींच्या आयातीत २९ टक्केची घसरण :** भारताकडून यावर्षी ५ लाख १६ हजार टन मसूर, तूर आणि उडीद डाळींची आयात झाली, जी मागील वर्षी ७ लाख २४ हजार ८८३ टन इतकी झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत २९ टक्के ने आयात कमी झाली आहे. भारत डाळीच्या आयातीसाठी टांझानिया, मोझाम्बिक, म्यानमार आणि आफ्रिकेतील इतर देशांवर अवलंबून आहे.

**फळे, भाजीपाला आणि मसाल्याची निर्यात वाढली :** फेब्रुवारी महिन्यात भारतातून फळे, भाजीपाला आणि मसाल्याची निर्यात वाढली आहे. केंद्रिय वाणिज्य विभागाने प्रसारित केलेल्या माहितीनुसार फळ आणि भाजीपाल्याची निर्यात १३ टक्के ने वाढली तर मसाल्यामध्ये तब्बल १५ टक्केची वाढ दिसून आली. तांदळाची निर्यात २ टक्के ने वाढली. इतर तृणधान्यांच्या निर्यातीत ८२ टक्के ची घट झाली.

**साखर गळीत हंगामाची समाप्ती सुरु :** राज्यात २०२३-२४ या हंगामात एकूण २०७ कारखान्यापैकी १०५ हुन अधिक साखर कारखान्यांचा गळीत हंगाम समाप्त झाला आहे. आतापर्यंत १० कोटी २३ लाख मेट्रिक टन गाळप झाले असून, १० कोटी ४० लाख क्विंटल साखरेचे उत्पादन तयार झाले आहे. यावर्षी उसाअभावी फेब्रुवारीच्या मध्यानंतर साखर कारखाने बंद होण्यास सुरुवात झाली आहे.अन्न मंत्रालयाने एप्रिल २०२४ साठी २५ लाख टन साखरेचा कोटा जाहीर केला आहे. जो एप्रिल २०२३ मध्ये २२ लाख टन इतका होता. गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी ३ लाख टनाने साखरेचा कोटा अधिक आहे. परिणामी देशांतर्गत बाजारपेठेत साखरेच्या भावावर हलकासा दबाव राहू शकतो.

**हळदीला उच्चांकी ७० हजार रुपये प्रतिक्विंटल :** हळदीची उत्पादकता यावर्षी २० ते २२ टक्के नी कमी होण्याची शक्यता होतीच. त्यानुसार देशातील हळदीच्या प्रमुख बाजारपेठेत आवकही कमीच होताना दिसत आहे, पण सांगलीला मात्र उच्चांकी भाव मिळत असल्यामुळे मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगणा मधूनही हळदीची आवक सुरु आहे. हळदीला आज पर्यंतचे उच्चांकी ७० हजार रुपये प्रतिक्विंटल इतके भाव मिळाले. दि.२० मार्च रोजी राजापुरी हळदीला उच्चांकी ६१ हजार रुपये प्रतिक्विंटल इतके भाव मिळाले होते.

**उन्हाळी पिकांचे लागणक्षेत्र ३ टक्के ने कमी :** देशात उन्हाळी पिकांचे लागणक्षेत्र ४१ लाख हेक्टरवर पोहोचले, जे मागील वर्षाच्या तुलनेत ३ टक्के ने कमी आहे. केंद्रीय कृषी विभागाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार कडधान्यांचे लागणक्षेत्र २८ टक्के नी वाढून ६ लाख ४२ हजार हेक्टरवर पोहोचले. उडीदचे लागणक्षेत्र २७ टक्के आणि मुगाचे लागणक्षेत्र २८ टक्के नी वाढले. भाताचे लागणक्षेत्र १० टक्के नी वाढून २८ लाख हेक्टरवर पोहोचले तर तेलबियांचे लागणक्षेत्र ६ लाख ७१ हजारांवर पोहोचले आहे.

**अद्रकचे भाव :** कोरोनाच्या काळापासून अद्रकचे भाव कमीच राहिल्यामुळे लागणक्षेत्रही घटले होते. आता आवक कमी असल्यामुळे आल्याच्या भावात चांगली सुधारणा होताना दिसत आहे. सध्या प्रमुख बाजारपेठेत ओल्या अद्रकला सरासरी ९० ते १०० रुपये प्रतिक्विंटल इतके भाव मिळत आहेत. आणखी एक ते दीड महिनातरी भाव चढेच राहण्याची शक्यता आहे. आवक कमी असल्यामुळे भावातही घसरण होण्याची शक्यता कमी आहे.

**रासायनिक खतांची खपत ३ टक्के नी वाढली :** एप्रिल ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये देशात रासायनिक खतांची खपत ३ टक्के नी वाढून ५८० लाख टनांवर पोहोचली. खतांच्या उत्पादनात या अकरा महिन्यामध्ये ४.५ टक्के वाढ दिसून आली. यामध्ये प्रामुख्याने डी.ए.पी सह मिश्र खतांची मागणी जास्त राहिली. तर युरियाची मागणी स्थिर दिसून आली. पोटॅशच्या मागणीत मात्र घट झाली.

**बिगर बासमती तांदळाची निर्यात :** मलेशियाकडून अतिरिक्त ५ लाख टन बिगर बासमती तांदळाची भारताकडे मागणी करण्यात आली आहे. मलेशियाला दि.१८ ऑक्टोबर रोजी १ लाख ७० हजार टन बिगर बासमती तांदळाची निर्यात केली होती. यावर्षीच्या सुरुवातीला १ लाख टन कांद्याचे विशेष निर्यात वाटप मिळवण्यासाठी अधिकृत विनंती केली होती.

# कार्यकर्त्यांनो सावधान !!!



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**मित्रांनो नमस्कार . निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली आहे . हा ज्वर आता दिवसेंदिवस वाढत जाणार आहे . आणि निवडणुकीचा प्रचारही तितकाच टीकेला पोहोचणार आहे . या निवडणुकीमध्ये कोणी तरी निवडून येईल , कोणाचा तरी पराभव होईल . भाषणामधून दोन्ही उमेदवार एकमेकांवर प्रखर जहरी टीका करतील. आणि मी कसा श्रेष्ठ , मी कसा ज्येष्ठ , मी कसे मोठे काम केलेत हा बडेजावपणा सगळ्याच पक्षाचे सगळेच नेते करतील . आणि कार्यकर्त्यांच्या बळावर भल्यामोठ्या रॅली , सभा यांचा आयोजन होईल . पण मित्रांनो , एक मात्र लक्षात ठेवा की ही निवडणूक संपली की हे सगळे लोक जे एकमेकांच्या विरोधात आग पाखड करतात हे सगळे लोक पुन्हा एकत्र होऊन मुंबई आणि दिल्लीमध्ये एकाच टेबलवर बसून जेवण करतात .**

एकमेकांसोबत चांगले "हेल्दी रिलेशन " ठेवतात. त्यामुळे कार्यकर्त्यांनो माझी तुम्हाला एक नम्र विनंती आहे की , या निवडणुकीच्या निमित्ताने तुम्ही मात्र आपसातील वैयक्तिक संबंध चुकूनही खराब करू नका. एकमेकांसोबत भांडण , मारापीटी किंवा एकमेकांवर कुरघोडी या सगळ्या गोष्टी अजिबात करू नका. वेगवेगळ्या पक्षांमध्ये तुमचे वेगवेगळे मित्र असतील . त्या मित्रांसोबत चे तुमचे जे स्नेहपूर्ण , मैत्रीपूर्ण पारिवारिक संबंध असतील ते संबंध कायम ठेवा . कोणत्याही पक्षाचा कोणताही नेता निवडून आला तरी त्यामुळे तुमच्या वैयक्तिक आयुष्यात खूप काही फरक पडणार नाही ही गोष्ट सगळ्यात पहिल्यांदा लक्षात घ्या . जे काही करायचे ते तुम्हाला स्वतः करायचं की ज्यामुळे तुमचं आयुष्य बदलेल . त्यामुळे या लोकांसाठी आपले संबंध , आपसातील जिव्हाळा हा मात्र कुठेही तुटता कामा नये याची काळजी घ्या. कारण हेच मित्र अडचणीच्या काळात तुम्हाला मदतीसाठी धावून येणारे आहेत . त्यामुळे , निवडणुकीच्या निमित्ताने उठणारी धुळवड ही या लोकांसाठी फक्त तेवढ्या कालावधी पुरता असते . बाकी वेळेस यांचे संबंध नेहमीच चांगले राहतात . परंतु , कार्यकर्त्यांमध्ये मात्र इतकी टोकाची भूमिका असते की ते वेळप्रसंगी आपल्या मैत्रीचे संबंध कायमचे तोडून बसतात आणि , चांगले संबंध आयुष्यभरासाठी तुटले जातात . म्हणून मित्रांनो निवडणुकीची रणधुमाळी सुरू असली तरी आपले संबंध चांगले राहतील याकडे लक्ष ठेवा.

दुसरी गोष्ट या निवडणूक प्रचारामध्ये राज्यकर्त्यांच्या मागे धावत असताना ही गोष्ट सुद्धा लक्षात ठेवा की , आपला किती वेळ कोणासाठी ? कसा चालला आहे ? आणि यातून मला काय मिळणार आहे ? हा प्रश्न एकदा स्वतःच्या मनाला विचारा शांतपणे . कारण हा जो वेळ जातो आहे या वेळेच काही मूल्य तुम्हाला मिळतय का ? किंवा भविष्यात त्याचं काही मूल्य कामाच्या स्वरूपात तुम्हाला मिळणार आहे का ? याचाही विचार करा . आणि नाही तर स्पष्टपणे तुम्ही जितके दिवस काम करणार आहात तितक्या दिवसाचे तुमचे मानधन काय ? हे आधीच बोलून घ्या आणि तितकं मानधन मिळत असेल तरच तिथे वेळ द्या नाहीतर विनाकारण व्यर्थ दिवसभर राबराब राबण्यात काहीही अर्थ नसतो मित्रांनो . हे लक्षात घ्या या राज्यकर्त्यांचे सगळे ठेकेदार तेवढे कामाचे असतात . काम द्यायची जेव्हा वेळ येते तेव्हा या ठेकेदारांना काम दिलं जातं. परंतु , निवडणुकीमध्ये तुमच्या पाठीमागे कोण कोण राबला आहे ? कसा राबला आहे ? त्यांनी काय मेहनत घेतली ? याकडे मात्र कवडीचेही लक्ष दिले जात नाही . त्यामुळे आपला वेळ, आपले परिश्रम , आपली मेहनत विनामूल्य कुठेही देऊ नका.

आणखीन एक गोष्ट. ती अशी की, गेल्या दहा पंधरा वर्षातच नव्हे तर त्यापूर्वी सुद्धा प्रत्येकच निवडणुकीमध्ये आपण एक गोष्ट सातत्याने पाहत आलो आहे की , विविध राजकीय पक्षातले मोठे मोठे नेते ज्यांना पक्षांनी सर्व काही दिले, 40 - 40 वर्ष एका पक्षाशी ते एकनिष्ठ होते. पक्षानेही त्यांना थेट मुख्यमंत्री पदापर्यंतचे सर्व पद दिलेत, असे लोक सुद्धा निवडणुकीच्या तोंडावर स्वतःची सत्ता कायम राखावी यासाठी दुसऱ्या पक्षात जातात आणि दुसऱ्या पक्षातून आलेल्या लोकांना वेळेवर हे पक्ष उमेदवारी देऊन त्यांना आपल्या पक्षात मानाचे स्थान सुद्धा दिलं जातं . त्यामुळे या राजकारणाच्या क्षेत्रामध्ये कोण कधी कुठे कसा पलटी मारेल याचा नेम नाही . त्यामुळे आज तुम्ही भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ता असाल तर उद्या कदाचित तुम्ही राष्ट्रवादीचे व्हाल , परवा कदाचित शिवसेनेचे व्हाल . किंवा दोन राष्ट्रवादीचे जे गट आहेत त्या दोन गटांपैकी एका गटाचे व्हाल , शिवसेनेच्या दोन गटांपैकी एका गटाचे व्हाल, किंवा युती झाली तर तुम्ही त्याच पक्षाचे राहून त्या पक्षांसोबत मित्रपक्ष म्हणून तुम्हाला काम करावे लागेल. त्यामुळे राजकारणातले जे वरिष्ठ पातळीवरचे नेते आहेत हे नेते सुद्धा आपल्या पक्षाशी कधीही एकनिष्ठ राहत नाहीत तर , त्यांच्यासाठी त्यांची सत्ता , त्यांची खुर्ची , त्यांचं पद हे महत्त्वाचं असतं ही गोष्ट कायम आणि कायम लक्षात ठेवा . आणि यावरून एक धडा तुम्हीही घ्या की हे लोक जर असे पलटी मारू शकत असतील तर मी यांच्यासाठी




एकनिष्ठ राहून काय साध्य करतोय ? हा प्रश्न स्वतःला विचारा . म्हणजे तुम्हाला राजकारणात काम करत असताना , राजकीय क्षेत्रात काम करत असताना आपण काय करायला हवं हेही लक्षात येईल . मित्रांनो मी तर एवढेच म्हणेन की राजकीय क्षेत्रात काम करत असाल तर स्वतःची पोळी शेकून घेण्याचं कौशल्य तुमच्या मध्ये असायला हवं . किंवा लांगुलचालन करत स्वतःचा स्वाभिमान , आत्मसन्मान तुम्हाला गहाण ठेवायची तुमची तयारी असेल तर निश्चित राजकारण्यांच्या पाठीमागे धावा . हल्ली काय झालंय न मित्रांनो , स्वतःला आमदारांचे ,खासदारांचे , मंत्र्यांचे पीए ( स्वीय सहाय्यक ) म्हणून घेणारे लोक सुद्धा त्यांच्या चपला उचलून स्वतःच्या रुमालाने पुसून त्या चपला संबंधित मंत्र्याला घालून देण्याच्या पातळीपर्यंत उतरलेले आहेत . इतक्या खालच्या पातळीपर्यंत उतरण्याची तुमची जर तयारी असेल तर तुम्ही राजकारणात मोठे होऊ शकता . आपला स्वाभिमान कायम ठेवून जर तुम्हाला जगायचं असेल तर तुम्ही राजकारणाच्या क्षेत्रात मोठे होऊ शकत नाही . तेव्हा निश्चितपणे व्यावसायिक दृष्टिकोन ज्याला प्रोफेशन व्हियू असं तुम्ही म्हणता ते प्रोफेशनलिझम तुमच्यामध्ये आणा आणि राजकीय क्षेत्रातून तुम्हाला काय साध्य करता येतं ते साध्य करून घ्या. तरच या निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये तुम्ही टिकाल अन्यथा तुम्ही केवळ राबराब राबणारे कार्यकर्ते म्हणून तुम्हाला कायमच राबवून घेतल्या जाईल हे लक्षात ठेवा. तेव्हा कार्यकर्त्यांनो सावधान !!!! आपल्याला नुसतच वापरून तर घेतल जात नाही आहे ना ? आपल्याला आपला स्वाभिमान तर गहाण ठेवावा लागत नाहीये ना ? आपला वेळ निरर्थक वाया तर जात नाहीये ना ? आपल्या मैत्रीपूर्ण संबंधात कुठे दुरावा तर निर्माण होत नाही ना ? राजकारणांच्या या रणधुमाळीमुळे आपण आपल्या कुटुंबापासून तर दूर जात नाही आहे ना ? या सर्व गोष्टींचा नीट विचार करा आणि आपलं आयुष्य स्वतःच्या कर्तुत्वाने आणि स्वाभिमानाने जगा बस यासाठीच हा लेखन प्रपंच खास निवडणुकीच्या शुभमुहूर्तावर .



# लोभ आणि महत्त्वाकांक्षा

आधुनिक केसरी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

लोभ आणि महत्त्वाकांक्षा समाजात मोठी विषमतेची दरी उत्पन्न करीत असते. याचा प्रत्यय देणारा हा एक प्रसंग. कुटुंब कल्याण विभागाचे कर्मचारी गावच्या सरपंचांकडे गेले. थोडा वेळ इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यातला एक कर्मचारी म्हणाला, आम्ही एका विशेष कामाच्या उद्देशाने आपल्याकडे आलो आहे. आपण गावातले एक जबाबदार व्यक्ती आहात. कुटुंब नियोजन आज व्यक्ती, समाज, राष्ट्र सर्वांसाठीच मोठी गरज बनली आहे. आम्हाला सांगितलं गेलंय की, आपल्याला सहा मुलं आहेत. त्यामुळे कुटुंब नियोजनाची सुरुवात सर्वात प्रथम आपल्यापासूनच व्हावी, असं आम्हाला वाटतं.

सरपंच विचारात पडले. मग म्हणाले, तुमचं म्हणणं बरोबर आहे. मलाही ते पटतं. पण माझ्या मनाची मात्र मोठी घालमेल सुरू आहे. कारण काही दिवसांपूर्वीच एका ज्योतिषाने माझी कुंडली आणि भाग्यरेखा पाहून अशी एक गोष्ट सांगितलीय की, त्या गोष्टीची मला पदोपदी आठवण येते. त्यामुळे मी आता त्या दिवसाचीच वाट पाहण्याचं ठरवलं आहे. अधिकाऱ्यांनी आश्चर्याने विचारलं, ज्योतिषाने काय सांगितलं होतं आपल्याला? तुमचं भाग्य उजळणार असेल तर फारच छान. तसं असेल तर मग त्यातलं थोडं आमच्याही वाट्याला येऊ दे. आम्हीसुद्धा वाट पाहात राहू. सरपंच म्हणाले, ज्योतिषाने सांगितलं आहे की, तुमचा नऊ नंबरचा मुलगा मंत्री होणार आहे. त्यामुळे मी नवव्या मुलाची वाट पाहात आहे. कुटुंब कल्याण विभागाच्या कर्मचाऱ्यांची तोंडेच बंद झाली. नवव्या मुलाच्या मंत्री होण्याच्या लालसेपोटी माणूस हित- अहित या गोष्टींकडे पाहतच नाही. तो गरिबी, दुःख, अडचणी, संकटे सगळे सगळे झेलेल, परंतु नवव्याचा लोभ त्याला चिंतन करण्याची संधीच उपलब्ध करून देणार नाही.

# आनंद सापडला...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 42

सकाळी सकाळी फिरत असताना बऱ्याच काही घटना अशा असतात की काही मनाला चटका लावून जातात, तर काही आनंद देऊन जातात.आपल्या शरीराची काळजी घेण्यासाठी आपण राम प्रहरी फिरायला जातो. पण त्याच वेळी हातात मोजे घालून मास्क लावून अतिशय दुर्गंधीयुक्त अशा कचऱ्याच्या ढिगाऱ्यात काही व्यक्ती आपल्या संसाराचे स्वप्न पहात तो कचरा वेगळा करण्याच्या कामात असतात. तिथून जाताना इतर लोक नाकाला रुमाल लावतात. तो मात्र ते सगळं वेगळं करून गाडीत भरत असतो.

का फेकतात लोक असा कचरा रस्त्यावर???

असा रस्त्यावर कचरा फेकणारे किती पाप करतात हे त्यांना का कळत नाही.

आपलाच बांधव ते साफ करत असतो. तोही माणूसच आहे ना!

असं दृश्य पाहिलं की मनाला चटका लागून जातो. हृदय पोळते. असो..

एक सात आठ वर्षाची मुलगी दुकानात दूध आणण्यासाठी जात असताना तीन चार कुत्र्यांनी तिला घेरलं. गुरगुर करायला लागले. मी समोरून येतच होते.

मी पटकन तिला जवळ घेतलं .पोटाशी धरलं. थोडं पुढे नेऊन सोडलं. घाबरू नकोस, असं सांगून तिला बाय केलं. मला खूप आनंद झाला की आज कोणाला तरी आपण लहानशी मदत केली. तो आनंद तसाच चेहऱ्यावर घेऊन मी पुढे चालू लागले. सकाळी शाळेची वेळ असते .मुलं पालक रस्त्यावर गर्दी असते .कोणी पायी, कोणी गाडीवर, सायकलवर, रिक्षाने असे शाळेकडे जाताना मुलं दिसतात. एक बाप आपल्या मुलीला गाडीवर घेऊन जात होता. मुलीला कानपट्टी होती पण बापाच्या कानाला काहीच नव्हते. त्याला थंडी वाजत असेल याची जाणीव होऊन मागे बसलेल्या त्याच्या लेकीने आपले दोन्ही हात बापाच्या कानावर ठेवले होते. तिला आनंद होत होता मी थंडीपासून बापाचे रक्षण केले. त्याहून जास्त आनंद बापाला झाला लेकीच्या इवलेशा हाताने त्याचे कान झाकले होते. त्यावेळी जगातला सर्वात सुखी, आनंदी तो बाप होता. मला ते दृश्य पाहून भरून आले. लेकीची आभाळमाया दिसली. खरा आनंद मला त्या बाप लेकीत सापडला. मी वळून वळून त्या चिमुकल्या लेकीकडे पाहत होते. पहिली बेटी, धनाची पेटी. हे वास्तव मी आज पाहिले. खरंच मुलगी खूप मोठे धन आहे.

# राजकीय विचार अन् आधुनिक प्रचार

आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणुका उंबरठ्यावर आलेल्या आहेत. नेत्यांच्या गाठीभेटी आणि दौऱ्यांनी चांगलाच वेग पकडला आहे. कमीत कमी वेळेत अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राजकीय नेते अक्षरशः रात्रीचा दिवस करत आहेत. आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू होईल या धास्तीने गेल्या महिनाभरापासूनच राजकीय यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. अधिकृत प्रचार अद्याप सुरु झाला नसला तरी उमेदवाराची प्रतिमा जनमानसात आणण्यासाठी विशेष प्रयत्न सुरु आहेत. या सर्व प्रक्रियेत स्थानिक मीडिया, बॅनर्स यासोबतच डिजिटल यंत्रणेचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु झाला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा पैलू आहे. आणि हाच पैलू पकडत सोशल मीडियाने नागरिकांना हा अधिकार बजावण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या.**



सागर ननावरे, पुणे
प्रख्यात स्तंभलेखक

सोशल मीडियापुर्वी जगभरात इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या मोजक्याच साधनांनी जम बसवला होता. इलेक्ट्रॉनिक मीडियाचा राजकारणात केलेला वापर बराच काळ प्रभावी ठरला. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रैंकलिन डी. रूजवेल्ट १९३३ पासून रेडिओच्या माध्यमातून मतदारांशी संवाद साधत असत. तर यानंतर एक पाऊल पुढे टाकत आणि अमेरिकेचे ३५ वे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी १९६१ ते १९६३ दरम्यान मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी दूरचित्रवाणीचा प्रभावी वापर केला. या दोघांनी हे तंत्रज्ञान स्वीकारत मतदार आणि राजकारणी यांच्यातील संवादाची दरी कमी केली. पुढे जगभर या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. परंतु त्यानंतर चार दशकानंतर सोशल मीडियाचा उगम झाला आणि त्याने क्रांती घडवून आणली. २००० च्या दशकाच्या सुरुवातीला सोशल मीडियाचा वापर काही प्रमाणात सुरु झाला. परंतु राजकीय क्षेत्रात २००८ साली बराक ओबामा यांनी बहुसंख्य मतदारांना एकत्रित करण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर केला. २००८ ची राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक जिंकण्यासाठी त्यांनी प्रचारात सोशल मीडियाचा वापर केला. एका रिसर्च रिपोर्ट नुसार या निवडणुकीत अमेरिकेतील सुमारे ७४% इंटरनेट वापरकर्त्यांनी निवडणुकीच्या बातम्या ऑनलाइन शोधल्या होत्या. याचा परिणाम म्हणजेच बाराक ओबामा यांचा झालेला विजय.

२०१४ साली देशाच्या राजकारणात प्रदीर्घ काळानंतर सत्तापालट झाला. आणि यात डिजिटल प्रचारयंत्रणेचा खऱ्या अर्थाने बोलबाला झाला. भारतात हा ट्रेंड अमेरिकेतून आला. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपासून सुरू झालेला हा ट्रेंड २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत भारतात वापरला गेला. भारतीय जनता पक्षाने या नव्या तंत्रज्ञानाची ताकद लक्षात घेत आधुनिक प्रचारयंत्रणा राबविली. आणि विशेष म्हणजे यातून भारतीय मतदाराची मानसिकता बदलण्यात यश मिळवले.

या डिजिटल प्रचार यंत्रणेसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची सेवा देखील घेण्यात आल्याचे सांगितले जाते. पुढे ही गोष्ट विरोधी पक्षांच्या देखील लक्षात आली परंतु तोपर्यंत 'पक्ष्याने शेत खाऊन टाकले' अशी त्यांची अवस्था झाली होती.

तसे पाहता सोशल मीडियाचा प्रभाव राजकीय क्षेत्रात जरी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत दिसला असला तरी देशाला हे नवीन नव्हते. कारण त्यापूर्वी २०११ साली याच सोशल मीडियाने आण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनाला चांगलीच धार मिळवून दिली होती. सोशल मीडियामुळे जणू एका नव्या क्रांतीची झलक त्याकाळात पाहायला मिळाली होती. हे आंदोलन देशभरात वेगाने पसरले होते. याच सोशल मीडियाचा वापर लोकसभा निवडणुकीत उत्तम व्यवस्थापनाच्या आधारे करण्यात आला. फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, यूट्यूब असे अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने लोकमनाचा ताबा घेतला. राजकीय पक्षांनी तर निवडणुकीसाठी निर्भयपणे त्याचा वापर केला आणि प्रभाव पडला.

निवडणुकीत सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणूक प्रचाराचे जे काम पूर्वी हजारो कामगार करत असत, ते आता फक्त काही लोक आयटी सेलच्या माध्यमातून करतात. २०१३-२०१४ नंतर आयटी क्षेत्रात मोठे बदल झाले. पूर्वी लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी राजकीय पक्ष बॅनर आणि पोस्टर्स छापत असत. आता ती माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवली जात आहे. राजकीय पक्ष प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहेत. २०१४ पूर्वी कोणत्याही राजकीय पक्षात आयटी सेल नव्हता, परंतु आज प्रत्येक राजकीय पक्षाचा आयटी सेल कार्यरत आहे. पक्ष प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचा सर्रास वापर केला जात आहे.

भारतात राजकीय क्षेत्रातील सोशल मीडियाला एव्हाना दशकपूर्ती झाली आहे. या दशकभरात अनेक नवनवीन डिजिटल साधने उदयास आली आहेत. कालानुरूप त्यांची परिणामकारकता बदलताना दिसत आहे. अशात लोकांचा मूड समजून घेऊन त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी केवळ सोशल मीडियाचा वापर पुरेसा नाही हे राजकीय पक्षांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत उपलब्ध साधनांपैकी कोणत्या साधनाला कोण कशा पद्धतीने वापरात आणतो यावर बरीच गणिते अवलंबून आहेत. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर कुठे ? कसा ? आणि किती प्रमाणात करायचा याचा उलघडा जिथे होईल तीच रणनिती प्रभावी ठरणार आहे.



आधुनिक केसरी



# लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424




मॉकटेल मधील सर्वांत जास्त मागणी असणारा. सर्वांनाचा लाडका हा कोल्ड्रिंकचा प्रकार असून हे तसे एनर्जी ड्रिंक, रिफ्रेशमेंट ड्रिंक, डायजेशन साठी बेस्ट असलेले बहुगुणी शीतपेय आहे. जेवताना, जेवण्यापूर्वी किंवा नंतर कधीही हे पिण्यासाठी उत्तमच असते. खास करून उन्हाळ्यात तरी शरीरातील पाणी कमी होऊ नये म्हणून आणि थंडावा निर्माण करण्यासाठी हे आवर्जून प्यायले जाते. हॉटेल्स मध्ये जेवताना बहुतेक टेबलवर ही दिसतातच. पण खरंतर ही बनवायला खूपच सोपी असतात. घरी झटपट बनवू शकतो ते पण अनेक प्रकारे आणि अगदी स्वस्तात . उन्हाळ्यात घरात काही सॉफ्ट कोल्ड्रिंक्स , लिंबे, पुदिना, फ्रुट्स असतातच त्यातुन आपण विविध कॉम्बिनेशनस् करून विविध प्रकारची मॉकटेल्स बनवू शकतो. पहायचे मग.. **मिंटलेमन मोजितो :** 2..3रसदार लिंबे , थोडा पुदिना, पेपरमिंटच्या 2 गोळ्यान्ची पावडर , सोडा , चाट मसाला , साखर , भरपूर बर्फाचा चुरा , मिठ. **कृती :** प्रथम एका लिंबाच्या एकदम पातळ चकत्या करून ठेवू त्या सजावटी साठी उपयोगी पडतील . 2..3 लिंबांचे बारीक तुकडे बनवून ठेवू. आता एका काचेच्या उंच ग्लासमध्ये 5..6 लिंबाच्या फोडी ,8..10 पुदिन्याची पाने घालून ती लाकडी दांड्याने किंवा लाटणे..रविच्या दांड्याने थोडीशी ठेचावीत म्हणजे सालीसकट लिंबू आणी पुदिना यांचा छान एकत्र फ्रेश सुगंध येईल . मग त्यात 1 चिमूटभर पेपरमिंटच्या गोळ्यांची पावडर घालावी .याचा खूपच सुरेख आणि वेगळा फ्लेवर येईल . नंतर त्यात 1चमचा साखर घालून थोडासा चाट मसाला घालावा त्याचा स्वाद आणि टेस्ट खूपच सुरेख लागते .आवडत नसेल तर चिमूटभर मिठ चवीसाठी घालावे .त्यानंतर त्यात भरपूर म्हणजे पाऊण ग्लास भरेपर्यंत बर्फाचा चुरा घालावा व हे सर्व सुरी किंवा चमच्याने छान मिक्स करावे. शेवटी एका बाजूने उंचावरून न घालता सावकाशपणे ग्लास भरेपर्यंत सोडा घालावा .म्हणजे तो फेस होऊन बाहेर सांडणार नाही. आता ग्लासला सजावटी साठी लिंबाची एक पातळ चकती ग्लासच्या काठावर लावावी आणि लगेंच थंडगार सर्व्ह करावे. **वैशिष्टय :** यातील लिंबू आणि पुदिना फ्रेश स्वादाबरोबरंच आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. लिंबातून भरपूर व्हिटॅमिन सी मिळते. त्यात रोगप्रतिकारक शक्ती असते, त्वचेसाठी, केसासाठी, अपचन, ऍसिडिटी , वजन कमी करण्यासाठी आणि रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी,उत्साह , एनर्जी वाढवण्यासाठी खुप उपयोगी असते .पुदिना तर उत्तम आरोग्यासाठी खजिनाच आहे . याचे असंख्य आणि खूप चमत्कारीक फायदे आहेत . अगदी केसपासून पायाच्या नखांपर्यंत सर्व शरीरासाठी हे उत्तम टॉनिक आहे .संधीवातापासून ते पोटाच्या विविध तक्रारी , रक्तदोषांतक , त्वचेचे विकार , दात , हार्ट यान्च्या तक्रारी दूर करतो. स्त्रियांसाठी तर हा परीसच आहे . हा ताजा उपलब्ध नसेल तरी वाळवुन ठेवलेला वापरला तरी चालतो पण खाणे खूप फायद्याचे आहे .सर्वांत महत्वाचे म्हणजे दिसायलाही आकर्षक असून टेस्ट तर लाजवाबच असते .सोड्यामुळेसुद्धा पचन उत्तम होण्यास मदत होते.

# पोलिसांची धडक कारवाई : 24 पेटी दारू, स्कार्पिओ जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** बल्लारपूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक आसिफ राजा शेख यांनी धडक कारवाई करीत २४ पेटी दारू सह स्कॉर्पिओ सहित ७ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक आसिफ राजा शेख यांना गुप्त माहिती मिळाली की, बल्लारपूर मार्गे गडचिरोली जिल्ह्यात अवैधरीत्या दारू ची खेप जाणार आहे. त्यानुसार बामणी येथील एसएसटी पॉइंट च्या मागे सापळा रचून नाकाबंदी २४ पेटी देशी दारू रॉकेट संत्रा सह एक स्कॉर्पिओ असा एकूण ७ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त केले असून सचिन उर्फ भांजा राजु अडलाकोंडावार रा.महाराणा प्रताप वार्ड, बल्लारपूर व निखिल आत्माराम वनकर रा.विद्यानगर वार्ड बल्लारपूर यांना अटक केले. येथील आरोपी सचिन उर्फ भांजा राजु अडलाकोंडावार रा. महाराणा प्रताप वार्ड बल्लारपूर हा तडीपार गुन्हेगार असून त्याच्या वर १८ गुन्ह्याची नोंद आहे. त्यात दारू, मारामारी तसेच आर्म ॲक्ट चे गुन्हे आहे. तो १९ डिसेंबर २०२३ पासून तडीपार होता.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आसिफराजा शेख यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत भोयर पोलीस उपनिरीक्षक गोविंद चाटे, सयाम शेख, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन डोईफोडे, पोलीस अंमलदार लखन चव्हाण , संतोष दंडेवार यांनी केले.

पुढील तपास पोलीस निरीक्षक असिफ राजा शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित कुमार पांडेय करीत आहेत.






# संवत्सर येथे जालिंदरनाथांची यात्रा होणार संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील संवत्सर लक्ष्मणवाडी येथील सालाबादा प्रमाणे संपन्न होणारी श्री जालिंदरनाथ (जंगलीबाबा) यात्रा या वर्षी शनिवार दि.३० मार्च पासून प्रारंभ होत असून या दिवशी भव्य मिरवणूक संपन्न होणार असून रविवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जाहीर हरी किर्तन संपन्न होणार असल्याची माहिती यात्रा समितीने दिली आहे. नाथ संप्रदाय हा भारतातील एक शैव संप्रदाय आहे."नाथ" या संज्ञेचा अर्थ रक्षणकर्ता अथवा स्वामी असा होतो. आदिनाथ म्हणजेच शिव वा महादेव यांच्यापासून या संप्रदायाचा उगम झाला म्हणून त्याला "नाथ संप्रदाय" असे नाव मिळाले असे सांगण्यात येते. या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर व्यक्ती आपल्या नावानंतर "नाथ" हा शब्द जोडता येतो. नाथ संप्रदायाची स्थापना मत्स्येंद्रनाथ ऊर्फ मच्छिंद्रनाथ यांनी केली आणि गोरक्षनाथ



ऊर्फ गोरखनाथ यांनी त्याचा पुढे विकास केला. नाथपंथ वा नाथ संप्रदाय हा शैव संप्रदायातील एक योगप्रधान संप्रदाय असून ह्याचा उगम (सुमारे ८व्या ते १२वे शतकात) आदिनाथ परमेश्वर शिव ह्याच्यापासून झाला अशी ह्यांच्या अनुयायांची समजूत आहे.योगमार्गाने सिद्‌घावस्था प्राप्त करणे हे ह्या पंथाचे ध्येय होय.नवव्या शतकातील मच्छिंद्रनाथ हे ह्या संप्रदायाचे पहिले मानवी गुरु. गोरखनाथांनी ह्या संप्रदायाला नावारूपाला आणले. या नाथ संप्रदायाची अनेक ठिकाणे महाराष्ट्रात प्रसिद्ध असून यातील एक ठिकाण संवत्सर येथील लक्ष्मणवाडी (दहिगाव बोलका) येथे प्रसिद्ध आहे.या ठिकाणी दरवर्षी मोठी यात्रा भाविक भक्त मोठ्या उत्साहात भरवत असतात.

दरम्यान या ठिकाणी सालाबादप्रमाणे दर वर्षी मोठा यात्रा उत्सव संपन्न होत असतो.या वर्षी शनिवार दि.३० मार्च पासून प्रारंभ होत असून या दिवशी सायंकाळी ०६ वाजता भव्य मिरवणूक भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार असून दुसऱ्या दिवशी रविवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जाहीर हरी किर्तन संपन्न होणार असून उपस्थितीत भाविकांना महा प्रसादाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती यात्रा समितीने आमच्या प्रतिनिधीस दिली आहे. या उत्सवाचा संवत्सर, लक्ष्मण वाडी, दहिगाव बोलका, कासली, पढेगाव आदी ठिकाणच्या भाविकांनी घ्यावा असे आवाहन यात्रा समितीचे शिवाजी गायकवाड यांनी केले आहे.

# भागवत कथा श्रवण केल्यास वाईट गुण नष्ट होतो : मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील द्वारका नगरी येथे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते श्रीमद् भागवत कथेच्या काल्याच्या कार्यक्रमानिमित्त ह.भ.प रामेश्वर महाराज मगर यांचे कीर्तन पार पडले यावेळी उद्योजक मनोज पवार आणि उद्योजिका उर्मिला मनोज पवार यांनी फुगडी खेळून कार्यक्रमाचा आनंद घेतला यावेळी उद्योजक मनोज पवार बोलतांनी म्हणाले की भागवत कथा श्रवण केल्यास माणसातील वाईट गुण नष्ट होतो. हरीचे स्मरण करून भागवत कथा ऐकण्याची गरज आहे . पवार यांच्या हस्ते ह.भ.प रामेश्वर महाराज मगर यांचा सत्कार केला यावेळी उपस्थित केतन काजे माजी नगर सेवक काकासाहेब कवडे, अशोक दाबके, संजय जाखड, प्रवीण घुगे, हेमंत वडनेरे, सुनील अकोलकर प्रफुल शिरोडे, कन्नड शहरातील भाविक भक्त आणि उद्योजक मनोज पवार मित्र मंडळ यांची उपस्थीती होती .



# ‘कोविड-19’ महामारीचे राजकारण कशाला करता ?

## पराजयाच्या भीतीमुळे प्रतिभा धानोरकर यांचे निराधार आरोप : देवराव भोंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ‘कोविड-19’ महामारीचा काळ संपूर्ण मानवजातीसाठी अत्यंत कठीण आणि तितकाच दुर्देवी काळ होता. या काळात करोडो लोकांचे जीव गेले, लाखो कुटुंब उध्वस्त झाले. ‘कोविड-19’ च्या जखमा आजही ताज्या असताना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्या जखमांना उकरण्याचे राजकारण त्यावेळी सत्तेत असलेल्या काँग्रेसकडून सुरू झाले आहे.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघासाठी नामांकन अर्ज सादर केल्यानंतर काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यावर आरोपाच्या थेट फेरी झाडल्या आहेत. कोविड-19 विषाणुच्या महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या कामाचा पाढा वाचतानाच, स्वतःला विकासपुरूष, लोकप्रतिनिधी म्हणवणारे सुधीर मुनगंटीवार यांनी कोरोना काळात काम केले नाही असा आरोप केला आहे.

हे आरोप धादांत खोटे आणि निराधार असल्याचे चंद्रपूरचे माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी म्हटले आहे. ‘कोविड-19’ च्या काळात सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या कामाची यादीच त्यांनी जाहीर केली आहे. ते



म्हणाले, कोविडच्या काळामध्ये महाराष्ट्रात महविकास आघाडीचे सरकार होते.शासन व प्रशासनाच्या आधी या जिल्ह्यातील जनतेला मदतीचा पहिला हात देणारे नेते सुधीर मुनगंटीवार होते. अशा कठीण काळात राज्यात शासनातले नेते ढिंम होते. सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधी पक्षात असूनही आरोग्य यंत्रणेच्या झूम बैठका घेत,यंत्रणेला कामाला लावले.

सरकारमध्ये नसतांनाही स्वतः पुढाकार घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मॉस्क, पी. पी. ई. कीट्स आणि सॅनिटायझर उपलब्ध करून देऊन कामाला लावण्याचे काम सुधीर मुनगंटीवार यांनी केले. त्यांनी पुढाकार घेऊन तत्कालीन आरोग्य मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, आरोग्य सचिव, यांच्यासोबत झूम बैठका घेऊन चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधांना सरकारच्या मदतीची वाट न पाहता आवश्यक ते सर्व साहित्य वितरीत करण्याचे काम केले, असे देवराव भोंगळे म्हणाले. देवराव भोंगळे पुढे म्हणाले, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी २०० ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर, ५० व्हेंटिलेटर बेड तसेच, अनेकांना रेमडेसिवीर इंजेक्शन उपलब्ध करून देण्याचे काम केले. आरोग्य सेविका, डॉक्टर व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना १००० हून अधिक पीपीई किट देण्याचे काम सुधीर मुनगंटीवार यांनी केले. १०,६०० सॅनीटायझर बॉटल व कॅन, २,५,०००० मास्क, गरजूंना ५०,५६५ फुड पॉकेट तर २६,३८९ गरजु व्यक्तींना धान्यकिटचे वाटप केले आहे. याशिवाय, बाहेरगावी अडकलेल्या लोकांना स्वगृही आणण्याकरीता ३० ट्रॅव्हल्स, ४० ट्रक, ४० छोटी वाहनांची व्यवस्था, मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबीरांचे आयोजन, होमिओपॅथी गोळ्यांचे वितरण, रूग्णवाहिकांची व्यवस्थादेखील ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

‘झूठ बोले कौवा काटे’ ही हिंदीतील म्हण लोकांना चांगलीच माहिती आहे, त्यामुळे मतदारांनी अशा खोट्या प्रचाराला बळी पडू नये, असे आवाहनही देवराव भोंगळे यांनी यावेळी केले आहे.

# निवडणुकीच्या रणधुमाळीत अपक्ष आ. जोरगेवार निवांत

आधुनिक केसरी

लोकसभा 2024 ची रणधुमाळी जोरदार सुरू झाली आहे . चंद्रपूर मध्ये चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील वजनदार नेते सुधीर मुनगंटीवार यांना भाजपने मैदानात उतरवले आहे. तर, काँग्रेसने दिवंगत खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना रणांगणात उतरवले आहे. दोन्ही पक्षांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत आपले नामांकन अर्ज दाखल केले आणि दोन्ही पक्षांनी जाहीर सभा घेत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी ही झाडल्या. निवडणुकीची ही रणधुमाळी एकीकडे जोरदार सुरू झाली असताना चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार हे मात्र आपल्या राजमाता निवासस्थानी आपल्या कुटुंबीयांसह निवांत वेळ घालवीत आहेत. त्यामुळे तब्बल 72 हजाराहून जास्त मतांनी निवडून आलेल्या आमदार किशोर जोरगेवार हे या निवडणुकीत नेमकी कोणती भूमिका घेणार? याकडे आता न केवळ चंद्रपूर तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे .



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये एकूण सहा विधानसभा आहेत . यातील चंद्रपूर विधानसभा ही या लोकसभा क्षेत्राची केंद्रबिंदू म्हणून ओळखली जाते . चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातून निघालेले निवडणुकीचे वारे हे लोकसभा क्षेत्रातील ईतर सर्व विधानसभांमध्ये पोहोचत असतात . त्यामुळे चंद्रपूर विधानसभेमध्ये ज्या उमेदवाराने सर्वाधिक मतांची आघाडी घेतली तो उमेदवार लोकसभेच्या निवडणुकीत निवडून येतो हा आजवरचा इतिहास आहे . 2019 मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आमदार किशोर जोरगेवार यांनी तब्बल 72 हजार पेक्षा जास्त मतांची आघाडी घेत या विधानसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये आपल्या दमदार वर्चस्वाची चुणूक अवघ्या महाराष्ट्राला दाखवून दिली . या पार्श्वभूमीवर चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी मात्र लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने अजूनही आपले पत्ते उघडलेले नाहीत.




वास्तविक पाहता महाराष्ट्रात असलेल्या सध्याच्या सरकार ला त्यांचा पाठिंबा आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी त्यांचे अतिशय स्नेहपूर्ण जवळचे संबंध आहेत. त्यामुळे मित्र पक्षांच्या यादीत त्यांचं नाव अग्रस्थानी आहे. असं असताना सुद्धा महायुतीचे उमेदवार म्हणून उभे राहिल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी नामांकन अर्ज दाखल करायला जाण्यापूर्वी जी प्रचार सभा घेतली त्या प्रचार सभेमध्ये आमदार किशोर जोरगेवार यांना मुनगंटीवार यांनी स्वतः निमंत्रित केलेले नव्हते . तर दुसऱ्या बाजूला प्रतिभा धानोरकर यांनी मात्र स्वतः आमदार किशोर जोरगेवार यांच्या घरी जात राजमाता निवासस्थानी अम्मांचे आशीर्वाद घेऊन किशोर जोरगेवार यांना शक्ती प्रदर्शनात सहभागी होण्याबाबत आमंत्रण दिले होते . शिवाय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी सुद्धा आमदार किशोर जोरगेवार यांची भेट घेतली होती . परंतु आमदार किशोर जोरगेवार यांनी दोनही सभेमध्ये जाणे टाळले. सध्या ते आपल्या घरी आपल्या कुटुंबियांच्या सोबत निवांत वेळ घालवत आहेत. आणि आपल्या जनसंपर्क कार्यालयात जनतेच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यात ते व्यस्त आहेत.







2019 च्या निवडणुकीमध्ये आमदार किशोर जोरगेवार यांच्याविरुद्ध भाजपचे नाना शामकुळे अशी थेट लढत होती .त्यावेळेस पक्षश्रेष्ठींच्या आदेशामुळे सुधीर मुनगंटीवार हे नाना शामकुळे यांच्या निवडणुकीत प्रत्यक्ष वेळ देऊन नाना शामकुळे विजय होतील यादृष्टीने प्रयत्न करत होते . त्यादरम्यान घडलेल्या अनेक घडामोडींमुळे जोरगेवार मुनगंटीवार संबंध हे तेव्हापासूनच ताणले गेले आहेत . पण आता मात्र लोकसभेची उमेदवारी मुनगंटीवार यांना जाहीर झाली आहे आणि जोरगेवार हे महाराष्ट्रातील सध्याच्या सरकारमधील एक अपक्ष आमदार आहेत ज्यांचा सरकार ला पाठिंबा आहे . आणि यंग चांदा ब्रिगेड च्या माध्यमातून जोरगेवार यांचं एक मोठं नेटवर्क या विधानसभेत आहे . त्यामुळे जोरगेवारांचा पाठिंबा हा दोन्ही उमेदवाराला अतिशय महत्वाचा आहे . वास्तविक पाहता आमदार किशोर जोरगेवार हे आधी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी होते . परंतु पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे त्यांनी अपक्ष आमदार म्हणून सर्वाधिक मताने निवडून येत आपलं स्वतःचं बळ त्यांनी दाखवून दिलेल आहे. त्यामुळे त्यांच्या या नेटवर्क चा फायदा नेमका कोणाला मिळेल यावर लोकसभेचा निर्णय महत्वपूर्ण ठरणार आहे. पण 2019 च्या निवडणुकीपासून आणि त्या निवडणुकीमुळेच दुरावलेले मुनगंटीवार जोरगेवार यांचे संबंध मुनगंटीवार या निवडणुकीच्या माध्यमातुन पुन्हा जुळवून घेतील का ? राजमाता निवासस्थानी जाऊन तेही अम्मांचा आशीर्वाद घेतील का ? आणि महायुती सरकारच्या मित्रपक्ष यादीतील जोरगेवार हे मुनगंटीवार यांना मदत करतील का ? याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. कारण महाराष्ट्रातील ही सीट एक हॉट सीट आहे.

# धाराशिव लोकसभा निवडणुकीत कळंब काँग्रेस जोमाने काम करण्याचा निर्धार केला

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** कळंब तालुका काँग्रेस कमिटीची बैठक संपन्न झाली असून या बैठकीमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवाराला बहुमताने विजयी करण्याचा व सर्वाधिक कळंब तालुक्यातुन मतादिक्य देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

दि.28 मार्च रोजी मोहा रोड रंगीला चौक येथे सकाळी 11 वा बैठकीचे आयोजन तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार यांनी केले होते.

सध्या सुरू झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात सामान्य जनतेची कार्यकर्त्यांची कामे व अडचणी सोडवण्यासाठी व आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी काँग्रेस पक्ष प्रयत्नशील राहील, असे आश्वासन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले राजाभाऊ शेरखाने यांनी सर्वांच्या समक्ष दिले.

कळंब तालुका किसान काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष विलासराव करंजकर यांनी शिवाजी रामा हजारे यांची तालुका उपाध्यक्ष पदी, व आत्माराम दासबा अडसूळ यांची तालुका सरचिटणीस म्हणून नेमणूक करुन जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा उपाध्यक्षा डॉ. स्मिता शहापुरकर, तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार,यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. या बैठकीत



तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार, शहराध्यक्ष रवी ओझा, जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा डॉ. स्मिता शहापुरकर, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विलासराव करंजकर, युवक काँग्रेसचे कळंब विधानसभा अध्यक्ष भैय्या निरफळ, शहर कार्यध्यक्ष सचिन गायकवाड ,बाबुराव तवले, उद्धव धस दिलीपसिंह देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी जिल्हा उपाध्यक्ष शंकराव करंजकर,महिला ता.अध्यक्ष अंजली ढवळे, महिला जिल्हा उपाध्यक्ष ज्योती सपाटे, तनपुरे, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शहाजान शिकलकर, शहराध्यक्ष शिलानंद शिनगारे, युवक काँग्रेसचे उपाध्यक्षकलीम तांबोळी, अॅड .भारत लोमटे, तालुका सचिव संजय पवार, प्रभाकर जाधव, माजी पंचायत समिती सभापती किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष मोरे अॅड. नितीन अंगरखे ,मोती पुरी,राजाभाऊ गिरी, पप्पू बनसोडे,सूर्यकांत कदम,प्रसन्न ढगे, व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार शहर कार्यध्यक्ष सचिन गायकवाड यांनी मानले.

# 24 कोटींची वादग्रस्त निविदा अखेर रद्द, मात्र आयुक्तांना अभय ?

## तर न्यायालयात दाद मागणार : पप्पू देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 16 मार्चला लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर चंद्रपूर महानगरपालिकेने दिनांक 18 मार्च रोजी शहरातील रामाळा तलावाच्या पुनर्जीवनाची 24 कोटी रुपये किमत असलेल्या नविन कामाची निविदा प्रसिद्ध केली. या प्रकरणात चंद्रपूर मनपाचे माजी नगरसेवक जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा तसेच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्याची लेखी तक्रार केली. या तक्रारीनंतर 26 मार्च रोजी मनपाने वादग्रस्त निविदा प्रक्रिया रद्द केली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर नवीन कामासाठी ई-निविदा प्रक्रिया सुरू केल्यास आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्याची पूर्ण माहिती आयुक्त विपिन पालीवाल यांना आहे. या कामासाठी 540 दिवसांचा कालावधी असतानांही केवळ 8 दिवसांच्या कालावधीत निविदा प्रक्रिया पूर्ण करून मर्जीतील कंत्राटदाराची नेमणूक करण्याचा प्रयत्न मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी केल्याचा आरोप देशमुख यांनी केला.

**निवडणूक निरीक्षक लोकेश कुमार जाटव यांच्याकडे तक्रार ; गरज पडल्यास न्यायालयात जाणार**

आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे केल्यानंतर मनपा प्रशासनाने 24 कोटी रुपये किमतीची वादग्रस्त निविदा प्रक्रिया दिनांक 26 मार्च रोजी रद्द केली . मात्र हेतुपुरस्पर आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे मनपा आयुक्त यांचे विरूध्द आजपर्यंत कोणतीही कठोर कारवाई निवडणूक विभागाने केली नाही . आयुक्त पालीवाल सात वर्षांपासून जिल्ह्यात कार्यरत असून त्यांची कारकीर्द वादग्रस्त असल्याची माहिती निवडणूक विभागाला देण्यात आली . गंभीर तक्रारीनंतरही आयुक्त पालीवाल यांचे विरुद्ध निवडणूक विभागाने तातडीने कारवाई का केली नाही ? निवडणूक विभाग मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांना कारवाई पासून सूट देत आहे का ?असा प्रश्न आहे . याबाबत वन अकादमी येथे आलेले चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा क्षेत्राचे सामान्य निरीक्षक लोकेश कुमार जाटव यांच्या कार्यालयात 29 मार्चला लेखी तक्रार नोंदवली . निवडणूक विभागाने आयुक्त पालीवाल यांचे विरुद्ध कठोर कारवाई न केल्यास न्यायालयात दाद मागणार अशी प्रतिक्रिया देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली .

# जिल्हा हद्दीवर पथक स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ दरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी तालुक्यातील मांजरा नदीकाठी जिल्हा हद्दीवर पथक स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापन करण्यात आहे, या मध्ये चोवीस तासांत तपासणी करण्यात येणार आहे अशी माहिती पोलिस निरीक्षक रवी सानप यांनी दिली आहे. खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले असून प्रत्येक मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते.जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघाअंतर्गत कळंब धाराशिव विधानसभा मतदार संघ हद्दीतील धाराशिव जिल्ह्याची व बीड जिल्ह्याची हद्द म्हणजे मांजरा नदीकाठ च्या नजिक असलेल्या द्वारका नगरी जवळ एक स्थिर सर्वेक्षण पथक स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात. याठिकाणी पथकात कृषी विभागाचे भुजंग लोकरे, जलसंधारण विभागाचे एन बी कानडे हे अधिकारी , कॅमेरामन अजय महामुनी, पोलीस नाईक महादेव मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल एस पी गायकवाड हे हजर होते.



# रावसाहेब दानवे-कल्याण काळे आमने- सामने तर अपक्ष मंगेश साबळे जालना लोकसभा निवडणूकीत येणार का ?

आधुनिक केसरी






सुधाकर जेठे

जालना केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांची भारतीय जनता पार्टी कोण उमेदवारी जाहीर झाली असून तर महाविकास आघाडी काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार डॉक्टर कल्याण काळे 2024 येणाऱ्या जालना लोकसभा निवडणुकीत आमने-सामने का तर दुसरीकडे अपक्ष उमेदवार म्हणून मतदार संघामध्ये चर्चेत असलेले मनोज जरांगे पाटील यांनी पाठिंबा दिला तर किंवा मराठा समाजाच्या वतीने पाठिंबा दिला तर गेवराई पायगावचे सरपंच मंगेश साबळे हे अपक्ष म्हणून चर्चेत सोशल मीडियावर बॅनर बाजूने होतआहे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील चौका येथे एका युवक विवाह प्रसंगी भाजपचे रावसाहेब दानवे तर काँग्रेसचे कल्याण काळे हे एका विवाह प्रसंगी चौका येथे आमने सामने त्यांची एका लग्नामध्ये भेट झाली असून त्यांचे दोन्ही नेत्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे तर अपक्ष उमेदवार म्हणून मंगेश साबळे यांचाही मराठा समाजाच्या वतीने सोशल मीडियावर लोकसभेचे उमेदवार फोटो व बॅनर व्हायरल होत आहे त्यामुळे जालना लोकसभे निवडणुकीमध्ये आमने सामने रिंगणात उतरण लढत होणार की काय तर दुसरीकडे अपक्ष उमेदवार म्हणून मंगेश साबळे तर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यामध्ये रावसाहेब दानवे तर कल्याण काळे येणाऱ्या 2024 च्या लोकसभा निवडणुकीमध्ये आमने-सामने तर मनोज जरांगे पाटील यांच्या पाठिंब्याने अपक्ष म्हणून मंगेश साबळे निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरणार आहे की का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सर्व उमेदवार कोण कोण राहणार असा मतदार मध्ये लक्ष वेधून घेणारी निवडणूक 2024 ची होणार असून तर वेळच ठरवेल निवडणुकीमध्ये कोण रिंगणात उतरणार आहे.





## सुलतानपूर-भांडेगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी लंका विष्णू चव्हाण बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सुलतानपूर -भांडेगाव येथील सरपंचपदी सौ लंका विष्णु चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली ग्रुप ग्रामपंचायत सुलतानपूर भांडेगाव येथील सरपंच पद हे अविश्वास पारित झाल्या मुळे रिक्त होते. सदरील जागेची निवडणूक गुरुवार, 28 मार्च रोजी गुरूवार रोजी पार पडली. यावेळी सरपंच पदासाठी संजय मोरे गटाच्या सौ लंका विष्णू चव्हाण याची एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्यामुळे त्याची सरपंच पदी म्हणून निवडून निवाचन अधिकारी वाघ यांनी बिनविरोध सरपंच पदी घोषित केले. यावेळी नवनिर्वाचित सरपंच याचा उपसरपंच रामलाल निंभोरे व औरंगाबाद ओ.बि सी सेल चे सरचिटणीस संजय मोरे, सेनेचे माजी तालुकाध्यक्ष किशोर कुकलारे भगवान चव्हाण, भाजपचे बांधकाम कामगार मडंळ तालुका अध्यक्ष अविनाश वेताळ, यांनी लंका विष्णू चव्हाण यांना हार, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जगन्नाथ चव्हाण,सुदाम सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य शांताबाई मोरे, शहनाजबी शेख, रिपब्लिकन पक्षाचे नेते गौतम जाधव, पत्रकार प्रकाश श्रीखंडे, बाळासाहेब शेकनाथ श्रीखंडे, राजु श्रीखंडे, भगवान चव्हाण, मिनाबाई चव्हाण, रूख्मणबाई प्रकाश चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष अंबादास चव्हाण यांनी त्यांचा सत्कार केला. निवडणूक प्रक्रिया चे काम निवडणूक निर्णय अधिकारी मंडळ अधिकारी किशोर वाघ, सहाय्यक निवडणूक अधिकारी तलाठी दत्तू शेलार आप्पा, ग्रामविस्तार अधिकारी रामराव सोनवणे, पोलिस पाटील तेजराव चव्हाण, पोलिस पाटील भांडेगाव चे संतोष वेताळ यांनी पार पाडली. तर यावेळी माजी उपसरपंच दादाराव चव्हाण, भगवान चव्हाण, प्रकाश श्रीखंडे, शिवाजी चव्हाण, राजु श्रीखंडे, मुरलीधर चव्हाण, पुंडलिक चव्हाण, मिठ्ठू चव्हाण, विष्णू चव्हाण, काशिनाथ चव्हाण, पुंडलिक चव्हाण, राजुभवर, पोपट वेताळ, अनिल वेताळ, सुभाष चव्हाण, बाळु घुले, शिवदास वेताळ, अतुल चव्हाण, सोमिनाथ चव्हाण, गणेश घुले, प्रकाश घूले, संजय वेताळ, बाबासाहेब मालोदे तातेराव कोतकर सुरेश वेताळ हजर होते.

## चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश देवतळे यांचा भाजपमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणूकीची रणधुमाळी जोर धरत असतांना चंद्रपूर मध्ये इंडिया आघाडीचा प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाला चांगलाच धक्का बसला आहे. चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश देवतळे यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून त्यांच्या भाजप प्रवेशाने चंद्रपुरात चांगलीच खळबळ माजली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व वन, सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात प्रकाश देवतळे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. निवडणूक उमेदवारीच्या धुमश्चक्रीत चार दिवसांपूर्वीच चंद्रपूर लोकसभा मतदार संघातून तेली समाजाचा उमेदवार द्या, अन्यथा वेगळी भूमिका घेवू, अशी मागणी करणारे जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे उपाध्यक्ष आहेत. लोकसभा निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरूवात झाली तेव्हापासूनच काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश देवतळे यांनी पूर्व विदर्भात काँग्रेसने वर्धा, नागपूर, भंडारा-गोंदिया किंवा चंद्रपूर या चार लोकसभा मतदार संघापैकी एक जागा काँग्रेस पक्षाला सोडावी, अशी मागणी अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तथा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे केली होती. मात्र, देवतळे यांच्या मागणीची पटोले व खरगे यांनी काहीच दाखल घेतली नाही . विदर्भातील जागा वाटप करतांना भाजपने वर्धेतून तेली समाजाचे नेते खासदार रामदास तडस यांना उमेदवारी दिली. त्यानंतर देवतळे यांनी तेली समाजाकडून उमेदवारी मागणारे जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष विनायक बांगडे यांच्यासह दिल्लीवारी करून काँग्रेस नेत्यांच्या भेटी घेतल्या. मात्र देवतळे यांना काही यश आले नाही . शेवटी देवतळे यांनी नाराज होवून शुक्रवारी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे पाठवला. त्यानंतर देवतळे यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात जाऊन भाजपमध्ये प्रवेश घेतला.





## फुलंब्री तालुक्यातील पाल येथील रामदास जाधव उत्कृष्ट शेतकरी पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल येथील प्रगतशील शेतकरी रामदास आसाराम जाधव यांना एलोरा नॅचरल सीड्स प्रा. लि. कंपनीच्या वतीने उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रामदास जाधव यांना हा पुरस्कार एलोरा नॅचरल सिड्सचे प्रोडक्शन हेड उमेश खरात, गणेश देशमुख, नामदेव चंद्रे, योगेश जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. दरवर्षी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हा सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. शेतकऱ्याचा सन्मान केला तर शेतकऱ्याचा उत्साह वाढतो. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढते, दोन पैसे शेतकऱ्याला मिळते. त्याचबरोबर कंपनीला शेतकऱ्याचे सहकार्य मिळते असा कंपनीचा उद्देश आहे. यावेळी विजय तमखाने, सूर्यभान गायकवाड, भगवान गोल्हरे, पराजी ढेपले, योगेश धोंडकर, साईनाथ गोल्हारे, मनोहर गायकवाड, दत्तू जाधव, अण्णासाहेब जाधव, सचिन जाधव, नितीन जाधव, समद पठाण, जगदीश कुंटे शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# उन्हाळ्यात ताजी फळे खा, ठणठणीत रहा : डॉ. पाटील

## बाजारात टरबूज 20 तर खरबूज 50 ते 60 रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे तापमानाचा पारा वाढत असून हा कोणाला आला की सर्वांनी वेध लागतात ते टरबूज आणि खरबूज खाण्याचे बाजारामध्ये टरबूज आणि खरबूज ची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली आहे, , तसेच शेतकरी वर्गाचा मोठा प्रमानात नुकसान झाला होता.

तालुक्यातिल एका प्रगतिशील शेतकरी यांनी अशी माहिती दिली की त्यानी मागच्या वर्षी 3 एकर शेतात तरबुज पिके घेतली होती सुरुवाती पासून शेवटी पर्यन्त भरघोस खर्च पन केला सरसरी 2 ते 3 लाख रुपये खर्च झाले मात्र तरबुज न्याला कोन्ही तयार नाही आखिर मि गाई वाल्यांना पूर्ण प्लाट तसच देऊन टाकले यामध्ये माझ्या मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाला होता, अशी माहिती आधुनिक केसरीच्या प्रतिनिधिला माहिती दिली. उन्हाळ्यात रसाळ फळे डीहायड्रेशन वाचवण्यासाठी मदत करतात, त्यामुळे टरबूज खरबूज खा आणि ठणठणीत रहा असा सल्ला आहार तज्ञ करून दिला जात आहे, सध्या बाजारात 17 ते 20 रुपये किलो प्रमाणे उपलब्ध आहे तीन ते साडेतीन किलोपर्यंत फळे बाजारात आहे तर खरबूज 50 ते 60 रुपये किलो प्रमाणे उपलब्ध असून 2 ते अडीच किलो वजनाची फळे बाजारात विक्रीसाठी येत असल्याचे चित्र दिसत आहे, टरबूज का खावे? उन्हाळ्याच्या तपत्या ऊष्माघाताने शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते, टरबूज मध्ये पाण्याचे प्रमाण अधिक असते ते खाल्ल्याने पोट पन भरते आणि फॅट ही तयार होत नाही, टरबूज मध्ये विटामिन ए आणि सी, असते त्यामुळे शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढते.. तरबूज सोबत खरबूज ही उपयोगि बहुतांश भागात लोक तरबूज पेक्षा खरबूज आवडीन खातात, एकी कड़े खरबूज चे भाग तरबूज़ पेक्षा दुपटीने वाढलेले असते,मात्र खाने वाले को दाम से कुछ लेन देन नही ? अशी म्हण सारखे चित्र दिसत खरबूज चे जबरदस्त फायदे आहेत खरबूज मध्ये कॅल्शियम विटामिन सी, एंटीऑक्सीडेंट मोठ्या प्रमाणात असतात या मुळे पोटाच्या अनेक आजाराला आळा तालुक्यातील अनेक भागातुन शेतकरयां कडून व्यापारी वर्ग फळे घेऊन बाजारात येत आहे, उन्हाच्या तीर्वते वाढत असल्याने फळानची मागणी पन वाढत आहे, मात्र बहुतांश ठिकाणी फळे लवकर पिकवन्या साठी फ़ळानवर औषधि वापरून वेगवेगळे प्रक्रिया केली जाते,मात्र असे केल्याने फळ हे धोखेदायक ठरते पवित्र रमजान महीना शुरू आहेत रोजेदार पहाटे पासून दिवस रोजा ठवते व रोजा सोडन्यासाठी फलांना प्रथम प्रसिद्सदी देतात त्यामुळे परिसरात चांगलेच व ताजे स्वछ फळे विकावे अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.

**बसविन्याची शक्यता नकारता येत नाही :** निसर्ग प्रत्येक मोसमात माणसाच्या गरजेनुसार फळे देत असतो शरीरात शरीरातील पाण्याची कमतरता होते त्यामुळे पाणीदार फळाचे सेवन आरोग्यदायी ठरते असल्याने टरबूज, नारळ पानी, खरबूज, मोसंबी, चीकू, अनानस, या सारख्या फळ या दिवसात खायला पाहिजे, कारण फळा मध्ये पाण्याचे प्रमान अधिक असते, उन्हाळाच्या दिवसात उष्म तापमान असल्याने मानवी शरीरातील पानी पातळी ही झपाट्याने कमी होते, मात्र फळानमध्ये पाण्याचे प्रमाण आणि अनेक विटामिन असल्याने हे शरीराला मेनटेन ठेवते, तसेच फळे धुऊन स्वच्छ करून सामान्य तापमानावर तापमानावर आल्यावरच खाल्ल्यास फायदेशीर ठरतात, फळांना जास्त दिवस झाल्यानंतरचे फळ सेवन करू नये, ताजी फळे सेवन करण्यास प्रोत्साहन द्यावी, व ठंड पानी जास्तीत जास्त सेवन करावे . **डॉ . धीरज पाटिल, वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, पिशोर**







# नांथाचा पवित्र रांजण भरला

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथ महाराजांच्या राहत्या वाड्यातील ( गावातील नाथ मंदिर ) पवित्र रांजण शनिवार, पंचमीच्या दिवशी पैठण येथील कु. नेहा मकरंद पैठणकर यांनी रांजणात पाणी ओतल्यानंतर काठोकाठ भरला. भगवान श्रीकृष्णानेदेखील याच रांजणात गोदावरीतून कावडीने पाणी आणून भरल्याची आख्यायिका सांगितली जाते. तेव्हापासून नाथषष्ठीदरम्यान ज्या भाविकाच्या हस्ते रांजण भरतो, त्या भाविकास भगवान श्रीकृष्ण मानून त्याचा सत्कार नाथवंशजांच्या हस्ते करण्यात येतो. यंदा रांजण भरण्याचा मान कु.नेहा मकरंद पैठणकर हिला मिळाल्याने रीतिरिवाजाप्रमाणे सालकरी सौ. उल्का रघुनाथबुवा पालखीवाले यांनी त्यांचे खणा नारळानी ओटी भरून पुजन केले. नाथवंशजांनी त्यांचा सत्कार केला. रांजण भरल्यानंतर प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण नाथषष्ठीला हजेरी लावतात, असे मानले जाते.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या नीलगायी व रानडुक्करांनी धुमाकूळ घातला आहे यामुळे परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहे याचा अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांनी बंदोबस्त केला पाहिजेत असे शेतकरी यांचे म्हणणे आहे. सोयगाव तालुक्यातील देव्हारी येथील शिवारात घडली. ही घटना शेतकरी शेतात काम करत असताना शेतकरी वर रानडुकराने अचानक हल्ला चढवला.या हल्ल्यात डुकराचे दात लागल्याने शेतकरी जखमी झाला आहे. शिवदास हरदास जाधव वय ४५, असे जखमी शेतकरी चे नाव आहे. शिवदास जाधव यांच्या हातांना मोठी जखम झाल्याने डोळ्यांना टाके पडले आहेत. ही घटना घडली. याबाबत माहिती अशी की, शिवदास जाधव या काल, गुरूवारी सायंकाळी शेतात शेतात काम करत असताना त्याच वेळी पाठीमागून रानडुक्कर यांनी अचानक अंगावर धावून हल्ला चढवला. यामध्ये शेतकरी चांगलाच जखमी झाला आहे.

# निसर्गाच्या विचित्र चक्रामुळे आंब्याला फटका

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** यंदा निसर्गाच्या विचित्र चक्रामुळे आंब्यांना मोठा फटका बसला असुण नममात्र तुरळक आंबे आले असल्याचे चित्र आहे. सततचे आभाळ वारा अवकाळी पाऊस थंडीचा अभाव बघता आंब्यांना फटका बसला असुण तुरळक बार फुटले. त्यात वादळी वारे आभाळ आवकाळी पाऊस त्यामुळे आलेला बार ही पडून गेला तर त्यात सततच्या आभाळ धुई वारा याचा अधिकचा फटका आंब्याला बसला आहे.आजरोजी तुरळक आंबे झाडांना लगडले आहे. तुरळक आंब्यामुळे यंदा पाहुण्यांना आमरस मिळणे दुरापास्त वाटते बाजारांत आलेल्या आंब्यांचे भाव आभाळ गाठत आहे.तर ग्रामीण भागांत आंबे झाडाला व बाजारात दिसेना असे झाले आहे.व पुढे ही आंबे बाजारावर अवलंबून आहे. मात्र निसर्गाच्या विचित्र चक्रा मुळे गावरान व बागाईत आंब्यांना फटका बसला असल्याचे चित्र आहे.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# निलेश लंकेंचा भर सभेत आमदारकीचा राजीनामा

## ‘तुतारी’ हातात घेऊन लोकसभेच्या मैदानात! विखे पिता-पुत्रांविरोधात शड्ग ठोकले

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या अहमदनगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील लढतीत अखेर निर्णायक क्षण आला आहे. पारनेरचे आमदार नीलेश लंके यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना ई-मेलद्वारे पाठवत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून लोकसभेच्या मैदानात उतरत असल्याचे जाहीर केले. पारनेरमध्ये झालेल्या संवाद मेळाव्यातून त्यांनी ही घोषणा केली. मी देव पाहिला नाही, पण शरद पवार यांच्या रूपात मला देव दिसला. त्यांच्या शब्दापुढे आमदारकी काय चीज आहे, असे सांगत त्यांनी आमदारकीचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले. ही घोषणा करताना लंके हे कमालीचे भावूक झाले होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांचे रडणे पाहून भरसभेतील वातावरणही प्रचंड भावूक झाले व कार्यकर्ते एकच घोषणा करू लागले. रावणाच्याही अहंकाराचा नाश झाला होता. आपली धनाढ्यांविरोधात लढाई आहे. किमान दोन लाख मतांच्या फरकाने आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे, असे लंके यांनी याप्रसंगी सांगितले. नगर (दक्षिण) मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाने विद्यमान खासदार डॉ. सुजय राधाकृष्ण विखे यांना उमेदवारी दिलेली असून, डॉ. सुजय हे मंत्री राधाकृष्ण विखे यांचे चिरंजीव आहे. त्यामुळे या मतदारसंघात गरीबविरूद्ध श्रीमंत अशी लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नीलेश लंके यांनी आज कार्यकर्त्यांची बैठक घेतली व त्यांच्याशी संवाद साधला. या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांसमोर सविस्तर भूमिका मांडली. यावेळी कार्यकर्त्यांसमोर लंके यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले. ते भावूक झाले. दिल्लीत लोकसभेत शेतकऱ्यांचं म्हणणं मांडण्यासाठी आपण जायला हवं. त्यामुळे मी आज विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतोय. मी माझा राजीनामा विधानसभा अध्यक्षांना पाठवणार आहे, असे नीलेश लंके म्हणाले. यावेळी लंके यांनी राजीनामा वाचून




दाखवला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वात आपण लोकसभा निवडणुकीला सामोरं जाऊ, असे जाहीर केले. ‘आता शिवधनुष्य हाती घेतलं आहे. मी अजित पवारांची माफी मागतो. आता मला माफ करा. मी तुम्हा सर्वांची माफी मागतो. आता आपल्याला कायदेशीर अडकायचं नाही. आता आपण अभिमन्यू आहोत. आपण चक्रव्युहात अडकलो आहोत. तुम्ही मला पाच वर्षांसाठी निवडून दिलं. मात्र आता साडेचार वर्षे झाली आहेत. मात्र मी तुम्हाला विचारल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. आता आपल्याला ठोस निर्णय घ्यावा लागेल. चार महिने कमी असताना आपल्याला कटू निर्णय घ्यावा लागेल. हा निर्णय घेण्याची वेळ आली तेव्हा मी म्हणालो माझ्या लोकांना विचारू द्या’, असे सांगताना आ. लंके हे भावूक झालेत. मी देव पाहिला नाही, पण देवासारखा श्रेष्ठ माणूस ज्येष्ठ नेते शरद पवार साहेबांमध्ये मी पाहिला. त्यांनी मला सांगितले की नीलेश तूच लोकसभा निवडणूक लढ. पवार साहेबांच्या शब्दापुढे आमदारकी काय चीज आहे, असे भावनिक सुरात सांगून नीलेश लंके यांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. इथल्या सर्वशक्तीमान सत्ताधाऱ्यांना हरवायचं असेल तर त्याआधी आपल्याला कटू निर्णय घ्यावा लागेल. आमदारकीचा राजीनामा देताना मला खूप वेदना होतायेत, जनतेने मला माफ करावे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी डोळ्यात अश्रू आणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही माफी मागितली.



# लसणाआड पुष्पा स्टाईल ठेवलेला अफू जप्त

## लाखोंचा मुद्देमाल सहित आरोपी शिरपूर ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मानवी मेंदूला गुंगी येणाऱ्या प्रतिबंधीत अफूची वाहतूक रोखत मध्यप्रदेशातील शिरपूर तालुका पोलिसांनी दोघां आरोपिंना बेड्या ठोकल्या आहे. विशेष म्हणजे आरोपींनी पुष्पा स्टाईल वाहनात विशेष कप्पा बनवून त्यात अफू लपवला होता व संशय न येण्यासाठी वाहनात लसणाचे पोते रचण्यात आले होते मात्र गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी चालक व वाहकाचे मनसुबे उधळले. कृपालसिंग उमेदसिंग राजपूरोहित (35, डोली पाचपदरी, जि. बारमेर, राजस्थान, ह.मु. नाकोडा स्वीट, येवला, जि. नाशिक) व रघुनाथसिंग कचरूसिंग गुजर (21, आनेडाता, सोहासरा, जि.मन्सूर, मध्यप्रदेश) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेल्या अफूची वाहतूक होत असल्याची माहिती सांगवी पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाल्यानंतर त्यांनी पथकाला कारवाईचे निर्देश दिले. पळासनेर चेकपोस्टवर नाकाबंदी लावल्यानंतर वाहन क्रमांक (एम.पी.13 जी.बी.3525) आल्यानंतर त्याची तपासणी केल्यानंतर विशेष कप्प्यात पाच लाख 76 हजार रुपये किंमतीची 72 किलो वजनाचे सुकलेल्या अफूची बोंडे व सात लाख रुपये किंमतीचे दोन किलो अफीम तसेच पाच लाख रुपये किंमतीचे बोलेरा वाहन मिळून एकूण 12 लाख 75 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई धुळे पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका निरीक्षक श्रीराम पवार, बाळासाहेब वाघ, रफिक मुल्ला, संदीप ठाकरे, मंगेश मोरे, चत्तरसिंग खसावद, दिनेश सोनवणे, शिवाजी वसावे, कृष्णा पावरा, वाला पुरोहित, दिनकर पवार, रोहिदास पावरा, जयेश मोरे, चालक मनोज पाटील आदींच्या पथकाने केली.

# जारीकोटचे नागरिक त्रस्त; तलाठी वसुलीत व्यस्त; सज्जा कार्यालय कुलूपबंद

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील जारीकोट येथील तलाठी सज्जा कार्यालय फक्त शोभेची वस्तू बनले आहे. कार्यालय कधीही कुलूपबंदच राहत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तलाठी संतोष मंगरुळे हे तलाठी सज्जाकडे फिरकत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे प्रशासनाने त्याची दखल घेत गावात तातडीने कायमस्वरूपी तलाठी उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

तलाठ्याने सज्जाच्या मुख्यालयी राहावे व सर्व कामे मुख्यालयीच करावीत, असा नियम आहे; परंतु तलाठी सज्जाच्या ठिकाणी राहत नाही. हा प्रकार नित्याचाच आहे. जारीकोट सजाच्या ग्रामस्थांना सातबारासह जमिनीचा दाखला काढणे, वाटणी पत्रक करणे, हक्कसोड करणे, फेरफार नक्कल, बोजा चढविणे व उतरविणे, निराधार योजना, दिव्यांग योजना, उत्पन्नाचा दाखला आदी कामे, तलाठी मंगरुळे सज्जामध्ये येत नसल्यामुळे खोळंबली आहेत. आठवडयातून एखादा दिवसच तलाठी गावात हजर राहत आहे. तेंव्हाही नेटवर्कचे कारण सांगून ग्रामस्थांची कामे टाळली जातात. शेतकऱ्यांची किंवा विद्यार्थी, वयोवृध्द, दिव्यांग, विधवा महिलांची कामे असल्यास ते तलाठयाला फोन करून संपर्क करतात. तेंव्हा गावात नेटवर्कची रेंज नसल्याचे कारण पुढे करत तालुक्याच्या ठिकाणी येण्याचे सांगतात. 15 किलोमीटर अंतरावर धर्माबाद असल्यामुळे शेतकऱ्यांना आपली शेतातील कामे सोडून तर मोलमजुरी करणाऱ्यांना रोजंदारीची कामे सोडून तालुक्याला चकरा माराव्या लागत असल्याने दुहेरी भुर्दंड सहन करावा लागत आहे. उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे व तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी तत्काळ याकडे लक्ष देऊन गावकऱ्यांची होणारी हेळसांड थांबवावी, अशी मागणी होत आहे.

**तलाठ्याची दुकानदारी तालुक्यावरी :** जारीकोट येथील तलाठी मंगरुळे यांनी आपली दुकानदारी तालुक्यावरच थाटली आहे. शहरातील देवी गल्लीमध्ये त्यांचे तलाठी कार्यालय आहे. जारीकोट येथील सर्वसामान्य नागरिकांना आपली कामे करण्यासाठी तालुक्यावरील तलाठी कार्यालयाला हेलपाटे मारावे लागत आहे. शासन स्तरावर मोठा गाजावाजा करत कोट्यावधी रुपये खर्च करून "शासन आपल्या दारी" हा कार्यक्रम राबविला जातो. मात्र, तो कार्यक्रम केवळ दिखावाच आहे की काय? असा प्रश्न पडला आहे. तालुक्यावरील तलाठी कार्यालयाला चकरा अन हेलपाटे मारूनच नागरिक त्रस्त आहेत. तलाठी तालुक्यावरी सुद्धा वेळेवर भेटत नसल्याच्या तक्रारी आहेत.



# चेक, तिरवंजा, कवटी येथील वाचनालयास स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट

आधुनिक केसरी न्यूज

**भद्रावती :** तालुक्यातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या युगात पुढे जावे, कुठेही ज्ञानाअभावी कमी पडू नये या उदांत हेतुने स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरीयल रविंद्र शिंदे चॅरीटेबल ट्रस्ट चंद्रपूरचे “वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण समृध्दी योजना” उपक्रम अंतर्गत चेक तिरवंजा कवटी येथील वाचनालयास स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट देण्यात आली.

समाज सेवेचे व्रत अंगीकृत असलेले व कोरोणा काळापासून घेतलेले मावसेवेचे व्रत अविरत सुरु ठेवण्याकरीता तसेच समाजसेवा व मानवसेवा यास साजेसा “एक हात मदतीचा” हे ब्रीदवाक्य घेवून “आत्मविश्वास बाळगा, हिच खरी आपली ताकत” असा संदेश देत



अविरत कार्य करीत असलेली रविंद्र शिंदे यांच्या संकल्पनेतुन साकार झालेले स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरीयल रविंद्र शिंदे चॅरीटेबल ट्रस्ट चंद्रपूर. समाजातील दिन-दुबळे, गरीब-गरजू, पिडीत-शोषीत, शेकरी-शेतमजुर, निराधार, दिव्यांग, महिला, विद्यार्थी, गंभीर आजारी रुग्ण आदीसाठी ट्रस्टव्दारे विविध योजना उपक्रम चालविल्या जात आहेत. यामध्ये श्रध्देय बाबा आमटे आरोग्य अभियान, विदेही सदगुरु श्री संत जगन्नाथ महाराज जनजागृती व प्रबोधन सामाजिक उपक्रम, स्व. सिंधुताई सपकाळ शैक्षणिक पाल्य दत्तक योजना, कै. म ना पावडे क्रिडा स्पर्धा योजना, डॉ. एपीजे अब्दुल कलाम विद्यार्थी कल्याण योजना, वंदनीय राष्ट्रसंत तुकाडोजी महाराज शिक्षण संमृध्दी योजना, हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे दिव्यांग योजना असून याचा नागरीकांना लाभसुध्दा मिळत आहे. असेच ट्रस्टचे एक उपक्रम “वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण समृध्दी योजना” अंतर्गत तालुक्यातील चेक तिरवंजा कवटी येथील वाचनालयास स्पर्धा परीक्षा पुस्तके ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. वाचनालयातर्फे स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असलेले अभिषेक ताजणे, शंकर उपरे, यश चौधरी, वेदांत सोनटक्के यांनी स्वीकारली.

ट्रस्टव्दारा चालविण्यात येणारे उपक्रम अभियानांचा समाजातील नागरीकांनी लाभ घेण्याकरीता संपर्क करण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले यांनी यावेळी सांगीतले आणी ट्रस्ट गरजू, गरीब नागरीकांना नक्कीच मदत करणार असल्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी ट्रस्टचे संस्थापक सदस्य तथा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) वरोरा विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे, उपजिल्हा प्रमुख तथा भद्रावती कृउबास सभापती भास्कर ताजणे, उपशहर प्रमुख अरुण घुगुल, जि.प. नंदोरी-कोकेवाडा विभाग समन्वयक हरीभाऊ रोडे, ट्रस्टचे कार्यवाहक अनुप कुटेमाटे, माजी नगरसेवक प्रशांत कारेकर तसेच ट्रस्टचे गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

# जवानाने केले चोरीला गेलेले कागदपत्रे परत

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** नांदेड ते पुणे रेल्वे प्रवासादरम्यान चोरीला गेलेली प्रवासी बॅग आणि त्यातील मुळ महत्त्वपूर्ण कागदपत्रे तब्बल दोन ते अडीज महिन्यानंतर रेल्वे सुरक्षेसाठी तैनात असलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानाने मिळवून दिल्याने सुशिक्षित तरुण आणि त्याच्या पालकांनी सदरील कर्मचाऱ्याचे मनपूर्वक आभार मानले.

बहादरपुरा ता. कंधार जि. नांदेड येथील उच्च शिक्षित असलेला व पुणे येथे राहणारा वीस वर्षीय तरुण आदित्य शंकर डांगे हा मॉडर्न कॉलेज शिवाजी नगर पुणे येथे शिक्षण घेत आहे. सुट्टी निमित्त सर्व सहित्यानिशी आदित्य हा मुळ बहादरपुरा येथे गावी आला होता. सुट्टी संपल्यानंतर तो दि. १७ जानेवारी २०२४ रोजी परत पुणे येथे जाण्यासाठी नांदेड पनवेल या रेल्वेने सायंकाळी धान्य, कपडे, पैसे आदी सर्व साहित्य आणि मुळ कागदपत्रे घेवून रेल्वेने प्रवास करत होता. दि. १८ जानेवारी रोजी तो पुणे रेल्वे स्टेशन वरती उतरला त्यावेळी त्याच्या लक्षात आले की आपली प्रवासी बॅग चोरीला गेली. तसे त्याने रेल्वे पोलिसांकडे माहिती देवून रीतसर तक्रार दिली. त्यानंतर तब्बल दोन ते अडिज महिन्यानंतर दि. २६ मार्च रोजी रेल्वे फलाटावर फेरफटका मारणाऱ्या महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान दीपक पांडूरंग भोई यांच्या निदर्शनास एक मुळ कागदपत्र दिसून आले असता तेथील उपस्थितांपैकी काहींनी सदरील कागदपत्र असलेली फाईल ही सुलभ स्वच्छता गृहाच्या छतावर असल्याची माहिती दिली. तत्काळ तेथील कागदपत्रे ताब्यात घेवून माहिती घेतली असता सदर महत्त्वपूर्ण कागदपत्रे ही आदित्य शंकर डांगे या नावाची होती. त्यामध्ये शाळा सोडल्याचा दाखला, दहावी, बारावी, आयटी चे तीन वर्षांचे गुणपत्रक, सनद, राष्ट्रीयत्व, वय व रहिवाशी, उत्पन्न, जातीचे आणि जात वैधता प्रमाणपत्र असे अनेक महत्त्वपूर्ण कागदपत्रे असल्याचे आढळून आले. तत्काळ कर्तव्यावरील कर्मचारी दीपक भोई यांनी कागदपत्रावरील फोन नंबर वरून आदित्य यास संपर्क साधत दि. २९ मार्च रोजी सर्व महत्त्वपूर्ण असलेली मुळ कागदपत्रे आदित्यचे वडील यांच्याकडे सुपूर्द केली. महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान दीपक भोई यांनी कागदपत्रे मिळून आल्यानंतर ती सदर विद्यार्थ्यांच्या हाती सुपूर्द केली. त्याबद्दल डांगे यांनी भोई यांचे आभार मानले.

# वैजापुरातील आणखी चारजण १ वर्ष हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील आणखी चार जण एक वर्षांकारिता हद्दपारची कारवाई नुकतीच करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने गुन्हेगारी कृत्ये करणारे व सार्वजनीक शांतता बिघडवणारे चार जनावर ही कडक कार्यवाही करण्यात आली आहे. या कारवाईत उपविभाग वैजापुर मधील पोलीस ठाणे वैजापुर, शिवुर, विरगाव हद्दीमध्ये गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या व्यक्तींचा समावेश असल्यामुळे लोकसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे एक वर्ष करीता तडीपार करण्यात आले आहे. उपविभाग वैजापुर मधील पोलीस ठाणे वैजापुर हददीमध्ये गुन्हेगारी कृत्य करत सार्वजनीक शांतता बिघडवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्यात लक्ष्मीनगर वैजापूर येथील गणेश इंद्रराज गायकवाड,चंदर गणेश शिंदे (वय २६ वर्षे रा. वडारवाडा, वैजापुर), दिनेश प्रकाश शिंदे (वय २४ वर्ष रा. रोटेगाव ), किरण काकासाहेब शिंदे (वय २३ वर्ष रा. रोटेगाव) सर्व राहणार ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर यांना पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध म्हणुन १ वर्ष करीता छत्रपती संभाजीनगर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

तसेच मागील वर्षी देखील २०२३ मध्ये उपविभाग वैजापुर मधील पोस्टे हद्दीत गुन्हेगारी कृत्ये करणारे एकुण १४ जणांना महाराष्ट्र पोलीस कायदयाप्रमाणे कार्यवाही करुन १ वर्ष करीता छत्रपती संभाजीनगर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे. ह्या हद्दपारीचे प्रस्ताव हे पोलीस ठाणे वैजापुर, शिवुर, विरगाव येथुन सहा. पोलीस अधिक्षक कार्यालय वैजापुर यांच्या मार्फत पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रा. यांना सादर करण्यात आले होते. ही कारवाई पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया,अपर पोलीस अधिक्षक सुनिल लांजेवार, छत्रपती संभाजीनगर ग्रा. यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस अधिक्षक महक स्वामी, उपविभाग वैजापुर, पोनि शामसुंदर कौठाळे, सपोनि विजय नरवाडे, पोउपनि पवन राजपुत, पोहेकों शिवनाथ सरोदे सह आदींनी केली आहे.



# जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिरचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महाराष्ट्र शासन जलजीवन विभाग या अंतर्गत फेब्रुवारी महिन्यात राज्यस्तरीय जल जीवन मिशन या अंतर्गत जल हेच जीवन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेतील कु. सिद्धी गणेश काळे व कु. प्रतीक्षा खंडागळे या विद्यार्थिनींनी या स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करून ग्रामीण भागातील प्रशालेचा मान राखला. यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रतीक्षा खंडागळे व सिद्धी काळे यांच्या पालकांचा सत्कार प्रशालेच्या वतीने करण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर तसेच पर्यवेक्षक डॉ सुकुमार नवले यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हास्तरावर आयोजित या स्पर्धेत प्रथम क्रमांकाने सिद्धी काळे हिने 21000 रू.(एकविस हजार रुपये) पारितोषिक प्राप्त केले. तर प्रतीक्षा भाऊसाहेब खंडागळे हिला11000रू (अकरा हजार रुपये) ने द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. दोघींचा महाराष्ट्र शासनातर्फे राशी व प्रशस्ती पत्रक देऊन गुणगौरव करण्यात आला. यावेळी आयोजित सत्कार समारंभात हे यश माझे नसून प्रशालेतील गुरुजनांनी केलेल्या मार्गदर्शनाचे फळ होय. अशी प्रतीक्रिया दोन्ही विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. व आपल्या प्राप्त बक्षीसातून शाळा सौंदर्य करण करण्यासाठी प्रत्येकी अकराशे-अकराशे रुपये यांनी दिले. या स्पर्धेसाठी प्रशालेचे शिक्षक राजकुमार नरखडे, शोभा देशमाने, महेंद्र वाकळे यांनी या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले होते कार्यक्रमाचे नियोजन संजय महाजन व वीरेंद्र वाकळे यांनी केले.

# शेतकरी संघटना निवडणूक लढवणार

## रघुनाथ दादा पाटील यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** देशभरात लोकसभा निवडणुकीचे रण पेटले असून त्यासाठी महायुती आणि महाआघाडी यांच्यात जागा वाटपात मोठी रस्सी खेच सुरु असताना दिसत आहे. यातच शेतकऱ्यांना कोणतेच सरकार न्याय देत नाही व आत्महत्या थांबण्याचे नाव घेत नाही असा वास्तवादी आरोप करत शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रघुनाथ दादा पाटील यांनी या रणात उडी घेतली असून आपणही शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी हातकंणगले येथील लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे एकीकडे मराठा आंदोलन तर दुसरी कडे शेतकरी संघटना या युद्धात उतरणार असल्याचे सत्ताधारी पक्षाची चिंता वाढली असल्याचे मानले जात आहे.

शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाकडून अनेक प्रयत्न केले जात असले,तरी शेतकरी आत्महत्या सत्र सुरुच आहे.शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करावा लागत आहे.कर्ज काढून पेरणी करणे,पीक वाचविण्यासाठी अथक मेहनत करूनही कधी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान तर कधी मालाला भाव नाही.या चक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड कशी करावी,याची चिंता असते.या व इतर कारणांमुळे बहुतांश शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर येत आहे.राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेच्या (एनसीआरबी) अहवालानुसार २०२२ मध्ये देशात झालेल्या एकूण भारतात दररोज सुमारे १५४ शेतकरी आणि रोजंदारी मजूर आत्महत्या करून मरतात, सन-२०२१ मध्ये ही संख्या १४४ इतकी होती.कर्नाटक,आंध्र प्रदेश,तामिळनाडू आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या.आकडेवारीनुसार,२०२१ मध्ये १,६४,०३३ च्या तुलनेत गेल्या वर्षी १,७०,९२४ आत्महत्या झाल्या,कौटुंबिक समस्या,विवाह-संबंधित समस्या आणि आजारपणामुळे देशातील एकूण आत्महत्यांपैकी ५४.९ टक्के आत्महत्या झाल्या.२०२१ च्या तुलनेत एकूण आत्महत्यांमध्ये सुमारे ४% वाढ झाली आहे.

दरम्यान वर्तमानात सरकारने कांद्याची निर्यात थांबवली आहे.गव्हासह रब्बी पिकांचे भाव खाली आले आहे. ऊसास रिकव्हरीच्या नावाखाली साखर कारखानदार शेतकऱ्यांना लुबाडत आहे. उन्हाळ्यात कार्यक्षेत्रातील ऊस तोड लांबवून शेतकऱ्यांचे १५ ते २० टक्के नुकसान करत आहे.खते, इंधन,औषधे आदींचे दर वाढत आहे.मात्र शेतमालाचे दर मात्र पाडले जात आहे.दुधाला भाव भेटत नाही.कामगारांना पगार वेळेवर भेटत नाही.नद्या प्रदूषित केल्या जात आहे.कृष्णां,वारणा,पंचगंगा आदी नद्यांचे पाणी पिण्यायोग्य शिल्लक राहिले नाही. कोणत्याही पक्षाचे खासदार त्यावर संसदेत बोलण्यास तयार होत नाही हे वास्तव असून या प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी गरजेचा असून त्यासाठी आपण हि निवडणूक लढविणे गरजेचे बनले आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या या लढ्यास मदत करणे गरजेचे बनले आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या सामाजिक संकेतस्थळावरून मदतीची मागणी केली आहे.त्यासाठी 'फोन पे' चे स्कॅनर प्रसिद्ध केले असून मदतीचे आवाहन शेवटी केले आहे.

# वृद्धांना अन्नदान करून आरोग्य किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** खडका रस्त्यावर विना अनुदानित व लोक सहभागातून सुरू असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांना अन्नदान करून आरोग्य किटचे वाटप करण्यात आले. पुणे येथील अजय कुलकर्णी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. चांगल्या कर्माच्या माध्यमातूनच माणूस जीवनात यशस्वी बनत असतो त्यामुळे जीवनात चांगले कार्य करून थोरमोठयांचे आशीर्वाद घ्या मात्र कोणाचा तळतळाट घेऊ नका असे कळकळीचे आवाहन अजय कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा न्यायालयाचे जेष्ठ विधी तज्ञ अँड.के.एच.वाखुरे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे,सामाजिक कार्यकर्ते व मराठा योद्धा भाऊसाहेब वाघ,मुळाचे संचालक निलेश पाटील,प्रकाश निपुंगे,रामदास अवचरे, आदर्श शिक्षिका मीनाक्षी अवचरे,सौ. पुष्पाताई अवचरे, सामाजिक कार्यकर्त्या शेजल पाटील,वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर,व्यवस्थापक संतोष मगर,राजू शेख,शरद चव्हाण यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी आलेल्या मान्यवरांचे वृद्धाश्रमाचे मार्गदर्शक पत्रकार सुधीर चव्हाण यांनी स्वागत केले तर वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर यांनी प्रास्ताविक करत वृद्धाश्रम कामकाजाची माहिती दिली.सदर प्रसंगी जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका मीनाक्षी अवचरे यांना नगर येथे कर्तृत्ववान महिलांचा "ती"पुरस्कार मिळाल्याबद्दल वृद्धाश्रम कमिटीच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी पुणे येथील लेखक स्वर्गीय सूर्यकांत कुलकर्णी व नीलिमा सूर्यकांत कुलकर्णी यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृद्धांना अजय कुलकर्णी यांच्या वतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले तर वृद्धांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य किट असलेले साहित्य वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर यांच्याकडे प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना अजय कुलकर्णी म्हणाले की सर्वांना माहिती आहे जातांना आपण काहीच घेऊन जाणार नाही, तरी पण माझ ते माझं आणि तुझं पण माझं अशी प्रवृत्ती समाजात फोफावत आहे. कष्टाने कमविलेल्या पैशातून दहा टक्के हिस्सा दानधर्म करून वृद्धाश्रमासारख्या कार्याला दिले पाहिजे,दात्याच्या दानीवृत्तीतूनच त्यांच्या मनाची श्रीमंती बहरत असते असे सांगून त्यांनी येथून पुढे ही मित्र परिवाराला बरोबर घेऊन वृद्धाश्रमाला हातभार लावत राहू अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली

जेष्ठ विधी तज्ञ अँड.के.एच वाखुरे व भाऊसाहेब वाघ यांनी शासन दरबारी प्रयत्न करून वृद्धाश्रमासाठी निधी उपलब्ध करून देऊ अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली.वृद्धाश्रमाचे संपर्क प्रमुख सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर संतोष मगर यांनी आभार मानले.



# अजय कुलकर्णी यांचा अन्नदाता पुरस्काराने गौरव

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** येथील गायन क्षेत्रातील अनेक कलाकारांचे प्रेरणास्थान असलेल्या कलारत्न अजय अंबादास कुलकर्णी यांना नेवासा खडका रोडवर असलेल्या शरणपूर वृध्दाश्रमाच्या वतीने वृद्धाश्रमाला करत असलेल्या मदतीमुळे अन्नदाता पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शरणपूर वृद्धाश्रम स्थापन झाल्यापासून वर्षभर होणाऱ्या विविध उपक्रमांसाठी आर्थिक मदतीचा हात दरवर्षी माता पिता तसेच काका काकु यांच्या स्मृती प्रित्यर्थ वेळोवेळी अन्नदान यामुळे अजय कुलकर्णी यांनी अन्नदाता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले वृद्धाश्रमात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे,जेष्ठ विधी तज्ञ अँड.के.एच. वाखुरे यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार अजय कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब वाघ, रामदास अवचरे,मुळा कारखान्याचे संचालक निलेश पाटील, प्रकाश निपुंगे,राजू शेख, सौ. पुष्पाताई अवचरे, शिक्षिका मीनाक्षी अवचरे, संतोष मगर, शरद चव्हाण, वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर,वृद्धाश्रम संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्यासह वृद्धाश्रमातील आजी आजोबा उपस्थित होते.